MAMAR 1.3

एम.ए.मराठी

सत्र - I

(राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम)

ऐतिहासिक भाषाविज्ञान

© UNIVERSITY OF MUMBAI

प्राध्यापक रविंद्र द. कुलकर्णी
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्राचार्य डॉ. अजय भामरे
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्राध्यापक शिवाजी सरगर
संचालक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रकल्प समन्वयक : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व
प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

अभ्यास समन्वयक व संपादक : **डॉ. सीमा मुसळे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

लेखक : **प्रा. डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे**
मराठी विभागप्रमुख,
श्री हावगी स्वामी महाविद्यालय, उदगीर,
ता. उदगीर, जि. लातूर.

: **विवेक कडू**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, खारेकुरण रोड,
ता. जि. पालघर.

: **डॉ. सारीपुत्र तुपेरे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
संगमेश्वर महाविद्यालय (स्वायत्त), सोलापूर

: **डॉ. सीमा वीर**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
गोगटे जोगळेकर महाविद्यालय (स्वायत्त),
रत्नागिरी, जि. रत्नागिरी

: **डॉ. वनश्री फाळके**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
श्री. पी. एल. श्रॉफ कला आणि वाणिज्य
महाविद्यालय, चिंचणी, ता. डहाणु, जि. पालघर

ऑगस्ट २०२४, मुद्रण - १, ISBN-978-81-978540-0-2

प्रकाशक : संचालक, दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

अक्षर जुळणी व मुद्रण : मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८

अनुक्रमणिका

अनु. क्र.	घटकाचे नाव	लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
घटक १	अ. ऐतिहासिक भाषाविज्ञानाची भूमिका आ. ऐतिहासिक भाषाविज्ञानाची मूलतत्त्वे इ. ऐतिहासिकता आणि तौलनिकता, बहुभाषिक व एकभाषिक पुनर्रचन	प्रा. डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे	०१
घटक २	अ. भाषाकुल सिद्धांत	विवेक कडू	१५
	आ. स्वनपरिवर्तन	डॉ. सारीपुत्र तुपेरे	३१
	इ.अर्थपरिवर्तन	डॉ. सीमा वीर	४३
घटक ३	अ.मराठी भाषेची पूर्वपीठिका आ.आर्यभारतीय भाषांमधील परिवर्तन इ.अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांत	डॉ. वनश्री फाळके	६०
घटक ४	अ. कालिक भेद	प्रा. डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे	७४
	आ. लिपीविचार इ. धम्मलिपी, ब्राह्मी लिपी, रोमन लिपी, देवनागरी लिपी आणि मोडी लिपी	डॉ. वनश्री फाळके	९७

❖❖❖❖

Format of Syllabus

Programme Name: M. A. Marathi

Course Name: ऐतिहासिक भाषाविज्ञान
Historical Linguistics
Course code 50311

Total Credits: 04

Total Marks: 100

University assessment: 50

College Assessment: 50

Course Objective

१) भाषेचे स्वरूप समजून घेणे.

२) भाषेचा भाषावैज्ञानिक अभ्यास ज्ञात करणे.

३) भाषेचा ऐतिहासिक भाषाभ्यासपद्धतीने भाषेचा कालखंड आणि स्वरूप अभ्यासणे.

४) भाषा अभ्यास पद्धतींच्या विविध सिद्धांतांचा परिचय करून घेणे.

Course Outcomes

१) ऐतिहासिक भाषा अभ्यास या संकल्पनेचा परिचय होईल.

२) ऐतिहासिक भाषा अभ्यासाद्वारे भाषेची कालनिश्चिती आणि स्वरूप यांचे आकलन होईल.

३) भाषेची घटना, भाषेची रूपे, अर्थपरिवर्तन यांचे आकलन होईल.

४) भाषेचे कालिक भेद आणि लिपी विचार अवगत होईल.

MODULE 1: (श्रेयांकने २. व्याख्याने ३०)

घटक १

अ) ऐतिहासिक भाषाविज्ञानाची भूमिका

आ) ऐतिहासिक भाषाविज्ञानाची मूलतत्त्वे

इ) ऐतिहासिकता आणि तौलनिकता, बहुभाषिक व एकभाषिक पुनर्रचन

घटक २

अ) भाषाकुलसिद्धांत

आ) स्वनपरिवर्तन

३) अर्थपरिवर्तन

MODULE II: (श्रेयांकने २. व्याख्याने ३०)

घटक ३

अ) मराठी भाषेची पूर्वपिठिका

आ) आर्यभारतीय भाषांमधील परिवर्तन

इ) अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांत

घटक ४

अ) कालिक भेद

आ) लिपीविचार

इ) धम्म लिपी, ब्राम्ही लिपी, रोमन लिपी, देवनागरी लिपी आणि मोडी लिपी.

परीक्षा पद्धती :

अ) अंतर्गत परीक्षा - एकूण गुण ५०

१) २०-२० गुणांसाठी दोन अंतर्गत परीक्षा

२) उपस्थिती, सादरीकरण आणि उपक्रमांमधील सहभाग : १० गुण

आ) सत्रान्त परीक्षा-एकूण गुण ५०

१) घटक १ व २ यावर आधारित पर्यायासह १५ गुणांसाठी एक दीर्घोत्तरी प्रश्न.

२) घटक ३ व ४ यावर आधारित पर्यायासह १५ गुणांसाठी एक दीर्घोत्तरी प्रश्न.

३) घटक १, २, ३ व ४ यावर आधारित पर्यायासह २० गुणांसाठी चार (आठपैकी चार) टिपा.

❖❖❖❖

१

ऐतिहासिक भाषाविज्ञान

घटक रचना :

१.१ उद्दिष्टे

१.२ ऐतिहासिक भाषाविज्ञानाची भूमिका

१.३ भाषा आणि भाषाभ्यास पद्धती

१.४ ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा जनक सर विल्यम जोन्स

१.५ ऐतिहासिक भाषाविज्ञान म्हणजे काय?

१.६ ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे स्वरूप

१.७ ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा विकास

१.८ ऐतिहासिक भाषाविज्ञानाची मूलतत्त्वे

१.९ ऐतिहासिक भाषाविज्ञानाची अंगे

१.१० ऐतिहासिक भाषाभ्यासातील पुनर्रचन पद्धती.

१.१०.१ तौलनिक अथवा एकभाषिक पुनर्रचन पद्धती

१.१०.२ अंतर्गत अथवा पुनर्रचन पद्धती

१.११ ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या मर्यादा

१.१२ समारोप

१.१३ संदर्भग्रंथ

१.१४ सरावासाठी प्रश्न

१.१ उद्दिष्टे

प्रिय विद्यार्थ्यांनो, एम.ए.प्रथम वर्षाच्या पहिल्या सत्राच्या अभ्यासक्रमाला असलेली 'ऐतिहासिक भाषाविज्ञान' ही अभ्यासपत्रिका महत्त्वाची आहे. या अभ्यासपत्रिकेतील पहिला घटक म्हणजे 'ऐतिहासिक भाषाविज्ञान' हा होय. ह्या घटकाचा अभ्यास केल्यास भाषा आणि भाषाभ्यास पद्धती, ऐतिहासिक भाषाविज्ञान म्हणजे काय?, त्याचे स्वरूप, विकास, मूलतत्त्वे, ऐतिहासिक भाषाविज्ञानाची अंगे, ऐतिहासिक भाषाभ्यासातील पुनर्रचन, बहुभाषिक पुनर्रचन, एक भाषिक पुनर्रचन, ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या मर्यादा इत्यादी

गोष्टीचे आकलन होणार आहे. या घटकाचा अभ्यास केल्यास खालील उद्दिष्टे साध्य करता येतात.

१) ऐतिहासिक भाषाविज्ञानाची माहिती करून घेणे

२) ऐतिहासिक भाषाविज्ञानाची भूमिका समजून घेणे.

३) ऐतिहासिक भाषाविज्ञानाची उद्दिष्टे लक्षात घेणे.

४) ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे स्वरूप समजून घेणे.

५) ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे सिद्धांत आणि स्वरूप समजून घेणे.

६) ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या विकासाचा अभ्यास करणे.

७) ऐतिहासिक आणि तौलनिक भाषा अभ्यास पद्धतीतील साम्यभेद समजून घेणे.

८) ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे महत्त्व जाणून घेणे.

९) बहुभाषिक व एकभाषिक पुनर्रचन या संकल्पना समजून घेणे.

१०) ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या मर्यादा जाणून घेणे.

१.२ ऐतिहासिक भाषाविज्ञानाची भूमिका

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. ती निरंतर चालणारी प्रक्रिया असून मानवी जीवनात भाषेचे उपयोजन केले जाते. भाषेचे उपयोजन करताना लेखनात आणि भाषिक देवाणघेवाण करताना परिवर्तन हे उच्चार आणि अर्थाच्या दृष्टीने होताना त्याचा कार्यकारणभाव शोधणे, एखाद्या भाषेची उत्पत्ती, जन्म, इतिहास, परंपरा, विकास शोधणे, कुलसंकल्पना शोधणे, जन्यजनक संबंध शोधणे या दृष्टिकोनातून जन्माला आलेली अभ्यासपद्धती म्हणजे ऐतिहासिक भाषाविज्ञान ही होय.

पाणिनी नावाच्या व्याकरणकाराने 'अष्टाधायी' नावाचा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ प्रमाण मानून भाषेचा अभ्यास व्याकरणाच्या दृष्टीने केला गेला. व्याकरणाचा अभ्यास करणे म्हणजेच भाषेचा अभ्यास करणे होय. ही भाषा अभ्यासकांची समजूत होती. ती समजूत दूर करून १९व्या शतकात भाषेचा अभ्यास ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या दृष्टीने करता येतो असा नवीन विचार सर विल्यम जोन्स या भाषाभ्यासकांनी मांडला. तेथूनच भाषेचा अभ्यास ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या दृष्टीने करण्यास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.

१.३ भाषा आणि भाषाभ्यास पद्धती

भाषा ही विचारविनिमयाचे प्रभावी साधन आहे. "भाषा ही व्यवहारास प्रवृत्त करणाऱ्या सार्थ ध्वनीचा समूह होय". अशी व्याख्या कृ.पा.कुलकर्णी यांनी केली. तर डॉ महेंद्र कदम यांनी “भाषा म्हणजे संकेतबद्ध स्वनिमसंरचनेची संप्रेषणव्यवस्था होय.” (मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान, पृष्ठ १४) अशी व्याख्या केली आहे. १९व्या शतकाच्या पूर्वी भाषेचा अभ्यास

पारंपरिक पद्धतीने केला जात होता. परंतु १९व्या शतकात भाषेचा अभ्यास ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या पद्धतीने करता येतो असा नवीन विचार करून सर विल्यम जोन्स यांनी ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा पाया घातला. विसाव्या शतकात नव्याने उदयाला आलेली अभ्यास पद्धती म्हणजे वर्णनात्मक अभ्यास पद्धती होय. एककालिक आणि कालक्रमिक या संज्ञा सर्वप्रथम सोस्यूरने मांडल्या. 'एककालिक' ही संज्ञा वर्णनात्मक आहे असे सांगून या पद्धतीचे महत्त्व विशद केले. या पद्धतीमुळे भाषेचा अभ्यास वस्तूनिष्ठ आणि वर्णनात्मकतेने करता येतो हे सिद्ध केल्यामुळे ऐतिहासिक भाषाविज्ञानाची मर्यादा अभ्यासकांच्या लक्षात आली, त्यामुळे वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धतीला या काळात महत्त्व प्राप्त झाले. भाषा आणि जीवन यांच्या परस्परसंबंधाच्या भाषाभ्यासातून उपयोजित भाषाविज्ञान उदयाला आले. समाजशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र माहिती विज्ञान यांच्या साहाय्याने भाषेचा अंतर्विद्याक्षेत्रीय अभ्यास उपयोजित भाषाविज्ञानात होऊ लागला. इ.स.१९६० नंतर उदयाला आलेली अभ्यास पद्धती म्हणजे समाजभाषाविज्ञान होय. समाजविज्ञान आणि मानववंशशास्त्र या अभ्यासशाखांतील अभ्यास पद्धतीचा आधार घेऊन भाषेचा अभ्यास करणारे हे शास्त्र आहे. भाषा-भाषातील पारंपरिक आणि आनुवांशिक संबंध प्रमाणासह स्पष्ट करणे हे तुलनात्मक भाषाभ्यास पद्धतीचे कार्य आहे. अशाप्रकारे भाषेचा अभ्यास विविध पद्धतीने करता येतो हे भाषाभ्यासकांच्या ध्यानात आले. येथून भाषांचा अभ्यास विविध अभ्यासपद्धतीने करण्यात येऊ लागला.

१.४ ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा जनक - सर विल्यम जोन्स

सर विल्यम जोन्स हे एशियाटिक सोसायटीचे संस्थापक आणि अध्यक्ष होते. ते इ.स.१७८३मध्ये इंग्लंडमधून भारतात आले. रामलोन पंडिताकडून ते पौर्वात्य पद्धतीने **संस्कृत शिकले. डायजेस्ट ऑफ हिंदू अँन्ड मोहमडन लॉज एशियाटिक मिसलेनी**, हिंदूची कालगणना, हिंदूंचे राशीचक्र, पार्शियन भाषेचे व्याकरण, पौर्वात्य हस्तलिखित ग्रंथाची सूची इत्यादी अनेक प्रसिद्ध ग्रंथ त्यांनी लिहिले. भगवदगीता, गरुडपुराण, मनुस्मृती, शाकुंतल, ऋतुसंहार, गीतगोविंद, हितोपदेश इत्यादी साहित्यकृतीचे त्यांनी सर्वप्रथम भाषांतर केले व भारतीय संस्कृतीची माहिती जगाला करून दिली हेच सर विल्यम जोन्सचे श्रेष्ठपण होय.

सर विल्यम जोन्स यांनी इ.स.१७८६ मध्ये कलकत्ता येथे एशियाटिक सोसायटीच्या वार्षिक अधिवेशनात निबंध वाचला. त्या ठिकाणी त्यांनी एक महत्त्वाचे विधान केले. ते म्हणाले, ‘संस्कृत, ग्रीक व लॅटिन ह्या भाषांत जे साम्य आढळते ते इतके घनिष्ठ आणि खोलवर रूजलेले आहे, की त्या साम्याचा खुलासा ते केवळ यादृच्छेने घडून आलेले आहे (Could have been possible produced by accident) असे म्हणून भागण्यासारखे नाही. त्या साम्यांचा खुलासा करण्यासाठी ही साम्यस्थळे आढळणाऱ्या भाषा कोणत्यातरी एका भाषेपासून उद्भवल्या असल्या पाहिजेत (to have sprung from one common source) असे मानावे लागते. आणि ही जी संस्कृत इत्यादी भाषांच्या मुळाशी असलेली भाषा मानावी लागते ती आज आपणास बहुधा उपलब्ध नाही. (डॉ.स.ग.मालशे, पृष्ठ १४९)

सर विल्यम जोन्स यांनी केलेले हे विधान ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा पाया घालणारा होता. या अगोदरही भाषेचा अभ्यास होत होता. भारतात प्राचीनकाळी ध्वनीशास्त्र, व्याकरणशास्त्र,

व्युत्पत्तीशास्त्राचा अभ्यास चालू होता हे ज्ञातच आहे. या शास्त्राचा अभ्यास करताना भाषेला पूर्ववत आणि उत्तररूप असते. जसे वेदकालीन छांदस भाषा व पाणिनीच्या काळातील शिष्टसंमत भाषा व त्या दोन अवस्थांत मध्यंतरीच्या काळात काही परिवर्तन घडून आलेले असतात, ही गोष्ट शास्त्राभ्यासकांच्या ध्यानात आली होती. तसेच भाषेच्या एककालिक स्थितीत (synchronic stage) स्थलपरत्वे, जसे प्राच्य व उदीच्य किंवा समूहपरत्वे, जसे आर्य व काम्बोज, फरक आढळतात किंवा शिष्टसंमत बोलीतून निराळी अपभ्रष्ट रूपे प्रचारात असू शकतात हेही ध्यानात आले होते. प्रमाणभाषा बोलणारे शिष्ट लोक प्रसंगी निष्काळजीपणामुळे गैररूपे उच्चारतात, ह्याचेही शास्त्रज्ञांना भान होते. असेही म्हणता येईल की, एखाद्या भाषेत परकी भाषेतून उसनवारीने शब्द येऊ शकतात, ही गोष्टही त्यांनी जाणली होती.

एखाद्या भाषेची वाटचाल चालू असताना त्या भाषेच्या ध्वनिव्यवस्था, रूपव्यवस्था व शब्दकोशात फरक पडत जातात. म्हणजेच त्या भाषेला इतिहास असतो, याची जाणीव सर विल्यम जोन्स यांच्या पूर्वकाली भारतातील भाषावैज्ञानिकांना होती. परंतु दोन किंवा त्याहून अधिक भाषांत जर बद्धमूल अशी साम्यस्थळे आढळली, तर त्या भाषांचे मूळ कोणत्यातरी एका भाषेत असले पाहिजे असे मानावे, ही सर विल्यम जोन्स यांची कल्पना अगदी नवीन आहे. आणि त्याहूनही नवीन, त्यांच्या कल्पनेत आहे, ही जी मूळ भाषा आरंभस्थानी मानायची, ती आज कदाचित अस्तित्वात नसण्याची शक्यता आहे.

१.५ ऐतिहासिक भाषाविज्ञान म्हणजे काय?

ऐतिहासिक भाषाविज्ञान ही अभ्यास पद्धती भाषेच्या परिवर्तनाच्या गृहितकावर आधारलेली आहे. दोन किंवा दोनपेक्षा जास्त कालखंडातील भाषेच्या स्वरूपात कसे परिवर्तन झाले याचा अभ्यास ऐतिहासिक भाषाविज्ञानात केला जातो. कोणत्या कालखंडात कोणते नवीन स्वन आले, कोणते स्वन नाहीसे झाले, त्याचप्रमाणे भाषेच्या संरचनेमध्ये कशा प्रकारचे बदल झाले, वाक्यात कसे बदल होत गेले, अर्थात कोणते बदल झाले या सर्व बदलांचा अभ्यास ऐतिहासिक भाषाविज्ञानात केला जातो. दोन किंवा त्यापेक्षा जास्त भाषेत काळानुसार जे परिवर्तन घडून आले त्याचा अभ्यास करणाऱ्या अभ्यास पद्धतीला ऐतिहासिक भाषाविज्ञान असे म्हटले जाते. येथे दोन किंवा दोन पेक्षा जास्त कालखंडातील भाषेचा अभ्यास केला जातो त्यास कालक्रमिक अभ्यास पद्धती असेही म्हटले जाते.

१.६ ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे स्वरूप

ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीच्या काही मर्यादा लक्षात घेऊनही ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे वेगळेपण आणि महत्त्व भाषावैज्ञानिकांना नाकारता येत नाही. भाषिक परिवर्तनाचे सैद्धांतिक विश्लेषण करण्यासाठी, तसेच सध्याच्या आधुनिक काळातील भाषा कोणत्या ना कोणत्या भाषांतून जन्माला आल्या आहेत वा विकसित झाल्या आहेत हे जाणण्यासाठी, प्राचीन काळातील भाषेचा अभ्यास करण्यासाठी ग्रांथिक भाषाच आधारभूत घ्यावी लागते. व्यवहारभाषेचा निकष बाजूला ठेवावा लागतो. त्यासाठी ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती महत्त्वाची मानली जाते.

एखाद्या भाषेच्या ध्वनिपरिवर्तनाचा शोध घेऊन त्याचे नियम तयार करणे, भाषाकुलसंकल्पना, भाषेची पूर्वपीठिका, भाषेचा जन्म, तिचा काळ, भाषेच्या कालिक भेदाची कारणे, भाषासंपर्क, त्याचा भाषेवर होणारा परिणाम, शब्दसंग्रह या विविध अंगांनी भाषेचा अभ्यास करणे ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचे उद्दिष्ट असते.

ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या अभ्यासातूनच भाषाकुलसंकल्पना जन्माला आली आहे. अशा भाषेचे भूतकालीन स्वरूप, प्राचीन ग्रंथ हस्तलिखिते, शिलालेख, ताम्रपट, इत्यादीचा आधार घेऊन काळानुसार भाषेत कसे बदल होत गेले, त्यात उच्चार, अर्थ परिवर्तने कशी घडून आली, आपल्या भाषेतील काहीसे शब्द नाहीसे होऊन दुसऱ्या भाषेतून कोणते नवीन शब्द आपल्या भाषेत आले, विविध कालखंडात एकाच भाषेचे स्वरूप आणि भाषिक परिवर्तने कशी घडून आली याचा अभ्यास ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीत केला जातो. भाषाकुलाचा अभ्यास करताना, प्राचीन भाषेला जन्म देणारी भाषा कशी असू शकते, प्राचीन भाषेचे वर्तमानकाळात अस्तित्व नसले तरी ध्वनीपरिवर्तनाच्या नियमांच्या आधारे या मूळ भाषेचे पुनर्रचन कसे करता येते, याचा अभ्यास ऐतिहासिक भाषाविज्ञानामध्ये करता येतो.

भाषा ही परिवर्तनशील असते. हे परिवर्तन निरंतर चालू असते. भाषिक परिवर्तनासाठी स्थळ आणि काळ हे घटक अतिशय महत्त्वाचे असतात. हे भाषिक परिवर्तन जातीलक्ष्यी आणि व्यक्तीलक्ष्यी असते. भाषिक परिवर्तन केंद्रस्थानी ठेवूनच ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा अभ्यास केला जातो. संस्कृतमधून मराठी, हिंदी, गुजराती, बंगाली, लॅटिन भाषेमधून फ्रेंच, स्पॅनिश इत्यादी भाषा कशा उदयास आल्या हे भाषिक परिवर्तनाच्या आधारे सिद्ध करणे हे ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे कार्य असते.

भाषेतील शब्दांबरोबर वाक्यातील बदलांचा तसेच व्याकरणिक रूपाचा अभ्यासही ऐतिहासिक भाषाविज्ञानात केला जातो. यादवकाळ, शिवकाळ, बहामनीकाळ, पेशवेकाळ, आंग्लकाळ, वर्तमानकाळाच्या वाङ्मयातील भाषा, त्यातील व्याकरणिक आणि वाक्याच्या रूपात झालेले बदल दिसून येतात. भाषिक परिवर्तनाचा अभ्यास करणे, भाषेचे स्वरूप निश्चित करून कोणत्या कालखंडात कोणते भाषिक बदल झाले याचा अभ्यास ऐतिहासिक भाषाविज्ञानात केला जातो.

ऐतिहासिक अभ्यास हा कालक्रमिक असतो. भाषेच्या दोन किंवा अधिक रूपांचा परस्परसंबंध शोधणे हे ऐतिहासिक भाषाभ्यासाचे उद्दिष्ट असते. संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, मराठी या क्रमाने मराठी भाषा कशी निर्माण झाली किंवा यादवकालीन, शिवकालीन मराठी आणि अर्वाचीन मराठी यांचा परस्परसंबंध काय, ह्या प्रश्नांचा शोध घेणे ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या कक्षेत येते. भाषांचे कुलनिष्ठ वर्गीकरण करणे आणि काळाच्या ओघात शब्दाचे ध्वनिरूप कसे बदलते, शब्दाचा अर्थ कसा बदलतो याविषयीचे नियम शोधणे हे ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे कार्य असते.

एखाद्या कालखंडात कोणत्या शब्दांची भर पडली, कोणते शब्द मागे पडले, शब्दांना कोणता नवीन अर्थ प्राप्त झाला आहे याचाही विचार या पद्धतीत होतो. कारकून, वकील, सही, शिक्का, पोशाख, चादर, सतरंजी, किमत, रेशमी, तालुका, मजला, इमारत, पूल, शहर, इनाम, इत्यादी शब्द फारसीतून तर बँक, पेन, बेंच, सर, कप, हॉस्पिटल, कॉलेज, कप्तान, असे कितीतरी शब्द इंग्रजीतून मराठीत आले आहेत. suger या शब्दाचा मूलस्त्रोत संस्कृत

'शर्कर' या शब्दामध्ये आहे, असे ब्लूमफिल्ड म्हणतो. शब्दांच्या आदान-प्रदानाबरोबरच शब्दांच्या अर्थामध्ये कसे परिवर्तन होते, हेही तपासले जाते. उदा.वेणा, गोस्वामी, कुशल, अब्रू, गोठा आदी शब्दांचे मूळ अर्थ बदलून त्यांना नवे अर्थ प्राप्त झाले आहेत. (डॉ. महेंद्र कदम, पृष्ठ ७४) जसे 'खतरा' या शब्दाचा मूळ अर्थ धोकादायक आहे परंतु नवीन पिढीने वेगळा अर्थ या शब्दाला दिला आहे. खतरा शर्ट, खतरा बॅटिंग, खतरा मुलगी अशा अर्थाने 'खतरा' हा शब्द वापरला जातो. शब्दातील अर्थपरिवर्तनाचा अभ्यास ऐतिहासिक भाषाविज्ञानात केला जातो. भाषेच्या इतिहासात कालक्रमाने होत जाणाऱ्या ध्वनीपरिवर्तनांचा अभ्यास करून ध्वनीपरिवर्तनाचे नियम शोधून एकापेक्षा अधिक भाषांचा तौलनिक अभ्यासाच्या आधारे या भाषेतील परस्परसंबंधांची निरीक्षणे नोंदविणे, उपलब्ध भाषिक पुराव्यांचा तौलनिक अभ्यासातून अनुपलब्ध मूळ पूर्वजभाषा निर्धारित करणे आणि भाषाकुळाची प्रतिष्ठा करणे ही ऐतिहासिक भाषाविज्ञानाची अध्ययन प्रक्रिया आहे. प्राचीन काळातील हस्तलिखितांचा काळ ठरविण्यासाठी ऐतिहासिक अभ्यास पद्धती उपयुक्त ठरते.

१.७ ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा विकास

ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा विकास कसा झाला हे अभ्यासण्यासाठी भाषेची पूर्वावस्था कशी होती हे ध्यानात घ्यावे लागते. अगदी प्रारंभी भाषेचा जो अभ्यास झाला तो प्रामुख्याने धार्मिक दृष्टिकोनातून झालेला पहावयास मिळतो. संस्कृत भाषेत वेदांची निर्मिती झाली आणि वैदिक धर्माची आणि ग्रंथाची भाषा म्हणून तिच्याकडे पाहिले जाऊ लागले. त्यामुळे संस्कृत भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा श्रेष्ठ झाला. संस्कृत भाषा ही देववाणी आहे अशी एक समज होती. इतर भाषा गौण समजल्या जात होत्या. भाषेचा अभ्यास प्राचीन काळापासून होत असला तरी तो पारंपरिक व्याकरणिक दृष्टीने होत होता.

मध्ययुगात युरोपात भाषेकडे धार्मिक दृष्टिकोनातून पाहिले जाऊ लागले कारण या काळात बायबलचा धार्मिक व सांस्कृतिक प्रभाव होता. त्यामुळे भाषाविषयक संकल्पना ही मिथकांवर आधारलेल्या असणे स्वाभाविक होते. त्यातून हिब्रू ही 'ओल्ड टेस्टमेंट'ची भाषा मानली गेली. इंग्रजीसारख्या आधुनिक भाषा प्राचीन भाषांची भ्रष्ट रूपे मानली जाऊ लागली.

परंतु पंधराव्या, सोळाव्या शतकातील विद्येच्या पुनरूज्जीवनामुळे या पारंपरिक समजुतींना धक्के बसू लागले. प्राचीन धर्मग्रंथांची चिकित्सा होऊ लागली. या चिकित्सेलाच 'फिलॉलॉजी' असे व्यापक स्वरूपाचे नाव रूढ झाले. याच काळात आणखी एक घटना घडली. युरोपिय लोकांच्या वसाहती अनेक ठिकाणी होत गेल्या. हा साम्राज्यविस्तार होऊ लागला. त्याचा परिणाम असा झाला की, जगातील अनेक भाषांचा संपर्क होऊ लागला. त्यातूनच काही भाषिक साम्ये विद्वानांच्या जिज्ञासेला आवाहन देऊ लागली. त्यामुळे भाषाविषयक पारंपरिक समजुतीस मूलभूत फरक करणे अपरिहार्य ठरले. विशेष क्रांतिकारक घटना याच काळात घडली, ती म्हणजे संस्कृतसारख्या प्राचीन भाषेचा युरोपिय पंडितांना परिचय झाला. भाषाभ्यासाच्या क्षेत्रात जागतिक पातळीवर या घटनेने परिणाम घडवून आणला. (डॉ.र.रा.गोसावी, पृ.७)

धार्मिक ग्रंथाच्या विशेषतः बायबलच्या चिकित्सेतून ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या अभ्यासाला सुरुवात झाल्याचे दिसते. एकोणिसाव्या शतकात ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती विकसित होता होता ही अभ्यास पद्धती शास्त्रीय आणि वैज्ञानिक स्वरूपाची पद्धती म्हणून मानली जात होती. भाषेचा अभ्यास जसा जसा विकसित होऊ लागला, तसतशा त्याच्या विविध अभ्यास पद्धती जन्मास येऊ लागल्या. पुढे ऐतिहासिक भाषाविज्ञानावर वेगवेगळे आक्षेप घेतले जाऊ लागले. असे असले तरी ऐतिहासिक भाषाविज्ञानाने या क्षेत्रात केलेले कार्य मूलभूत स्वरूपाचे असून प्रेरक होते यात शंका नाही.

१.८ ऐतिहासिक भाषाविज्ञानाची मूलतत्त्वे

मानवी जीवनात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व असते. भाषा ज्या समाजाची अथवा प्रदेशाची असते तिची ती अस्मिता असते. भाषेमुळेच त्या समाजाच्या संस्कृतीचे जतन केले जाते. भाषेचा अभ्यास करताना तिच्या भूतकालीन रूपाचा शोध घेणे, तिचा इतिहास शोधून काढणे या अभ्यासालाच ऐतिहासिक भाषाविज्ञान असे म्हणतात. वर्तमानकाळात उपयोजनासाठी जी भाषा वापरतो तिचे भूतकालीन रूप कसे होते. ती जन्माला आल्यापासून ते सद्य: परिस्थितीत तिच्या रूपात अनेक बदल झालेले असतात. ते अभ्यास आणि संशोधनाने समजून घेणे, भूतकालीन भाषेची वर्तमान काळातील रूपे कशी आहेत याचा शोध घेणे. ज्ञानेश्वरीकालीन मराठी भाषेतील शब्दांची रूपे 'उ'कारांत होती ती वर्तमानकाळात ‘अ’कारांत झाली आहेत याचे आकलन करून घेण्यासाठी ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती उपयुक्त ठरते. व्यक्ती-व्यक्ती आणि व्यक्ती-समाज यांच्यातील भाषिक संपर्काचे, व्यवहाराचे माध्यम म्हणून भाषेला विशेष महत्त्व असते. भाषा ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत येते. तेव्हा तिच्यातील शब्दांच्या उच्चारात आणि अर्थात झालेला बदल, काही शब्द इतर भाषेतून आलेले असतात तर काही मुख्य भाषेतील शब्द नामशेष झालेले असतात. शब्दांचे लिंग, वचन ही रूपे बदलतात, वाक्यरचना बदलते. भाषाही परिवर्तनशील असल्याने तिच्यात जिवंतपणा असतो. भाषेच्या बदलाचा अभ्यास करून भाषेच्या मूळ रूपाकडे जाता येणे हेच ऐतिहासिक अभ्यासपद्धतीचे ध्येय असते. भाषेच्या इतिहासाचा अभ्यास ऐतिहासिक भाषाविज्ञानात केला जातो. मराठी समाज आणि संस्कृती याची माहिती ही ऐतिहासिक भाषाविज्ञानामुळे कळते. भाषा बोलणाऱ्या व्यक्तीचे पूर्वज कोणत्या वंशाचे होते. त्यांची वस्तीस्थाने कुठे होती? त्यांचे भारतात आगमन कधी झाले? ते कसे आले? त्यांच्या वाटचालीची दिशा कोणती होती? मराठी भाषेची किती विविध रूपे आहेत? भाषेचा जन्मकाळ, उत्पत्तीचा अभ्यास अशा अनेक गोष्टींचा अभ्यास या पद्धतीने करता येतो. भारतात भाषेचा अभ्यास प्राचीन काळापासून होत होता परंतु एकोणिसाव्या शतकात ऐतिहासिक आणि तौलनिक भाषा अभ्यासपद्धतीचा उदय आणि विकास झाला. सर विल्यम जोन्स यांनी भाषिक साम्यस्थळे असणाऱ्या भाषेचे मूळ कोणत्यातरी एकाच भाषेमध्ये असावे लागते आणि ती मूळभाषा अस्तित्वात नसण्याची शक्यता असते असा विचार मांडला. ऐतिहासिक भाषा अभ्यासाचा सोपा अर्थ किंवा मूलतत्त्व म्हणजे भाषांचा इतिहास शोधणे हा असतो. भाषेची रूपे शोधताना वर्तमानकाळातील भाषांचा अभ्यास, त्या भाषेच्या पूर्वावस्थेपर्यंत जाऊन करावा लागतो. भाषांचा अभ्यास करताना कालिक टप्पे पाडून एकेका कालखंडातील भाषिक रूपाचा अभ्यास करावा लागतो. म्हणून भाषेच्या ऐतिहासिक पद्धतीला कालक्रमिक भाषा असे म्हटले जाते. भाषेचा अभ्यास करताना

व्यक्तीच्या भाषेचा अभ्यास करणे कठीण असते. प्रत्येकाची उच्चार करण्याची शैली वेगळी असते. त्यामुळे शब्दातील उच्चारभेद निर्माण होतात. व्यक्तीच्या उच्चारातील नियमितता फारशी दिसत नाही. भाषेचा अभ्यास करणे हाच मुख्य हेतू ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा असला तरी मनोविज्ञान, समाज विज्ञान, तत्त्वज्ञान, साहित्य समीक्षा इत्यादी ज्ञानशाखामध्ये त्यांचा साधनात्मक उपयोग होतो. भाषेतील शब्दांचा काळपरत्वे अर्थ बदलतो. परंतु त्या शब्दांचा प्राचीनकाळातील अर्थ माहीत असावा लागतो. जुन्या प्राचीन ग्रंथाचा भाषिक अभ्यास करताना ऐतिहासिक भाषाविज्ञान पद्धती उपयोगाची ठरते. ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा अभ्यास आणखी एका क्षेत्रात महत्त्वाचा ठरतो. जुन्या ग्रंथातील पाठभेदांचा अभ्यास करताना त्यातील टाकाऊ मजकूर आणि अस्सल मजकूर कोणता आहे, हे या पद्धतीने समजून घेण्यास मदत होते. भाषेला जसा वर्तमान असतो तसा भूतकाळही असतो. या भूतकालीन भाषिक रूपांचा अभ्यास ऐतिहासिक भाषा विज्ञानात केला जातो. भाषेचे मूळ रूप, तिच्या विकासाचे टप्पे, तिचे भाषाकुल इतर भाषांचा व तिचा संबंध या साऱ्याचे आकलन होणे फार महत्त्वाचे असते. भाषेच्या उगमापासून ते आतापर्यंतच्या तिच्या प्रवासातील विविध रूपे समजू शकतील. ऐतिहासिक भाषाविज्ञान या ज्ञानशाखेचा उपयोग मानवी संस्कृतीच्या इतर अनेक क्षेत्रातही होतो हे ध्यानात घेतल्यास भाषेचे महत्त्व समजण्यास मदत होते.

१.९ ऐतिहासिक भाषाविज्ञानाची अंगे

एकाच भाषेतील परिवर्तनाचा अभ्यास ऐतिहासिक पद्धतीने करणाऱ्या पद्धतीस एकभाषिक पुनर्रचन/अंतर्गत पुनर्रचन असे म्हणतात. एकभाषिक पुनर्रचन या ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या अभ्यास पद्धतीची दोन अंगे आहेत. त्यालाच पुरोगामी आणि पश्चाद्गामी असे म्हटले जाते.

१.९.१ पुरोगामी :-

भाषेच्या माहीत असलेल्या अवस्थेपासून तिच्यामध्ये उत्तरोत्तर प्रगती वा विकास कसा होत गेला हे टप्प्याटप्प्याने अभ्यासण्याच्या पद्धतीस पुरोगामी भाषाभ्यास पद्धती असे म्हणतात. संस्कृत-प्राकृत-मराठी व आजच्या अर्वाचीन तसेच जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञान काळातील भाषेच्या अवस्थेचा अभ्यास या पद्धतीने केला जातो. भारतीय भाषांच्या विविध अवस्थांचा अभ्यास पुरोगामी ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या पद्धतीने केला जातो. आर्य भारतीय कुळातील अनेक भाषांचा अभ्यास या पद्धतीने केलेला दिसतो.

१.९.२ पश्चाद्गामी:-

आजच्या भाषेचा म्हणजेच वर्तमानकाळातील भाषा अवस्थेचा अभ्यास भूतकाळाकडे टप्प्याटप्प्याने करीत जाणे यालाच पश्चाद्गामी अभ्यास म्हणतात. उदा. ग्रीक, लॅटीन, संस्कृत भाषांचा अभ्यास करणे, त्या भाषेच्या मूळ जनक भाषेचा अंदाज बांधणे हा अभ्यास पश्चाद्गामी असतो. भाषेच्या ज्ञात अवस्थेकडून अज्ञात अवस्थेकडे जाणारा अभ्यास किंवा या पद्धतीमध्ये भाषेच्या पुढच्या अवस्थेकडून मागच्या अवस्थेकडे जात भाषेचा अभ्यास केला जातो. या पद्धतीने भाषेच्या पूर्वावस्थेचे पुनर्रचन केल्यावरही त्या पूर्वीच्या अवस्थेकडून नंतरच्या अवस्थेकडे येताना भाषेत ध्वनीविषयक, व्याकरणविषयक,

अर्थविषयक कोणते परिवर्तन झाले याविषयीची ऐतिहासिक माहिती सांगणारी मते मांडावी लागतात.

१.१० ऐतिहासिक भाषाभ्यासातील पुनर्रचन पद्धती

ऐतिहासिक भाषाभ्यासात ज्या महत्त्वाच्या पद्धती आहेत त्यात तौलनिक पुनर्रचन पद्धती आणि अंतर्गत पुनर्रचन पद्धती या दोन महत्त्वाच्या पद्धती आहेत. त्यांनाच अनुक्रमे बहुभाषिक पुनर्रचन पद्धती व एकभाषिक पुनर्रचन पद्धती असे म्हटले जाते.

१.१०.१ तौलनिक अथवा बहुभाषिक पुनर्रचन पद्धत

प्रसिद्ध फ्रेंच भाषाशास्त्रज्ञ मेय्ये (Meillet) यांनी तौलनिक पुनर्रचन करताना निदान तीन भाषांतील तरी तपशील असणे इष्ट आहे असे म्हटले आहे. ज्याप्रकारे एकाच भाषेच्या परिवर्तनाचा अभ्यास होतो, त्याचप्रमाणे इतर अनेक भाषांचा तौलनिक अभ्यासही होतो. या अभ्यासाला तौलनिक/बहुभाषिक पुनर्रचन असे म्हणतात किंवा मूळ भाषेचे पुनर्रचन ज्या प्रमुख पद्धतीने करण्यात येते त्या पद्धतीला तौलनिक पुनर्रचन पद्धती असेही म्हणतात. ही पद्धती एकापेक्षा अधिक भाषांतून गोळा केलेल्या पुराव्यांवर आधारलेली असल्यामुळे तिला बहुभाषिक पुनर्रचन पद्धती असेही म्हटले जाते.

१.१०.१.१ तौलनिक पुनर्रचन पद्धतीचे स्वरूप

तौलनिक पुनर्रचन पद्धतीस सुरूवात करण्यापूर्वी एक काळजी घ्यावी लागते. ती घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ही पद्धती बहुभाषिक आहे. याचा अर्थ असा होतो की, त्यासाठी दोन किंवा अधिक भाषांतील पुनर्रचनाची तयारी म्हणून सामग्री गोळा करावी लागते. ही सामग्री गोळा करताना तपशील हा दुसऱ्या भाषेवर अवलंबून असणारा असावा. मराठी आणि गुजराती ह्या दोन भाषांच्या आधारे पुनर्रचन करायचे झाल्यास मराठीतील 'टमाटो' व गुजरातीतील ‘टमाटा’ हे शब्द पुनर्रचनासाठी निवडू नये. त्याऐवजी संस्कृत -शर्कर, हिंदी- शक्कर, मराठी- साखर, इंग्रजी शुगर इ. शब्दातील साम्य दाखविण्यासाठी अशी उदाहरणे घेणे योग्य होईल.

दुसरी एक काळजी घ्यायची म्हणजे पूर्वावस्थेच्या ध्वनिव्यवस्थेचे पुनर्रचन करताना त्यासाठी निवडलेले शब्द शुद्ध असावेत, सामासिक नसावेत. उदाहरणार्थ गुजराती ‘दिवासळी’ (आगपेटीतील काडी) आणि हिंदी ‘दियासलाई’ यांच्या आधारे पुनर्रचन करू नये. ते दोन्ही सामासिक शब्द आहेत. तो समास ज्या दोन शब्दांचा झाला आहे ते शब्द जर स्वतंत्रपणे पहिल्या कसोटीला उतरले असतील तर ते घ्यावेत. उदाहरणार्थ वरील सामासिक उदाहरणातील गुजराती ‘दीवो’ व हिंदी दिया, संस्कृत ‘दीप’ हे शब्द पुनर्रचनासाठी घ्यायला हरकत नाही.

१.१०.१.२ ध्वनी-अर्थ-साम्य दर्शविणाऱ्या जोड्या

एखाद्या भाषाकुलात ज्या भाषा समाविष्ट करण्यात आल्या असतील, त्या भाषांत ध्वनीसाम्य व अर्थसाम्य ह्या दोन कसोट्यांना उतरणाऱ्या जितक्या शब्दांच्या किंवा पदाच्या जोड्या आढळतील त्यांच्या आधारे हे पुनर्रचन करायचे असते. म्हणजे इंडो युरोपियन भाषाकुलात ज्या संस्कृत, अवेस्ता, ग्रीक, लॅटीन इत्यादी भाषा समाविष्ट झाल्या आहेत.

त्यांच्यात आढळणाऱ्या शब्दांच्या जोड्यावरून त्या सर्व भाषांच्या मुळाशी जी एक इंडो-युरोपियन भाषा असल्याची कल्पना करण्यात येते. त्या भाषेचे अथवा संस्कृत व अवेस्ता या भाषांत ज्या जोड्या आढळतील त्यांच्या आधारे त्या भाषांच्या मुळाशी जी इंडो-इराणी शाखेची मूळ भाषा (इंडोयुरोपियन भाषाकुलांतर्गत) कल्पावी लागते, तिचे पुनर्रचन करता येते. तौलनिक पद्धतीचे स्वरूप समजण्यास सोपे जावे म्हणून एका वेळी दोहोंतून अधिक भाषांतील उदाहरणे घेण्याऐवजी आपण दोन दोन भाषेतील जोड्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

१.१०.१.३ ध्वनीसाम्य नसताना पुनर्रचन

तौलनिक पुनर्रचन करताना दोन भाषेतून निवडलेल्या जोड्या ह्या अशा अगदी एकसारख्याच नेहमी मिळत नाहीत. ध्वनीदृष्ट्या त्यात थोडाफार फरक असतो. अशावेळी त्यावरून पुनर्रचन कसे केले जाते याचे आकलन करून घेणे महत्त्वाचे असते.

समजा आपण संस्कृत व अवेस्ता भाषांतून 'सात' ह्या अर्थी असलेल्या 'सप्त' व 'हप्त' या शब्दांची जोडी घेतली तर आपणास असे आढळून येईल की ह्या जोडीचे (१) स: ह आणि (२) प्त:प्त असे दोन तुकडे केल्यास तिच्या दुसऱ्या भागात ध्वनिदृष्ट्या संपूर्ण साम्य आहे. म्हणजे तेवढ्या तुकड्यापुरते पुनर्रचन *प्त असे सहजपणे करता येईल; परंतु पहिल्या भागात संस्कृतमध्ये ‘स’ आणि अवेस्तात ‘ह’ आढळत असल्यामुळे त्यांच्यात ध्वनिदृष्ट्या साम्य नाही. त्या पूर्वी भागाचे आपण ध्वनिदृष्ट्या आणखी स्+अ:ह+अ असे विश्लेषण केले तर आपणास असे दिसून येईल, की संस्कृतात आणि अवेस्तात फरक आहे. तो व्यंजनापुरता स्वर दोन्ही भाषांत सारखेच आहेत, तेव्हा आपणास जे पूर्वरूप रचावे लागेल त्यात पहिल्या अक्षरातील ‘अ’ ह्या स्वराबद्दलही मतभेद असण्याचे कारण नाही. आता प्रश्न फक्त पुनर्रचित शब्दांच्या सुरूवातीच्या व्यंजनापुरता राहिला. ते व्यंजन *स मानायचे का* ह? जर *स असे मानले तर मूळच्या* सप्त ह्या शब्दाचे अवेस्ताने हप्त केले म्हणजे दोहोंपैकी अवेस्ता भाषेने ध्वनीदृष्ट्या फेर केला तर असे मानावे लागते. जर ते व्यंजन *हे होते असे मानले तर मूळच्या* हप्त शब्दात संस्कृतने बदल घडवून आणला असे मानावे लागते. म्हणजे कोणत्याही पक्षी कोणत्यातरी एका भाषेने बदल केला ते मानणे अपरिहार्य आहे.

कोणी म्हणेल की *स किंवा *ह ह्यापैकीच व्यंजन का मानायचे? एखादे तिसरेच व्यंजन घटकाभर आपण *प असे म्हणू- असू शकेल ते म्हणणे बरोबर आहे. परंतु सबळ कारण असल्याखेरीज कुठल्याच भाषेतील शब्दांत त्या जोडीपुरता न आढळणारा असा तिसराच वर्ण पुनर्रचन करताना गृहीत धरत नाहीत. कारण तसे जर मानले तर मूळच्या आरंभस्थानी दोन्ही भाषांनी बदल घडवून आणले असे म्हणणे प्राप्त होते. परंतु दोन्ही भाषांनी बदल घडवून आणला असे मानण्यापेक्षा कोणत्यातरी एका भाषेने तो घडवून आणला, असे मानण्यात अधिक जवळीकता आहे. आणि ते अधिक जवळीकतायुक्त असते. ते सत्याच्या जास्त जवळ असण्याची शक्यता असल्यामुळे ज्यात अधिक जवळीकता असेल तो पक्ष पुनर्रचन करताना स्वीकारला जातो.

१.११ अंतर्गत अथवा एकभाषिक पुनर्रचन पद्धती

ऐतिहासिक भाषाविज्ञान पद्धतीत एखाद्या भाषेचा पूर्व इतिहास जाणून घेण्याचे जे दोन मार्ग उपलब्ध आहेत, त्यापैकी तौलनिक पद्धतीचा जो महत्त्वाचा मार्ग आहे त्या मार्गाने भाषेची पूर्वावस्था कशी जाणून घेता येते ते आपण पाहिले आहे. आता अंतर्गत अथवा एक भाषिक पुनर्रचन ह्या दुसऱ्या मार्गाची माहिती करून घ्यायची आहे. त्या दुसऱ्या कुठल्याही भाषेचा आधार न घेता एकाच भाषेतील पुराव्यांच्या आधारे पूर्वावस्थेविषयी अनुमान करण्यात येतात तेव्हा त्या प्रकाराला अंतर्गत अथवा 'एकभाषिक पुनर्रचन' असे म्हणतात. एकभाषिक पुनर्रचनेच्या मुळाशी जे गृहीततत्त्व आहे, ते असे आहे. भाषेच्या इतिहासात अनेक प्रकारची ध्वनीपरिवर्तने घडून येतात. हे सर्वांना मान्य आहे. ह्यापैकी काही ध्वनीपरिवर्तने संदर्भसापेक्ष असतात. एखाद्या शब्दाची भाषेत जी निरनिराळे रूपे वापरली जातात त्यांच्यात ध्वनीदृष्ट्या फरक असल्याचे कारण नाही. उदाहरणार्थ, संस्कृतात 'देव' ह्या शब्दांची जी निरनिराळी रूपे आढळतात त्यात 'देव' ह्या एवढ्या ध्वनीरूपापुरता काहीही फरक आढळत नाही परंतु 'मरूत' हा शब्द घेतला, तर त्याची काही रूपात 'मरुत' व काही रूपात 'मरुद' अशी दोन रुपे आढळतात. मराठीत 'घोडा' हा शब्द घेतला तर त्याच्या 'घोड्' भागापुरते घोडा, घोड्याला, घोड्यांना ह्या रूपांत ध्वनीवैचित्र्य आढळत नाही. परंतु 'ससा' हा शब्द घेतला तर 'ससा' सशाला, सशांना अशी 'सस्' व 'सश' ही दोन रुपे आढळते. ते त्या भाषांनी त्यांच्या इतिहासात घडवून आणलेल्या ध्वनीपरिवर्तनामुळे उद्भवलेले असते, असे भाषावैज्ञानिक मानतात आणि हे मानणे हेच एकभाषिक पुनर्रचनेचे मूलतत्त्व गृहीततत्त्व आहे. ह्या गृहीततत्त्वाचा अर्थ असा होतो की, असे रूपवैचित्र्य ज्या भाषांत आढळते. त्या भाषांच्या पूर्वावस्थेत असे रूपवैचित्र्य नसावे. म्हणजे त्या भाषांत आरंभी एखाद्या प्रतिपादिकाची सर्व रूपे ध्वनीदृष्ट्या सारखीच असावीत. परंतु नंतर त्या भाषांनी केलेल्या काही ध्वनीपरिवर्तनामुळे ते रूपवैचित्र्य निर्माण झाले आहे. तसे असले तर त्या भाषांतील पूर्वकालीन रूपे कोणती होती, हे ठरविण्याचे काम भाषा वैज्ञानिकावर येऊन पडते. ते ठरविण्यासाठी ते त्या त्या भाषेचा एकटीचा आधार घेत असल्यामुळे त्या पद्धतीला अंतर्गत अथवा एकभाषिक पुनर्रचन असे नाव देण्यात आले. संस्कृतात 'मरुत' शब्दांची 'मरुता' आणि 'मरूदभि': अशी अनुक्रमे तृतीया एकवचनी आणि तृतीया बहुवचनी रूपे आढळतात.

या दोन रूपात 'त' व 'द' दोन व्यंजनांचे आंदोलन आढळते. म्हणजे 'मरुत' या शब्दाच्या निरनिराळ्या रुपांत एक तर 'त्' व्यंजन तरी आढळते किंवा 'द' तरी आढळते. या घटनेला रूपसंबंद्ध ध्वनीआंदोलन अशी पारिभाषिक संज्ञा वापरली आहे. हे आंदोलन म्हणजे त्या भाषेत घडून आलेल्या ध्वनीपरिवर्तनाच्या खुणा किंवा पदचिन्हे असतात, आणि त्या खुणाच्या आधारे पुनर्रचन करायचे असते.

१.१२ ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या मर्यादा

कोणत्याही अभ्यास पद्धतीचे जसे सामर्थ्य असते तशा मर्यादाही असतात हे लक्षात घ्यायला हवे. ऐतिहासिक भाषाविज्ञान ही १९व्या शतकात उदयाला आलेली महत्त्वाची अभ्यास पद्धती आहे. ऐतिहासिक भाषाविज्ञानाला उचलून धरणारी आग्रही भूमिका हरमान पॉल याने १९२०च्या सुमारास मांडली होती. या पद्धतीनेही भाषेचा जागतिक पातळीवर

अभ्यास केला गेला. या अभ्यासाला तौलनिक भाषाभ्यासाचीही मदत झाली. भाषाकुलसंकल्पनेच्या आधारे ध्वनीपरिवर्तनाचे काही नियमही प्रस्थापित झाले. (उदा. ग्रीमचा सिद्धांत, व्हर्नेरचा सिद्धांत इत्यादी) यातील काही प्रस्थापित सिद्धांताच्या आधारे जगातील भाषांचा अभ्यासही होऊ लागला. भाषेच्या कालिक टप्प्यांचा एककालिक, वर्णनात्मक अभ्यास केल्याशिवाय ऐतिहासिक भाषाविज्ञानाला पुढे जाता येणार नाही हे सोस्यूरने आपल्या ग्रंथात मांडलेले मतच शेवटी ग्राह्य मानावे लागते. वर्णनात्मक अभ्यास पद्धती विकसित झाल्यामुळे ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या मर्यादा अभ्यासकांना लक्षात आल्या त्या खालीलप्रमाणे आहेत.

१) ऐतिहासिक पद्धतीने होणारा अभ्यास हा अत्यंत पृष्ठस्तरीय ठरतो. वर्णनात्मक पद्धतीत जो वस्तूनिष्ठपणा आणि अंत:स्तरीय दृष्टिकोन असतो तो ऐतिहासिक भाषाविज्ञानात आढळत नाही.

२) आजच्याप्रमाणे त्या काळातही भाषेमध्ये बोलीभेद आणि भाषांचे विविध स्तरभेद असणारच पण त्यांचे पुरावे मिळू शकत नाहीत.

३) ऐतिहासिक अभ्यासाला केवळ लिखित पुराव्यांवरच अवलंबून राहावे लागते, यामुळे भाषेच्या औपचारिक रूपातील सारी अंगे या अभ्यासाच्या कक्षेत येऊ शकत नाहीत.

४) जन्यजनक संबंध हा भाषेच्या बाबतीत शंभर टक्के लागू पडतोच असे नाही. म्हणजे केवळ एका विशिष्ट भाषेपासून दुसरी भाषा जन्माला आलेली असते, अन्य कोणत्याही भाषेचा संबंध ह्या प्रक्रियेत आलेला नसतो, तेव्हा ध्वनीपरिवर्तनाच्या नियमांनुसार एकाच भाषेपासून दुसरी भाषा जन्मास येते असे कधीच होत नाही.

५) ध्वनीपरिवर्तन हे कितीही निरंतर आणि नियत मानले, तरी आदिभाषेची पुनर्रचना करताना ती भाषा एकजिनसी स्वरूपाची असते असे गृहीत धरलेले असते. पण कोणतीही भाषा आधी एकजिनसी स्वरूपाची नसते. ती अनेक बोलींची बनलेली असते याचे भान ऐतिहासिक भाषाशास्त्रात सतत बाळगावे लागते. तात्पर्य, ध्वनी परिवर्तन कितीही नियत असले, निरंतर असले तरी त्यालाही काही अपवाद असतात. शिवाय भाषिक परिवर्तन हे केवळ ध्वनीपरिवर्तनापुरतेच मर्यादित नसते. व्याकरणिक, शब्दार्थ विषयक, सादृश्यमूलक, आदान असे भाषिक परिवर्तनाचे अनेक प्रकार आहेत. तेव्हा परिवर्तन व त्याच्याशी संबंधित संकल्पना भाषाविज्ञानात स्वीकारल्या गेल्या, तरी जन्य-जनक संबंध, कुलसंकल्पना आणि उत्क्रांती यासारख्या कल्पना आधुनिक भाषाविज्ञानात मान्यता पावलेल्या नाहीत. ('मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र', डॉ. र. रा. गोसावी, पृष्ठ ९)

६) भाषाकुलांच्या आकृत्या कागदावर सुटसुटीतपणे दाखवता येत असल्या, तरी प्रत्यक्षात भाषाव्यापारातले बरेचसे महत्त्वाचे भाग या आकृत्यातून निसटलेले असतात.

७) मूळ भाषेचा शोध घेणे किंवा अस्तित्वात नसलेल्या मूळ भाषेचे पुनर्रचन करणे ह्या अचूकतेची खात्री पन्नास टक्क्यांपर्यंतच देता येते, याची जाणीव निर्माण झाली आहे.

८) पुनर्रचन पद्धतीने मूळ भाषा पूर्णपणे हाती लागू शकत नाही, तर केवळ काही शब्दांविषयीच अंदाज बांधता येतो.

आपली प्रगती तपासा:

१) ऐतिहासिक भाषाविज्ञान म्हणजे काय? ते सांगून या अभ्यास पद्धतीचे स्वरुप स्पष्ट करा.

१.१३ समारोप

या घटकांमध्ये ऐतिहासिक भाषाविज्ञान म्हणजे काय? या अभ्यास पद्धतीचे स्वरूप, ऐतिहासिक भाषाभ्यासाची भूमिका, मूलतत्त्वे, या अभ्यासाबरोबरच या अभ्यास पद्धतीमध्ये सर विल्यम जोन्स यांचे योगदान, ऐतिहासिक भाषाविज्ञानाची अंगे, एकभाषिक पुनर्रचन आणि बहुभाषिक पुनर्रचन, ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या मर्यादा अधोरेखित करण्यात आल्या आहेत. भाषा ही परिवर्तनशील असते. भाषेतील उच्चार, शब्दसंग्रह, अर्थपरिवर्तन व्याकरणिकरूपे कशी काळानुरूप बदलत गेली, कोणत्या कालखंडात कोणते भाषिक परिवर्तन घडून आले याचा अभ्यास ऐतिहासिक भाषाविज्ञानात केला जातो. एखाद्या भाषेची पूर्वावस्था कशी होती, तिची सद्य:स्थितीतील अवस्था कशी आहे, दोन किंवा दोनपेक्षा अधिक भाषेचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी तसेच तिच्यातील साम्यांचा शोध घेण्यासाठी ही अभ्यासपद्धती महत्त्वाची आहे. एखाद्या भाषेची भूतकालीन पूर्वावस्था सद्य:स्थितीत भाषेच्या अवस्थांचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती अधिक उपयुक्त ठरते.

१.१४ संदर्भग्रंथ

१) डॉ.गोसावी, र.रा. : 'मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती १५ जुलै,१९९९.

२) डॉ. कदम, महेंद्र : 'मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृती १ जानेवारी,२००३.

३) प्रा. गोविलकर, लीला : 'वर्णनात्मक भाषाविज्ञान', आरती प्रकाशन, डोंबिवली, प. आ. जानेवारी१९९२.

४) डॉ.मालशे. स.ग. आणि इतर (संपा.) : 'भाषाविज्ञान वर्णनात्मक आणि ऐतिहासिक', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, २६ ऑक्टोबर,२०१०.

५) कालेलकर, ना.गो. : 'भाषा इतिहास आणि भूगोल', मौज प्रकाशन, मुंबई, ति.आ. १५ डिसेंबर, २०००.

६) डॉ.कानडे, मु.श्री.(संपा.) : 'मराठीचा भाषिक अभ्यास : ऐतिहासिक आणि वर्णनात्मक', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृती जानेवारी १९९४.

७) वरखेडे, रमेश : 'भाषावार प्रांतरचना आणि मराठी काही परिप्रेक्ष्यं', साहित्य अकादमी, न्यू, दिल्ली, एप्रिल २०१४.

८) कालेलकर, ना.गो. : 'ध्वनीविचार', मौज प्रकाशन, मुंबई, ति.आ., मार्च २००३.

९) महाजन, पुरुषोत्तम : 'मराठीचा भाषिक अभ्यास', अथर्व पब्लिकेशन, धुळे. प. आ. १ मे २०२१.

१.१५ सरावासाठी प्रश्न

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१) ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा विकास कसा होत गेला, ते विवेचन करा.

२) ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे स्वरूप स्पष्ट करा.

३) ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या अभ्यासामागील भूमिका विशद करा.

४) ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या अभ्यासाच्या मूलतत्त्वांची माहिती लिहा.

५) ऐतिहासिक भाषाविज्ञानातील पुनर्रचन पद्धतीचे स्वरूप उलगडून दाखवा.

ब) लघुउत्तरी प्रश्न:

१) भाषा आणि भाषाभ्यास पद्धतीची माहिती थोडक्यात लिहा.

२) ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या अभ्यास पद्धतीच्या मर्यादा स्पष्ट करा.

३) ऐतिहासिक भाषाविज्ञानाची अंगे कोणती आहेत, ते लिहा.

४) एकभाषिक पुनर्रचन पद्धतीचे स्वरूप विशद करा.

५) ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या अभ्यासातील सर विल्यम जोन्सचे योगदान स्पष्ट करा.

❖❖❖❖

२अ

भाषाकुल सिद्धांत

घटक रचना :

२अ.० उद्देश

२अ.१ प्रास्ताविक

२अ.२ भाषाकुल संकल्पनेचे स्वरूप

२अ.३ भाषा वर्गीकरणाची तत्त्वे

२अ.४ जगातील प्रमुख भाषाकुले

२अ.५ इंडोयुरोपिअन भाषाकुल

२अ.६ इंडो-इरानिअन भाषाकुल

२अ. ७ आर्यभारतीय शाखा

२अ.८ समारोप

२अ.९ संदर्भ ग्रंथ

२अ.१० सरावासाठी प्रश्न

२अ.० उद्देश

हा घटक अभ्यासल्यानंतर पुढील उद्देश साध्य करता येतील.

१. भाषाकुल सिद्धांताचे स्वरूप ध्यानात येईल.
२. भाषाकुल सिद्धांत समजावून घेण्यासाठी लागणारी भाषा वर्गीकरणाची तत्त्वे लक्षात येतील.
३. जगातील प्रमुख भाषाकुलांचा अभ्यास होईल.
४. इंडो-युरोपिअन भाषाकुल व इंडो-इरानिअन भाषाकुल यातील प्रमुख शाखा ध्यानात येतील.
५. अंतर-बहिरवर्तुळ सिद्धांताचा अभ्यास होईल.
६. आर्यभारतीय भाषाशाखा समजून येतील.

२अ.१ प्रास्ताविक

भाषा आणि मानव यांचे नाते अतूट आहे. मानवाने निर्माण केलेली भाषा हे सर्वस्पर्शी साधन आहे. मानवाच्या विकासात भाषेचा महत्त्वाचा वाटा आहे. जगभरात असंख्य भाषा बोलल्या जातात. या भाषांच्या स्वरूपात कमालीची भिन्नता आढळून येते. या भाषांचा अभ्यास

वैज्ञानिक पद्धतीने केला जातो. भाषेचा अभ्यास करणाऱ्या विविध अभ्यासपद्धती देखील आहेत. ऐतिहासिक भाषाविज्ञान, वर्णनात्मक भाषाविज्ञान आणि सामाजिक भाषाविज्ञान या भाषा अभ्यासाच्या महत्त्वाच्या शाखा होत. 'भाषाकुल संकल्पने'चा विचार ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या कक्षेत येतो. कोणत्याही टप्प्यावर भाषा ही स्थीर नसते. ती सतत बदलत जाते. म्हणजेच भाषा ही परिवर्तनशील असते. ती कालक्रमानुसार बदलते. प्रत्येक भाषेला एक स्वतंत्र इतिहास असतो. त्या भाषेची पूर्वावस्था आणि तिचे उत्तरकालीन रूप यातील परिवर्तनाचे स्वरूप तसेच या परिवर्तनाच्या मागे कोणती तत्त्वे, नियम आहेत यांचा अभ्यास ऐतिहासिक भाषाविज्ञानात येतो. या अभ्यासानुसार काही उपपत्ती मांडल्या जातात. वेगवेगळ्या कालखंडात भाषा कशी बदलत गेली याची मांडणी केली जाते. दोन किंवा अधिक भाषांचा तुलनात्मक अभ्यास केला जातो. हा तुलनात्मक अभ्यास ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे एक अंग आहे.

१७८६ साली सर विल्यम जोन्स यांनी कलकत्ता येथे रॉयल ऐशियाटिक सोसायटीच्या तिसऱ्या वार्षिक अधिवेशनामध्ये निबंध वाचताना एक महत्त्वाचे विधान केले. ‘संस्कृत, ग्रीक व लॅटिन या भाषांत जे साम्य आढळते ते इतके घनिष्ठ आणि खोलवर रुजलेले आहे, की त्या साम्याचा खुलासा ते केवळ यादृच्छेने घडून आलेले आहे असे म्हणून भागण्यासारखे नाही. त्या साम्याचा खुलासा करण्यासाठी ही साम्यस्थळे आढळणाऱ्या भाषा कोणत्यातरी एका भाषेपासून उद्भवल्या असल्या पाहिजेत असे मानावे लागते. ‘त्यांनी या निबंधात ग्रीक, लॅटिन, संस्कृत इत्यादी भाषांच्या साम्यावरून त्या एकाच पूर्वज भाषेपासून निर्माण झालेल्या असाव्यात असे अनुमान व्यक्त केले. त्यांच्या विचाराने भाषेच्या अभ्यासकांना चालना मिळाली. यातून 'भाषाकुल' या संकल्पनेचा पाया रोवला गेला.

ऐतिहासिक भाषाविज्ञानात भाषेची पूर्वावस्था, मध्यावस्था, तिचे उत्तरकालीन, अर्वाचीन रूप आणि स्वरूप, त्यातील परिवर्तने, या परिवर्तनामागील नियम मांडले जातात. या अभ्यासपद्धतीत अनेक भाषांचा अभ्यास करून 'वंशवृक्ष' मांडून दाखविला जातो. भाषांच्या तुलनात्मक अभ्यासातूनच 'भाषाकुल' संकल्पनेचा विचार पुढे आला. जगातल्या विविध भाषांचे विविध तत्त्वांच्या आधारे वर्गीकरण केले जाते. त्यात 'कुलनिष्ठ' वर्गीकरण हे एक महत्त्वाचे वर्गीकरण 'तत्त्व' आहे.

२अ.२ भाषाकुल संकल्पनेचे स्वरूप

प्रास्ताविकात आपण पाहिले की ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा पाया हा सर विल्यम जोन्स यांच्या महत्त्वाच्या विधानाने घातला गेला. भाषांमध्ये होणारे परिवर्तन आणि भाषांना‘कुल’ असते या दोन बाबींना ऐतिहासिक भाषाविज्ञानात मध्यवर्ती स्थान आहे. भाषाकुलाचे स्वरूप समजून घेण्यासाठी आपण उदाहरणादाखल मराठी, गुजराती आणि हिंदी या तीन भाषांचा विचार करू. या भाषांमध्ये अनुक्रमे हात, आणि हाथ हे शब्द ध्वनीदृष्ट्या आणि अर्थदृष्ट्या सारखे आहेत. भाषा ही एक चिन्हव्यवस्था आहे. भाषेतला प्रत्येक शब्द एक चिन्हच आहे. पण चिन्ह आणि त्याचा अर्थ यात प्रत्यक्ष संबंध नसतो. त्यांच्यातील संबंध हा यादृच्छिक असतो. तो परंपरेने चालत आलेला असतो. असे असताना वरील तीन भाषेत ध्वनीदृष्ट्या आणि अर्थदृष्ट्या साम्य असणारे शब्द का असावेत असा प्रश्न निर्माण होतो. अधिक अभ्यास केल्यावर या भाषांमध्ये अनेक सारखे शब्द आढळतात. तेव्हा हा

सारखेपणा योगायोगाने आलेला नाही हे लक्षात येते. शब्दांमध्ये जे स्वनपरिवर्तन झाले आहे त्यातही संवाद आढळतो. यावरून आपण एका निष्कर्षापर्यंत पोहोचतो. परंपरा आणि काळानुसार झालेल्या बदलामुळे भाषेचे स्वरूप वेगवेगळे भासत आहे असा अंदाज बांधून त्यांच्यात व्याकरणीक साधर्म्य आढळते असे आपण सांगू शकतो. अशा प्रकारे मराठी, गुजराती आणि हिंदी या तीन भाषांमध्ये साम्य असून त्या पूर्वी एकच भाषा असाव्यात, म्हणजेच त्यांचा उगम एकाच भाषेपासून झालेला असावा असा अभ्युपगम आपण मांडू शकतो. संस्कृत 'हस्त'>प्राकृत 'हत्थ' या परंपरेने 'हात', 'हाथ' आणि 'हाथ' हे सारखे शब्द तीन भाषांमध्ये आलेले आहेत हे लक्षात येते. या भाषा संस्कृतोद्भव आहेत असे मानावे लागते.

असे करीत मागे गेले असता संस्कृत, ग्रीक आणि लॅटिन या भाषांत ध्वनिसाम्य असलेले बरेचसे शब्द आढळतात. हिटाईत, अवेस्ता, प्राचीन पर्शियन, लिथुएनियन या भाषांशी संस्कृतचे साधर्म्य आहे. शब्द आणि व्याकरणिक रचना या दोन्ही पातळ्यांवर वरील भाषांमध्ये साम्य आढळते. त्यामुळे या भाषा एका भाषेपासून निर्माण झाल्या आहेत. म्हणजेच एका भाषाकुलातील आहेत असे आपण म्हणू शकतो. वरील सर्व भाषा इंडो-युरोपियन भाषेपासून जन्मलेल्या असल्यामुळे. म्हणून या भाषाकुलाला इंडो-युरोपियन भाषाकुल असे म्हटले जाते.

भाषाकुल संकल्पना समजून घेण्यासाठी या संकल्पनेमागील अभ्युपगम समजून घ्यावा लागतो. (अभ्युपगम म्हणजे एखाद्या विषयाचा पूर्व अनुमान काढणे, गृहीतक धरणे) त्याचा अर्थ आणि अन्वयार्थ आपण समजून घेणे आवश्यक आहे. समजा आज वापरात असलेली किंवा प्राचीन काळच्या दोन किंवा त्याहून अधिक भाषांमधील मूलभूत शब्दकोश, रूपव्यवस्था या बाबतीत विविध प्रकारचे साम्य आढळले आणि ते साम्य त्या साम्यात काही तथ्य असेल तर त्या दोन किंवा अधिक भाषा एका भाषाकुलातल्या आहेत असे गृहीत धरले जाते. हे अभ्युपगम निर्मितीक्षम आहे. अभ्युपगमामुळे पुढील संशोधन शक्य होते.

भाषाकुलाचा विचार करताना 'एक भाषाकुल' या अभ्युपगमाचा प्रथम विचार करावा लागेल, एक भाषाकुल या अभ्युपगमाचा एक अर्थ असा की, ज्या प्रकारची साम्यस्थळे दोन किंवा अधिक भाषांत आढळतात; त्या साम्यस्थळांचा या अभ्युपगमामुळे उलगडा होऊ शकतो. याशिवाय या अभ्युपगमाचा दुसरा निर्मितीक्षम अर्थ असा की, ज्या भाषा आपण एका भाषाकुलातील मानतो; त्या सर्व ऐतिहासिक काळी कोणत्यातरी एका भाषेपासून उत्पन्न झाल्या आहेत आणि ही मूळ भाषा जर माहीत नसेल, तर ती माहीत करुन घेण्याचे प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी पुनर्रचन करावे लागते. हे पुनर्रचन तौलनिक किंवा बहुभाषिक आणि अंतर्गत किंवा एकभाषिक अशा स्वरूपाचे असते. एखाद्या भाषाकुलात ज्या भाषा समाविष्ट केलेल्या आहेत, त्या भाषांत ध्वनिसाम्य व अर्थसाम्य या दोन कसोट्यांना उतरणाऱ्या शब्दांच्या जोड्या जमविणे व त्यांच्या आधारे पुनर्रचना करणे कुलनिश्चीतीसाठी हे काम करावे लागते. हे समजून घेण्यासाठी पुढील उदाहरण पाहू. इंडोयुरोपियन भाषाकुलात संस्कृत, अवेस्ता, ग्रीक, लॅटिन इत्यादी भाषा समाविष्ट आहेत. या भाषांमध्ये आढळणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधून त्या सर्व भाषांच्या मुळाशी जी एक इंडो-युरोपियन भाषा असल्याची कल्पना करता येते. तसेच अत्यंत ध्वनिसाम्य नसतानाही पुनर्रचना करता येते किंवा थोडेबहुत साधर्म्य असणाऱ्या तिसऱ्या भाषेचा पुरावा वापरुन अथवा

ध्वनिविषयक पुरकांची संभाव्यता लक्षात घेऊन व ध्वनिसंवादविषयक तपशील लक्षात घेऊन अशी पुनर्रचना करता येते. यानुसार भाषाकुलांचे वंशवृक्ष ठरविता येतात. एकंदरीत भाषाकुल संकल्पनेमागील अशा स्वरूपाचा अर्थ आणि अन्वयार्थ लक्षात घेऊनच ही संकल्पना भाषांच्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरते.

२अ.३ वर्गीकरणाची तत्त्वे

वर्गीकरण करणे ही मानवी स्वाभाविक प्रवृत्ती आहे. व्यवहारात आपण अनेक गोष्टींचे वर्गीकरण करतो. कोणत्याही गोष्टीचे आधिक्य आणि वैविध्य असले की आपल्याला त्याचे आपोआप वर्गीकरण करावे लागते. त्या मागे मानवी सोय आणि उपयुक्तता असते. ज्ञानक्षेत्रातदेखील अनेक विषयांच्या शाखा आणि उपशाखा असतात. ज्ञान अर्जित करण्यासाठी किंवा त्याची मांडणी करण्यासाठी वर्गीकरण उपयुक्त ठरते. प्रत्येक वर्गीकरणामागे काहीना काही तत्त्व असते. म्हणजे साहित्याचा अभ्यास करताना एकोणिसाव्या शतकातील, विसाव्या शतकातील साहित्य असा अभ्यास आपण करु शकतो. म्हणजे काळ या तत्त्वानुसार आपण साहित्याचे वर्गीकरण करतो. जगभरात जवळपास सात हजार भाषा-बोली आहेत असे अभ्यासकांचे मत आहे. जगातील भाषांची ही प्रचंड संख्या लक्षात घेतल्यास या भाषांचे वर्गीकरण केल्याशिवाय त्यांचा अभ्यास करता येणार नाही. वर्गीकरण केल्यामुळे भाषांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करता येतो. खंड, देश, धर्म, काल, प्रभाव, पंथ, भाषेची रचना आणि वंश किंवा कुल. आजवर अभ्यासकांनी अशा प्रकारची काही तत्त्वे निश्चित केली आहेत, आणि या तत्त्वांनुसार भाषांचे वर्गीकरण झाले आहे. या विविध तत्त्वांच्या आधारे जरी भाषांचे वर्गीकरण करता येत असले तरी भाषावैज्ञानिक अभ्यासाच्या दृष्टीने भाषांतील रचना वा आकृतिवैशिष्ट्यांचे साम्य लक्षात घेऊन केलेले आकृतिमूलक वर्गीकरण, तसेच रचना शब्दांतील अर्थ आणि ध्वनी यांचे साम्य लक्षात घेऊन केलेले वांशिक किंवा पारिवारिक वर्गीकरण महत्त्वाचे मानले गेले आहे.

आकृतिमूलक वर्गीकरण :

एखाद्या भाषेतील मूळ शब्द व त्यांना लागणारे प्रत्यय यांच्या परस्पर संबंधावर हे वर्गीकरण आधारलेले आहे. प्रत्येक भाषेची आकृती किंवा प्रकृती, तिचे स्वरूप म्हणजेच तिची वाक्यरचना असते हे लक्षात घेऊन हे वर्गीकरण केले जाते. या वर्गीकरणाला 'प्रकृतिप्रत्ययान्वित' वर्गीकरण असेही म्हणतात. प्रत्येक भाषेतील शब्दांचे मूळ व त्यांना लागणारे लिंग, वचन, काळ, विभक्ती यांचे प्रत्यय व उपसर्ग यांचे परस्पर संबंध विशिष्ट नियम आणि पद्धतीवर आधारित असतात. शब्द वा पद हा वाक्यातील सार्थ घटक असल्यामुळे वाक्यामध्ये शब्दांची योजना विशिष्ट नियमांना अनुसरुन विशिष्ट पद्धतीने होत असते. कर्ता, कर्म, क्रियापदांची वाक्यातील स्थाने प्रत्येक भाषेत ठरलेली असतात. याला रूपात्मक, रचनात्मक, पदाश्रित, व्याकरणिक अशाही नावांनी ओळखले जाते. श्लेगेल या भाषाभ्यासकाने अशा पद्धतीने वर्गीकरण करुन भाषांचे सहा प्रकार स्पष्ट केले आहेत. त्या प्रकारांचा आधार घेऊन बॉप, ग्रिम, श्लायशर, पॉट या भाषाभ्यासकांनी भाषांचे अयोगात्मक व योगात्मक या दोन गटात वर्गीकरण केले.

१) अयोगात्मक भाषा :

ज्या भाषांबाबत प्रकृती व प्रत्यय यांचा अयोग म्हणजेच जुळणी होत नाही त्यांना अयोगात्मक भाषा असे म्हणतात. या भाषांमध्ये शब्द त्यांच्या मूळ रूपात जसेच्या तसे राहतात. प्रत्यय लागून त्यांच्यात बदल होत नाही. पदांना लिंग, वचन, काळ, अर्थ इत्यादी साठी प्रत्यय न लागता स्वतंत्र शब्दच लावून ते काम केले जाते. प्रकृती-प्रत्यय म्हणजे मूळ शब्द आणि प्रत्यय असे विभाजन करण्याची येथे गरजच भासत नाही. म्हणूनच या गटातील भाषांना अवयव नसलेल्या, निरवयवी भाषा असेही म्हणतात. या गटात चिनी, सयामी, सुदानी, तिबेटी, ब्रह्मदेशी या भाषांचा समावेश होतो.

२) योगात्मक भाषा :

जगातील बहुतेक सगळ्या भाषा या गटात मोडतात. शब्दाची मूळ स्थिती म्हणजेच प्रकृती व त्याला लागणारे प्रत्यय यांच्या जुळणीस म्हणजे योगास या भाषांत महत्त्व असते. अ) अश्लिष्ट योगात्मक भाषा, ब) श्लिष्ट योगात्मक भाषा आणि क) प्रश्लिष्ट योगात्मक भाषा असे तीन गटात योगात्मक भाषांचे विभाजन केले जाते, या तिन्ही विभाजनांचा परिचय करून घेऊ.

अ) अश्लिष्ट योगात्मक भाषा :

वेगवेगळे अर्थपूर्ण शब्द एकमेकांपुढे चिकटविल्यासारखे ठेवून वाक्य तयार करण्याची पद्धती अशा भाषांमध्ये आहे. या प्रकारच्या भाषांसाठी 'शब्दनिगडित' किंवा 'चिकट्या भाषा' अशीही संज्ञा वापरली जाते. अश्लिष्ट योगात्मक भाषांचे पाच वर्गात विभाजन केले जाते. १) अश्लिष्ट पूर्व-योगात्मक, २) अश्लिष्ट मध्य योगात्मक, ३) अश्लिष्ट पूर्वान्त योगात्मक, ४) अश्लिष्ट अन्तयोगात्मक, ५) अश्लिष्ट आंशिक योगात्मक.

ब) श्लिष्ट योगात्मक भाषा :

या भाषांत प्रकृति-प्रत्यय-योग होऊन शब्दांच्या मूळ प्रकृतीचे रूपपरिवर्तन होते, म्हणून या भाषांना विकारी किंवा विभक्तिप्रधान भाषा असेही म्हटले जाते. सिमेटिक हेमिटिक व इंडोयुरोपिय वंशातील प्रमुख भाषा या गटात येतात. या भाषांचे दोन प्रमुख गट केले जातात. १) अंतर्मुखी श्लिष्ट भाषागट व २) बहिर्मुखी श्लिष्ट भाषा गट या दोन्ही गटाचे पुन्हा प्रत्येकी दोन उपगट आहेत. १) संयोगात्मक व २) वियोगात्मक. पैकी अंतर्मुखी श्लिष्ट योगात्मक भाषा या गटातील भाषांत प्रकृति-प्रत्यय यांचे तादात्म्य झालेले दिसते. सेमिटिक हेमिटिक व अरबी भाषा या गटात मोडतात. तर बहिर्मुखी श्लिष्ट योगात्मक भाषा गटातील भाषांत शब्दांच्या मूलप्रकृतीनंतर प्रत्यय जोडले जातात. संस्कृत, ग्रीक, लॅटिन, अवेस्ता इत्यादी इंडोयुरोपीय परिवारातील प्राचीन भाषा संयोगात्मक भाषा येतात. या भाषागटातील अर्वाचीन रुपे ही वियोगात्मक आहेत.

क) प्रश्लिष्ट योगात्मक भाषा :

या भाषात प्रकृति-प्रत्यय इतके एकजीव होतात की, त्यांचे वेगळेपण जाणवतच नाही. त्यांची विभागणी करता येत नाही. या भाषागटाचे १) पूर्व प्रश्लिष्ट व २) आंशिक प्रश्लिष्ट असे दोन उपप्रकार केले गेले आहेत. पैकी पहिल्या उपगटातील भाषांमध्ये प्रकृति-प्रत्यययोग अतिशय

पूर्णावस्थेत असतो. वाक्यच्या वाक्य पूर्ण शब्दासारखे होते. दक्षिण अमेरिकेतील चेरोकी, ग्रीनलँडमधील भाषा याचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. तर दुसऱ्या उपगटातील भाषांत सर्वनाम व क्रियापद यांचा योग होताना क्रिया ही अस्तित्वशून्य होऊन ती सर्वनामाची पूरक होते. पेरिलिज पर्वताच्या पश्चिम भागात बोलली जाणारी बास्क भाषा, फ्रेंच, बंगाली, इंग्रजी, भोजपुरी या भाषा या गटात मोडतात.

वर्गीकरणाचा तात्त्विक आणि व्यावहारिक उपयोग फारसा न केल्यामुळे या वर्गीकरणाचा फारसा विकास होऊ शकला नाही. परंतु वर्णनात्मक भाषाविज्ञानाच्या उदयानंतर 'भाषा ही एक संरचना आहे', 'भाषा एक चिन्ह व्यवस्था आहे.' आणि 'भाषा एक चिन्ह, चिन्हक चिन्हीत संबंध आहे' या तत्त्वांना अनुसरुन भाषाभ्यास होऊ लागला आहे. तेव्हा भाषाभ्यासकांनी या वर्गीकरणाचा आधार घेऊन जागतिक भाषांच्या वर्गीकरणाचा नव्याने विचार करायला हरकत नाही असे वाटते. असे असले तरी ज्या वर्गीकरण संकल्पनेच्या आधाराने ऐतिहासिक भाषाविज्ञान या ज्ञानशाखेचा विकास झाला त्या भाषाकुल संकल्पनेतील मुख्य संकल्पना म्हणून वांशिक किंवा कुलनिष्ठ वर्गीकरण ही संकल्पना ऐतिहासिक भाषाविज्ञानात महत्त्वाची मानली गेलेली संकल्पना आहे. या वांशिक किंवा कुलनिष्ठ वर्गीकरणाची तात्त्विक मीमांसा आपणाला येथे करावयाची आहे.

२अ.४ जगातील प्रमुख भाषाकुले

एखाद्या भाषेच्या अस्तित्वाविषयीचे पुरावे नव्याने उपलब्ध झाले की भाषावैज्ञानिक त्या भाषेचे कुलनिष्ठ वर्गीकरण करण्याचा प्रयत्न करतात. ऐतिहासिक भाषाभ्यासातून जगातील बहुसंख्य भाषांचे कुलनिष्ठ वर्गीकरण केले गेले. या अभ्यासातूनच 'भाषाकुल संकल्पना' विकसित होत गेली आहे. भाषांच्या कुलनिष्ठ वर्गीकरणातून जी प्रमुख भाषाकुले निश्चित करण्यात आली ती खालीलप्रमाणे:

जगातील प्रमुख भाषाकुले

१) इंडो-युरोपियन किंवा आर्य भाषाकुल

२) सेमिटिक भाषाकुल

३) सिनो-तिबेटिअन भाषाकुल

४) द्राविडी भाषाकुल

५) ऑस्ट्रो आशियाई भाषाकुल:

६) फिनो उग्रिक भाषाकुल

७) अल्ताईक भाषाकुल:

८) कॉकेशस भाषाकुल :

९) मलायो-पॉलिनिशियन :

१०) जपानी-कोरियन भाषाकुल :

१) इंडो-युरोपियन किंवा आर्यभाषाकुल:

युरोपातील व उत्तर भारतातील भाषांचा समावेश या कुलात प्रामुख्याने केला जातो. भाषाभ्यासात सर्वप्रथम इंडो-युरोपियन या भाषाकुलाची संकल्पना मांडली गेली. या कुलांतील भाषांचा अभ्यास करताना ऐतिहासिक भाषा अभ्यास पद्धतीचे स्वरूप स्पष्ट झाले. 'संस्कृत' ही या कुलातील महत्त्वाची भाषा मानली गेली आहे. याच भाषाकुलाचा सविस्तर विचार आपण करणार आहोत.

२) सेमिटिक भाषाकुल :

या कुलातील हेमिटिक गटात प्राचीन इजिप्शियन, कॉप्टिक भाषा, तसेच बार्बार व चाड या अर्वाचीन भाषा येतात तर सेमिटिक गटात अक्काडिअन व फिनिशिअन या प्राचीन हिब्रू व अरबी या अर्वाचीन भाषा मोडतात. ग्रीनबर्ग या अभ्यासकाने हेमिटो सेमिटिक भाषाकुलाला' ॲफ्रो-ओशियायी' भाषाकुल असे नाव दिले आहे. या नावावरुनच हेमिटो सेमिटिक गटाचा भौगोलिक विस्तार स्पष्ट झालेला आहे.

३) सिनो-तिबेटिअन भाषाकुल:

आशिया खंडात या कुलातील भाषा बोलल्या जातात. बर्मी, तिबेटी, थायी आणि चीनमध्ये बोलल्या जाणाऱ्या भाषांचा समावेशही याच भाषाकुलात केला गेला आहे. या भाषाकुलाला त्याच्या भौगोलिक विस्तारावरून 'इंडो-चायनीज' भाषाकुल असेही नाव दिले जाते.

४) द्राविडी भाषाकुल:

दक्षिण भारतातील तामिळ, तेलगु, कानडी, मल्याळम या द्राविडी भाषाकुलातील प्रमुख भाषा आहेत. १८व्या शतकापर्यंत द्रविडी भाषाकुल संस्कृतोद्भव भाषाकुल मानले जात होते. रास्क व काल्डवेल या अभ्यासकांनी द्राविडी भाषा या इंडो-युरोपियन भाषाकुलातील नसून त्यांचे वेगळे कुल आहे असा विचार मांडला. इंडो-युरोपियन भाषा बोलणारे लोक भारतात येण्यापूर्वी या कुलातील भाषा भारतभर बोलल्या जात असाव्यात. तसेच पूर्व बलुचिस्तानातील ब्राहुई भाषा(Brahui) याच कुलातील आहे.

५) ऑस्ट्रो आशियाई भाषाकुल:

भारताच्या पूर्व भागात बोलल्या जाणाऱ्या मुंडा शाखेतील भाषा, ब्रह्मदेशातील मॉन-ख्मेर शाखा आणि अनाम-मुआंग शाखा यांचा या भाषाकुलात समावेश होतो. परंतु या शाखांचे कुलनिष्ठ संबंध निश्चित झालेले नाही.

६) फिनो उग्रिक भाषाकुल:

या भाषाकुलाला उरालिक (Uralic) भाषाकुल असेही नाव आहे. फिनी, हंगेरियन, लपिश व सॅमोपेड या भाषा या कुलातील आहेत.

७) अल्ताईक भाषाकुल:

तुर्की, मंगोल, मांचू या भाषा या कुलातील आहेत. या भाषाकुलाचा वरील फिनो-उग्रिक भाषाकुलांशी संबंध दाखवून काही भाषावैज्ञानिक या दोन कुलांचे 'उरल-अल्ताईक' भाषाकुल असेही नामकरण करतात पण ही भाषाकुले एकमेकांशी संबंधित नाहीत, असे अभ्यासकांचे मत आहे.

८) कॉकेशस भाषाकुल :

कास्पियन समुद्र, काळा समुद्र, कॉकेशस् पर्वत या प्रदेशात या कुलातील भाषा बोलल्या जातात. जॉर्जियन ही या कुलातील महत्त्वाची भाषा तसेच चेचेयन लेनी, सरकशी (उत्तर कॉकेशस), स्वानी, मिंगरेली भाषा या कुलातील प्रमुख भाषा होत.

९) मलायो-पॉलिनिशियन :

जावा, सुमात्रा, बोर्निया, सिलबिज, फिलिपिन्स, बाली, न्यूझीलंड, सॅमोआ, हवाई, ताहिनी, मादागास्कर, मलायट्रीप आणि प्रशांत महासागरातील अनेक बेटे या परिवाराशी निगडित आहेत. इंडोनेशियन व पॉलिनिशियन ह्या प्रमुख भाषा या कुलातील भाषा आहेत.

१०) जपानी-कोरियन भाषाकुल :

जपान, कोरिया, फार्मासा, मंधुको, केरोलीन आणि मार्शल बेटे इत्यादी ठिकाणी या कुलातील भाषा बोलल्या जातात. जपानी भाषा ही या कुलातील मुख्य भाषा आहे.

वरील दहा भाषाकुलाशिवाय अमेरिकेतील मूळ भाषा, ऑस्ट्रेलियातील भाषा, आफ्रिकेतील भाषा, यांचेही स्वतंत्र भाषा कुल मानलेले आहेत. तसेच सुमेरिअन व इट्रस्कन या प्राचीन भाषा व उत्तर स्पेनमध्ये आज बोलली जाणारी बास्कभाषा या अशा ‘एकाकी भाषा’ आहेत. या भाषांचा इतर भाषांशी कोणताही संबंध नसल्याने त्यांचे कुलनिष्ठ वर्गीकरण करणे शक्य झाले नसावे असे मानले जाते. या खेरीज अत्युतरी भाषाकुल, सुदानी भाषा, बन्टू भाषाकुल, होतेन्तोत-बश्शुमन भाषाकुल, पापुवता भाषाकुल इत्यादी भाषाकुलांचाही उल्लेख केला जातो. भारताच्या वायव्येला बोलली जाणारी बररूशस्की भाषा आणि न्यू-गिनी व आसपासच्या बेटांत बोलल्या जाणाऱ्या पॉप्युअन भाषा यांचेही कुलनिष्ठ वर्गीकरण केले गेले नाही. यानंतर आपण इंडो-युरोपियन भाषाकुल समजावून घेऊ.

२अ.५ इंडो युरोपिअन भाषाकुल

या भाषाकुलाबद्दल आपण वर अल्पशी माहिती घेतली आहे. भाषाभ्यासात सर्वप्रथम इंडो-युरोपियन या भाषाकुलाची संकल्पना मांडली गेली. या कुलांतील भाषांचा अभ्यास करताना ऐतिहासिक भाषा अभ्यास पद्धतीचे स्वरूप स्पष्ट झाले. 'संस्कृत' ही या कुलातील महत्त्वाची भाषा मानली गेली आहे. पूर्वेकडील भारतापासून ते पश्चिमेला आईसलंड या देशापर्यंत या भाषाकुलाचा विस्तार आहे. या भाषाकुलातील सर्व भाषांचा भाषावैज्ञानिक अभ्यास झालेला आहे. जवळपास सर्वच शाखांमधील भाषेचे प्राचीन नमुने उपलब्ध आहेत. कुलाच्या

अनुषंगाने परस्परांशी असलेले संबंध निश्चित झाले आहेत. या भाषाकुलाला इंडो- जरमॅनिक अथवा आर्य भाषाकुल असेही म्हटले जाते.

'संस्कृत' ही या कुलाची केंद्रवर्ती भाषा असल्यामुळे 'संस्कृत भाषा कुल' म्हणूनही या कुलाचा निर्देश केला जातो. भारत युरोपीय भाषांच्या मुळाशी ही एकच भाषा असल्याचे भाषाभ्यासकांनी सप्रमाण सिद्ध केल्यामुळे बाकीची नावे मागे पडून 'भारत-युरोपीय भाषाकुल' हेच नाव सर्वमान्य झाले आहे. अर्थात हे नाव देखील सदोष अशा स्वरूपाचे नाव आहे. कारण भारत आणि युरोपात फक्त याच भाषाकुलातील भाषा बोलल्या जातात असे नाही, तर दक्षिण भारतात द्राविडी कुलातील भाषा बोलल्या जातात. शिवाय या कुलातील भाषा इतर काही देशातही बोलल्या जातात. परंतु हे नाव सदोष असूनही आज ते प्रचलित झाले आहे. या भाषाकुलातील 'संस्कृत' या मुख्य भाषेच्या अभ्यासानंतर मॅक्समूलर सारख्या अभ्यासकांनी 'आर्यभाषाकुल' या नावांचाही वापर केला. परंतु हे नाव प्रचलित न होता इंडो-युरोपिअन भाषाकुल या नामाभिधानानेच हे भाषाकुल प्रसिद्ध झालेले आहे. या भाषाकुलात युरोप आणि आशिया खंडातील बहुतेक प्रमुख अशा अनेक भाषांचा समावेश होतो.

इंडो युरोपिअन भाषाकुलातील भाषांची काही वैशिष्टये

१. या गटातील भाषांच्या शब्दांची व्युत्पत्ती एखाद्या क्रियाधातूपाशी येऊन पोहचते. इथून अर्थदृष्ट्या अधिक पृथ:करण करणे शक्य नसते. जर अधिक पृथ:करण करायचे झाल्यास ते ध्वनीदृष्ट्या करता येते.

२. इंडो-युरोपिअन भाषाकुलांतील भाषांत नामे व क्रियापदे सर्व साधारणत: भिन्न असतात. नामांचे आणि क्रियापदांचे प्रत्यय वेगळे असतात, त्यांची घटना वेगळी असते.

३. शब्दांचे प्रत्यय गाळून त्यांचा एक सामासिक शब्द बनविण्याची प्रवृत्ती इंडो-युरोपिअन भाषाकुलामध्ये दिसून येते.

४. या कुलातील भाषांमध्ये स्वभावानुवृत्ती हा गुण दिसून येतो. भाषा मूळ भाषेपासून कितीही दूर गेल्या तरी मातृभाषेचा ठसा स्पष्टपणे उमटलेला दिसून येतो.

५. या कुलातील भाषांच्या व्याकरणात विसंगतीपेक्षा नियमबद्धता दिसून येते.

इंडोयुरोपिअन भाषाकुले

इंडो युरोपिअन भाषाकुलाच्या दहा शाखा

१) भारत-इराणी शाखा (इंडो इरानिअन)
२) बाल्टो - स्लॉविक शाखा
३) आर्मिनिअन शाखा
४) आल्बेनियम शाखा
५) ग्रीक किंवा हेलेनिक शाखा
६) इटालिक किंवा रोमन शाखा
७) केल्टिक शाखा
८) जरमॅनिक शाखा
९) तुखारी शाखा
१०) हिटाइट शाखा

इंडो युरोपिअन भाषाकुलाची एकूण दहा शाखांमध्ये विभागणी होते ती खालीलप्रमाणे -

१) भारत-इराणी शाखा (इंडो इरानिअन):

इंडो-युरोपिअन भाषाकुलातील इंडो इरानिअन ही प्रमुख शाखा असून मराठी भाषा याच शाखेतील भाषा मानली गेली आहे. इंडो इरानिअन शाखेला 'आर्यन शाखा' असेही म्हटले जाते. या इंडो इरानिअन शाखेचे दोन प्रवाह आहेत १.आर्यभारतीय भाषा (वैदिक संस्कृत) २. प्राचीन इराणी भाषा. या दोन भाषांमधले साम्य लक्षात घेता या भाषा बोलणारे लोक पूर्वी इराणमध्ये एकत्र राहिले असावेत आणि एकच भाषा बोलत असावेत. आर्य भारतीय भाषागटात प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन भारतीय भाषांचा समावेश होतो.

२) बाल्टो – स्लाविक शाखा:

इंडो-युरोपिअन भाषाकुलातील हा महत्त्वाचा भाषागट आहे. या भाषागटाच्या बाल्टिक आणि स्लाव्हिक अशा दोन उपशाखा आहेत. बाल्टिक समुद्राच्या आसपासच्या परिसरात बोलली जाणारी भाषा म्हणून 'बाल्टो' हे नाव या भाषेला मिळाले आहे. या शाखेत लिथुआनियम आणि लॅटिश या भाषांचा समावेश आहे. लिथुआनियन भाषेचे सोळाव्या शतकापासूनचे भाषिक नमुने उपलब्ध आहेत. या भाषेत नामाची विभक्तिरूपे वैदिक संस्कृतप्रमाणे चालतात. वैदिक संस्कृतमध्ये आढळणारा व उत्तरकालीन अभिजात संस्कृतमध्ये लोप पावलेला सुराघात या भाषेने टिकवलेला आहे. परंतु या शाखेच्या प्राचीन पर्शिअन व लॅटिश या भाषांत हा सुराघात आढळत नाही. त्यांच्या प्रयत्नांचे स्वरूपही लिथुआनियमपेक्षा वेगळे आहे. प्राचीन पर्शिअन आज अस्तित्वात नाही. तिची जागा जर्मन व लिथुआनियम या भाषांनी घेतली आहे. लेटिश भाषा व तिच्या बोली मात्र आजही बोलल्या जातात.

स्लाविक या उपशाखेचा प्राचीन नमुना नवव्या शतकातील आहे. या शाखेच्या प्राचीन अवस्थेला 'प्राचीन ख्रिस्ती स्लॉविक' किंवा 'प्राचीन बल्गेरिअन' असे नाव आहे. या भाषेत बायबलचे भाषांतर केले गेले. या शाखेच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण अशा तीन उपशाखा आहेत. पैकी पूर्व वर्गातील महत्त्वाच्या रशियन भाषेतून विविध प्रकारची साहित्य निर्मिती झालेली आहे. राजकारण, कला, विज्ञान अशा जीवनसन्मुख ज्ञानशाखांत या भाषेचा अग्रक्रमाने वापर करण्यात येतो. सोव्हिएत राज्याची 'राष्ट्रभाषा' होण्याचा सन्मान या भाषेला मिळाला आहे. बल्गेरिअन, झेक, पोलिश, रशियन इत्यादी भाषा या शाखेतील अर्वाचीन भाषा आहेत. बाल्टिक व स्लाविक या उपशाखांत मोठ्या प्रमाणावर साधर्म्य आढळते.

३) आर्मिनिअन शाखा :

प्राचीन आर्मिनिअनमध्ये प्रामुख्याने ख्रिस्ती धर्मग्रंथांची भाषांतरे झालेली आहेत. प्राचीन आर्मिनिअन एकोणिसाव्या शतकापर्यंत लेखनाची भाषा म्हणून वापरली जात होती. या भाषेवर अन्य भाषांचा विशेषतः इराणी भाषेचा प्रभाव आहे. यामुळेच आर्मिनिअमला इराणी भाषेची बोली बोलले जाते. अर्वाचिन आर्मिनिअनच्या दोन शाखा आहेत १.पूर्व शाखा आर्मिनिआत आणि इराणमध्ये बोलली जाते. २.पश्चिमी शाखा तुर्कस्तानात बोलली जाते. आदान-प्रदान प्रक्रियेमुळे या भाषेत इराणी शब्द मोठ्या प्रमाणात आढळतात.

४) आल्बेनियम शाखा :

आल्बेनियम भाषेतील प्राचीन नमुने उपलब्ध नाहीत. जे उपलब्ध आहेत ते अलीकडचे आणि तुरळक आहेत. तिचा इतिहास सर्वसाधारणतः १४ व्या शतकापासून सांगता येतो. या भाषेवर लॅटिन, ग्रीक, स्लाविक व तुर्की भाषांचा परिणाम झालेला आहे. या भाषेचा शब्दसंग्रह लॅटिनशी मिळता जुळता आहे. एशियाटिक समुद्राच्या पूर्वेकडील पर्वतीय प्रदेशात ही भाषा बोलली जाते. ही भाषा प्रामुख्याने आल्बेनियात बोलली जाते.

५) ग्रीक किंवा हेलेनिक शाखा :

या भाषा गटातील भाषा ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या असल्या तरी आज फार थोडे लोक या भाषा बोलतात. ग्रीस, सायप्रस व तुर्कस्तानात तुरळकपणे ग्रीक भाषा बोलतात. ग्रीक भाषेतील प्राचीन नमुने इ.स.पूर्व १४५० ते १२०० या काळातील आहेत. मातीच्या शिक्क्यांवरील हे नमुने 'मासेनिअन ग्रीक' म्हणून ओळखले जातात. ग्रीसची प्राचीन संस्कृती व परंपरा जपणाऱ्या ग्रीस बोलीतून ग्रीक भाषेची निर्मिती झाली. या भाषेतील सामासिकता, प्रत्यय, लिंग, वचने अशा काही गोष्टी संस्कृतसारख्याच आहेत. या भाषेला प्राचीन संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे. ही भाषा अल्बेनियाचा भाग, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया, एजियन सामुद्रिक बेटे अशा काही क्षेत्रात वापरली जाते. 'कोईने' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रमाण बोलीपासूनच आजची ग्रीक भाषा निर्माण झाली आहे.

६) इटालिक किंवा रोमन शाखा :

ही शाखा मूळ लॅटिनपासून झालेली असल्याने या शाखेला लॅटिन शाखा असेही म्हणतात. इटालिक शाखेचे ओस्कन उम्ब्रिअन आणि लॅटिन-फॅलिस्कन असे दोन वर्ग केले जातात. रुमानिया, स्पॅनिश, फ्रेंच या भाषांचा समावेश या शाखेत होतो. कॅथॉलिक ख्रिश्चन धर्मप्रसाराचे माध्यम म्हणून हीच भाषा वापरली जाते. या भाषेतून उच्च दर्जाची साहित्यनिर्मितीही झाली आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात या भाषेचा वापर होतो. या भाषेचा प्रभाव वर्तनातही दिसतो. दक्षिण अमेरिकेस आजही लॅटिन अमेरिका म्हटले जाते. ग्रीसमधील ॲटिक बोलीप्रमाणे फ्लॉरेन्स शहरात बोलल्या जाणाऱ्या लॅटिनला महत्त्व प्राप्त झाले आहे. इटलीमधील अन्य बोली प्रचारातून नाहीशा झाल्या आहेत. लॅटिन ही ग्रांथिक भाषा असली तरी तिची बोलीही प्रचारात होती. तिला व्यावहारिक लॅटिन असे म्हणतात. या व्यावहारिक लॅटिनपासूनच इटालिअन फ्रेंच, स्पॅनिश, पोर्तुगीज व रूमेनिअम भाषा निर्माण झाल्या.

७) केल्टिक शाखा :

या भाषेचे प्राचीन नमुने उपलब्ध नाहीत. ही शाखा इटालिक शाखेशी आपले साम्य दर्शविते. या शाखेच्या दोन उपशाखा आहेत. १) गेलिक शाखा व २) ब्रिटानिक शाखा. गेलिक शाखेत आयर्लंडमधील आयरिश भाषेचा समावेश होतो. तर ब्रिटानिक शाखेत इंग्लंडच्या वेल्स भागात बोलली जाणारी वेल्शी आणि फ्रान्सच्या उत्तरेकडील ब्रिटानिआ वसाहतीतील ब्रेटन या भाषांचा समावेश होतो.

८) जरमॅनिक शाखा :

या शाखेची तीन उपशाखेत विभागणी केली जाते.

१) पूर्वशाखा : या शाखेतील सर्वात प्राचीन नमुना इसवी सनाच्या चौथ्या शतकातील गोथिक भाषेतील आहे. गोथिक ही पूर्व शाखेतील भाषा आहे. परंतु आज तिची अर्वाचीन अवस्था उपलब्ध नाही. पश्चिम जर्मेनिक शाखेतील जर्मनने आज गोथिकची जागा घेतली आहे.

२) पश्चिम शाखा : पश्चिम शाखेचे हाय जरमॅनिक, लो जरमॅनिक व अँग्लो फ्रिझिअन असे गट आहेत. जर्मन ही हाय जरमॅनिक शाखेतील प्रमुख भाषा आहे, तर डच आणि इंग्रजी या अनुक्रमे लो जरमॅनिक आणि ॲंग्लो फ्रिझिअन शाखातील महत्त्वाच्या भाषा आहेत.

३) उत्तर शाखा : आइस्लॅंडिक, स्वीडिश, नॉर्वेजिअन व डेनिश या भाषांचा समावेश जरमॅनिक शाखेच्या उत्तर शाखेत होतो.

९) तुखारी शाखा : इसवी सनाच्या सहाव्या ते आठव्या शतकात लिहिलेली बौद्धधर्मीय हस्तलिखिते ही तुखारी भाषेचे उपलब्ध प्राचीन नमुने होत. ही हस्तलिखिते मध्य आशियातील चिनी तुर्कस्तानमध्ये १९ व्या शतकाच्या अखेरीस सापडली. या भाषेच्या दोन बोली आहेत. यातील पूर्वेकडील बोलीला 'अग्नी' (Agnean) व पश्चिमेकडील बोलीला 'कुची' (Kuchean) म्हणतात. भारतीय व ग्रीक भाषेशी या भाषेचा संबंध होता.

१०) हिटाइट शाखा :.

या शाखेतील भाषिक नमुना इ.स. पूर्व १७०० ते १२०० मधील आहे. हिटाईट भाषेत लिहिलेल्या मातीच्या विटा विसाव्या शतकात तुर्कस्तानातील उत्खननात सापडल्या. या शाखेतील भाषांना ॲनटोलिअन असेही म्हणतात. या कुलाच्या आठ शाखा निश्चित केल्या आहेत. हिटाइट शाखेच्या इंडो-युरोपिअन भाषाकुलातील भाषांचे स्थान कोणते याबाबत अभ्यासकात दोन मतप्रवाह आहेत. संस्कृत, ग्रीक व भाषांप्रमाणे लॅटिश हिटाइट भाषा इंडो-युरोपियन भाषेपासून निर्माण झाली असे मानणारा एक मतप्रवाह आहे. तर हिटाइट भाषा बोलणारे भाषिक समाजगट इंडो-युरोपियन भाषा बोलणाऱ्या भाषिक समाजगटापासून प्रथम वेगळे झाले असावेत म्हणून हिटाइट भाषेचे स्वरूप संस्कृत ग्रीक इत्यादी भाषांपेक्षा प्राचीन आहे; असे मानणारा दुसरा मतप्रवाह या भाषेच्या संदर्भात आहे.

इंडो-युरोपियन भाषाकुलाचे वर सांगितल्याप्रमाणे दहा शाखांमध्ये वर्गीकरण करतात. त्याचप्रमाणे भाषावैज्ञानिक आणखीही अनेक प्रकारे या भाषाकुलातील भाषांचे वर्गीकरण करतात. या पैकी 'सातम्' वर्ग व 'केन्तुम्' वर्ग हे वर्गीकरण समजावून घेऊ.

'सातम' वर्ग व 'केन्तुम्' वर्ग -

हे वर्गीकरण ध्वनीविशेषांवरून केले जाते. इंडो-युरोपियन भाषेतील तालव्य स्पर्शध्वनी इंडो-युरोपियन भाषाकुलाच्या काही शाखांमध्ये घर्षक उच्चारला जातो. तर काही शाखांमध्ये स्पर्शच राहातो. उदाहरणार्थ - 'शंभर' या अर्थी शब्द, या कुळातील काही भाषांत 'सातम्' (Satem) तर काही भाषांत केन्तुम् (Lrmyim) असा उच्चारला जातो. मूळ इंडो-युरोपियन

भाषेतील 'क' या स्वनाचा अवेस्ता भाषेत 'स' होतो तर लॅटिनमध्ये 'क' होतो. या स्वनपरिवर्तनाच्या आधारे इंडोयुरोपियन भाषाकुलातल्या भाषांची विभागणी 'सातम्' वर्ग व 'केन्तुम' वर्ग अशी केली जाते. 'सातम्' वर्गात पूर्वेकडील शाखा समाविष्ट होतात तर 'केन्तुम्' वर्गात पश्चिमेकडील शाखा समाविष्ट होतात असे मानले जाई. पण तुखारी व हिटाइट शाखांचा शोध लागल्यानंतर पौर्वात्य-भाषा (सातम् वर्ग) व पश्चिमेकडील भाषा (केन्तुम वर्ग) हे भौगोलिक वर्गीकरण बदलावे लागते. तुखारी व हिटाइट या शाखा भौगोलिक दृष्ट्या पूर्वकडील असूनही स्वनपरिवर्तन विचारात घेतल्यास त्यांचा समावेश पश्चिमेकडील 'केन्तुम्' वर्गात करावा लागतो.

स्वनपरिवर्तनावर आधारलेले हे वर्गीकरण फार महत्त्वाचे आहे. 'सातम्' वर्गात इंडो-इरानियन, बाल्टोस्लाव्हिक, आर्मिनियन व आल्बेनियन शाखांचा समावेश होतो. 'केन्तुम्' वर्गात ग्रीक, इटालिक, जर्मेनिक, केल्टिक, तुखारी आणि हिटाइट या भाषा येतात.

इंडो-युरोपियन भाषा बोलणाऱ्या समूहाचे मूळ वसतिस्थान कोणते याविषयी अनेक मते मांडली जातात. मध्ये आशिया, स्कँडिनेव्हिया, पूर्व जर्मनी आणि पोलंड यांच्या सीमारेषा मिळतात. तो मध्यम युरोपचा भाग अशी वेगवेगळी भौगोलिक स्थाने मूळ वसतिस्थान म्हणून दिली जातात. इंडो-युरोपियन भाषाकुलातील भाषांमध्ये असणारी साम्यस्थळे लक्षात घेता इंडो-युरोपिअन भाषा बोलणारे लोक प्रथम एकत्र राहत असावेत व इतर त्यांच्या वेगवेगळ्या टोळ्या परस्परांपासून दूर गेल्यावर मूळ भाषेत फरक पडून नव्या भाषा उदयाला आल्या असाव्यात. असा अंदाज मांडला जातो. इंडो- युरोपिअन भाषा इ. स. पूर्व ३००० वर्ष बोलली जात असावी व इ. स. पूर्व २००० च्या आसपास तिच्या वेगवेगळ्या शाखा होण्यास प्रारंभ झाला असावा.

२अ.६ इंडो-इरानिअन भाषाकुल

इरानिअन शाखेचे १) इराणी शाखा आणि २) आर्य भारतीय शाखा असे दोन विभाग होतात. या शाखेला 'आर्यशाखा' असेही म्हटले जाते. प्राचीन आर्यभारतीय भाषा वैदिक संस्कृत आणि प्राचीन इराणी भाषा या भाषांतील साम्य लक्षात घेतल्यास या दोन भाषा बोलणारे भाषिक समाज पूर्वी इराणमध्ये एकत्र राहिले असावेत आणि एकच भाषा बोलत असावेत असे अनुमान या भाषांच्या अभ्यासाने करण्यात आले आहे.

१) इराणी शाखा :

इराणी शाखेच्या प्राचीन, मध्य व अर्वाचीन अशा तीन अवस्था आहेत. प्राचीन इराणीचे पूर्वेकडील बोली आणि दक्षिणेकडील बोली असे उपविभाग होतात. 'इराणी' हा शब्द 'आर्याणाम' या शब्दाचा अपभ्रंश असल्यामुळे ही भाषा आर्यभाषाकुलातीलच भाषा ठरते. इराण प्रांतात आर्यांची वस्ती असल्याचे काही अभ्यासकांचे मत आहे. प्राचीन वैदिक संस्कृत विशेषतः ऋग्वेद आणि प्राचीन इराणमधील अवेस्ता या भाषेतील साम्य लक्षणीय आहे. अवेस्ताची निर्मिती इ.स.पू. सातव्या शतकातील असून या ग्रंथातील गाथांचे स्वरुप ऋग्वेदातील प्रार्थनास्तोत्रांप्रमाणे आहे. या दोन ग्रंथातील साम्य प्राचीन संस्कृत आणि प्राचीन इराणीतही दिसून येते. प्राचीन इराणीचे पूर्वेकडील बोलीत पारशी धर्मग्रंथांची अवेस्ता भाषा येते. अवेस्तांच्या 'गाथांची भाषा आणि गाथोत्तर भाषा' अशा दोन अवस्था

आहेत. पश्चिमेकडील इराणी भाषेत प्राचीन पर्शिअन भाषा येते. या भाषेतील साहित्य उपलब्ध नाही. मात्र इ.स. पूर्व चौथ्या-पाचव्या शतकातील शिलालेख उपलब्ध आहेत. अवेस्ताप्रमाणे प्राचीन पर्शिअनचे वैदिक संस्कृतशी साम्य आहे. प्राचीन पर्शिअनची मध्ययुगीन अवस्था म्हणजे पहलवी आणि अर्वाचीन अवस्था म्हणजे इराणमध्ये आज बोलली जाणारी पर्शिअन भाषा होय. अर्वाचीन पर्शिअन भाषेत विपुल साहित्य निर्मिती झालेली असून या भाषेचे स्वरूप 'अयोगात्मक' आहे. अरबी शब्दांचा भरणाही या भाषेत येतो. अवेस्ताची मध्ययुगीन अवस्था उपलब्ध नाही. पूर्वेकडील अर्वाचीन भाषांचा समावेश यात होतो. याशिवाय पंजाबकडे बोलली जाणारी 'दार्दिक' किंवा 'दरदीय' भाषा ही इराणीशी संबंधित असल्याचे काही अभ्यासकांचे मत आहे. या भाषेला इंडो-इरानियन शाखेची तिसरी उपशाखा मानावी असे काही अभ्यासकांचे मत आहे. 'दार्दिक' या खोवारी, वाखी उपशाखेत काश्मिरी खोवारी, काफिरीसारख्या भारताच्या वायव्यकडे बोलल्या जाणाऱ्या भाषांचा समावेश होतो.

२) आर्यभारतीय शाखा :

या शाखेच्या प्राचीन, मध्य आणि अर्वाचीन अवस्था आहेत. प्राचीन अवस्थेत वैदिक संस्कृत आणि पाणिनी उत्तरकालीन संस्कृत किंवा अभिजात संस्कृत अशा दोन भाषिक अवस्था येतात. तर मध्य अवस्थेत प्राकृत आणि अपभ्रंश अवस्थांचा समावेश होतो आणि अर्वाचीन अवस्थेत मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती इत्यादी आज बोलल्या जाणाऱ्या भारतीय भाषांचा समावेश होतो.

२अ.७ आर्यभारतीय शाखा

आर्यभारतीय शाखेच्या तीन अवस्था पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. प्राचीन अवस्था २. मध्य अवस्था ३. अर्वाचीन अवस्था

प्राचीन अवस्था : आर्यभारतीय शाखेतील प्राचीन भाषा म्हणजे संस्कृत. या संस्कृतचेही वैदिक संस्कृत व पाणिनी उत्तरकालीन किंवा अभिजात संस्कृत असे कालिक भेद मानले आहेत.

वैदिक संस्कृत : वैदिक संस्कृतच्या काळाविषयी नेमका अंदाज बांधता येत नसला तरी ही भाषा इ.स. पूर्व १५०० ते १००० या काळात बोलली जात असावी असा अभ्यासकांचा तर्क आहे. तो सर्वांनीच गृहीत धरला आहे. वैदिक साहित्याच्या अंतर्गत संहिता, ब्राह्मणग्रंथ, आरण्यक व उपनिषदे यांची गणना होते. वैदिक संस्कृतचा प्राचीन नमुना म्हणून ऋग्वेदाचा दाखला दिला जातो.

पाणिनी संस्कृत : अभिजात संस्कृतचा कालखंड सर्वसाधारणतः इ.स. पूर्व १००० ते इसवी सनाचे चौथे- पाचवे शतक मानला जातो. पाणिनी – उत्तरकालीन संस्कृत म्हणजे वैदिक भाषेचीच पुढची अवस्था आहे. म्हणून वैदिक आणि तिच्यामध्ये मूलभूत भेद नाही.

मध्य अवस्था :

मध्य अवस्थेत प्राकृत आणि अपभ्रंश भाषांचा विचार केला जातो. प्राकृत शब्दाने निरनिराळ्या भाषांचा म्हणजे मागधी, अर्धमागधी, महाराष्ट्री, शौरसेनी इत्यादी भाषांचा बोध होतो. परंतु खरी प्राकृत म्हणजे एक बाकीचे भेद देशभेदानेच झालेले आहेत. एका मतानुसार संस्कृत भाषेपासून निघालेल्या भाषांपैकी संस्कृताशी विशेषतः वैदिक संस्कृताशी अत्यंत सदृश असलेली भाषा म्हणजे पाली ही होय. या भाषेला बौद्धमागधी असेही संबोधिले जाते.

प्राकृत भाषा : इ.स. पूर्व ६०० ते इ.स. ६०० हा प्राकृत भाषांचा कालखंड इ.स. २०० ते इ.स. ६०० पर्यंतच्या कालखंडातील प्राकृत भाषा म्हणजे पैशाची, शौरसेनी, मागधी, महाराष्ट्री या संस्कृत नाटकातून प्रकट झालेल्या भाषा.

अपभ्रंश भाषा : इ.स. पूर्व ६०० ते इ.स. ६०० हा प्राकृत भाषांचा कालखंड. प्राकृत भाषांमध्ये विपुल साहित्यनिर्मिती झाली. वररुचि आणि हेमचंद्र यांनी प्राकृत भाषेचे व्याकरण रचून प्राकृतच्या लिखित स्वरूपाला स्थैर्य देण्याचा प्रयत्न केला. परंतु व्यवहारातील प्राकृत भाषा मात्र बदलतच राहिल्या आणि इ.स. ४०० च्या आसपास प्राकृत भाषा लुप्त होऊन अपभ्रंश भाषांचा कालखंड सुरू झाला. पैशाची अपभ्रंश, शौरसेनी अपभ्रंश, मागधी अपभ्रंश, महाराष्ट्री अपभ्रंश अशा अपभ्रंश बोली त्या त्या प्राकृत भाषेपासून निर्माण झाल्या.

(आर्यभारतीय शाखा या घटकाचे विस्ताराने विश्लेषण घटक ३ मध्ये आपणास पाहायला मिळेल. तसेच या घटकाशी संबंधित असणारा 'अंतर्-बहिर्वर्तुळ सिद्धांत' आपण घटक ३ मध्ये विस्ताराने अभ्यासणार आहोत.)

२अ.८ समारोप

भाषेचा अभ्यास सुरुवातीला ऐतिहासिक पद्धतीने होत होता. भाषाकुल संकल्पना ही ऐतिहासिक भाषाभ्यासाचे फलित आहे. सर विल्यम जोन्स यांच्या कलकत्त्यातील भाषणामुळे भाषांच्या साम्यस्थळे शोधणे आणि भाषांची पुनर्रचना करणे या अभ्यासाला चालना मिळाली. त्यातून भाषांचा ऐतिहासिक अभ्यास आणि भाषाकुल संकल्पनेचा जन्म झाला. जगभरातील भाषाकुलांचा जन्म त्यातून झाला. येथे आपण भाषाकुल संकल्पनेचा सविस्तर विचार केला. तो करताना भाषिक वर्गीकरणाचे तत्त्व समजून घेतले, तसेच भाषांचे वर्गीकरण आणि जगातील प्रमुख भाषाकुले याची चर्चा केली. इंडो-युरोपिअन भाषाकुल व त्यातील आर्यभारतीय भाषाकुलांचा विस्ताराने आढावा घेताना अंतर्वर्तुळ - बहिर्वर्तुळ सिद्धांतही सविस्तर अभ्यासला. शेवटी मराठी भाषेच्या संदर्भाने आर्यभारतीय भाषाकुलाचा विस्ताराने अभ्यास केला आहे.

२अ.९ संदर्भ ग्रंथ सूची

१) मालशे/ इनामदार,/ सोमण (संपा), : 'भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक' पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

२) कुलकर्णी, कृ.पा. : 'मराठी भाषा : उद्गम व विकास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

३)	गजेंद्रगडकर, श्री. न.,	:	'भाषा आणि भाषाशास्त्र', व्हीनस प्रकाशन, पुणे.
४)	मालशे, मिलिंद,	:	'आधुनिक भाषाविज्ञान :सिद्धांत आणि उपयोजन', लोकवाङ्मयगृह, मुंबई.
५)	डॉ. कानडे, मु. श्री.	:	'मराठीचा भाषिक अभ्यास : ऐतिहासिक आणि वर्णनात्मक', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
६)	डॉ. मटकर, अलका	:	'मराठी भाषेचा भाषावैज्ञानिक अभ्यास', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.
७)	मोरे, नंदकुमार	:	'ऐतिहासिक भाषाविज्ञान व मराठी भाषेचा भाषावैज्ञानिक अभ्यास', लेख-'भाषाकुल सिद्धांत', स्टडी मटेरीयल, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

२अ.१० सरावासाठी प्रश्न

अ) दीर्घोत्तरी प्रश्न :

१) 'भाषाकुल संकल्पना' विस्ताराने स्पष्ट करा.

२) जगातील प्रमुख भाषाकुलांची सविस्तर चर्चा करा.

३) इंडो- युरोपिअन भाषाकुलांची सविस्तर चर्चा करा.

ब) लघुत्तरी प्रश्न

१) अंतर्वर्तुळ - बहिर्वर्तुळ सिद्धांत थोडक्यात स्पष्ट करा.

२) इंडो- इरानिअन शाखा आणि तिची वैशिष्ट्ये थोडक्यात लिहा.

३) आर्यभारतीय भाषाकुलाविषयी थोडक्यात लिहा.

क) टिपा लिहा

१) भाषाकुल

२) वर्गीकरणाची तत्त्वे

३) पाचर सिद्धांत

❖❖❖❖

२आ

स्वनपरिवर्तन

घटक रचना

२आ.१. उद्देश

२आ.२ प्रस्तावना

२आ.३ स्वनविज्ञान

२आ.४ स्वन म्हणजे काय?

२आ.५ स्वनाचे स्वरूप

२आ.६ स्वनाचे विशेष

२आ.७ स्वनपरिवर्तन संकल्पना

२आ.८ स्वनपरिवर्तनाचे स्वरूप

२आ.९ स्वनपरिवर्तनाची कारणे

२आ.१० स्वनपरिवर्तनाचे प्रकार

२आ.११ समारोप

२आ.१२ संदर्भ ग्रंथ

२आ.१३ पूरक वाचन

२आ.१४ सरावासाठी प्रश्न

२आ.१. घटकाचे उद्देश

या घटकाच्या अध्ययनानंतर आपल्याला पुढील उद्देश साध्य करता येतील.

१. आधुनिक भाषाविज्ञानातील स्वनविज्ञानाचे स्वरूप लक्षात येतील.

२. वर्णनात्मक भाषाविज्ञानातील स्वन ही संकल्पना समजून येईल.

३. स्वनपरिवर्तनाची कारणे ध्यानात येतील.

४. स्वनपरिवर्तनांच्या विविध प्रकारांचा परिचय होईल.

५. आधुनिक भाषाविज्ञानातील स्वनिमविचार समजून येईल.

२आ.२ प्रस्तावना

मानवी जीवनात 'भाषा' या दोन अक्षरी शब्दाला महत्त्वाचे स्थान आहे. मानव आपल्या भावना, विचार आणि संवेदनांची अभिव्यक्ती भाषेच्या माध्यमातून करत असतो. मानवी जीवन जसे प्रवाही, बदलणारे असते तशीच भाषा ही सुद्धा परिवर्तनशील असते. तिच्यात सातत्याने बदल होत असतो. मात्र हे बदल संथपणे व निश्चितपणे घडून येतात. यालाच 'भाषिक परिवर्तन' असे म्हणतात. ऐतिहासिक भाषाशास्त्रातील ही पायाभूत संकल्पना आहे. ज्येष्ठ भाषावैज्ञानिक जे. एच. ब्रेडसडॉर्फ यांनी १८२१ मध्ये सर्वप्रथम भाषेच्या परिवर्तनाचा अभ्यास केला. ते ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे अभ्यासक होते. त्यांनी भाषिक परिवर्तनाची मांडणी करताना त्याचे दोन प्रकार सांगितले आहेत. त्यामध्ये एक ध्वनी म्हणजेच स्वनपरिवर्तन व दोन अर्थपरिवर्तन यांचा समावेश होतो. या दोन्ही स्तरावरील परिवर्तनाची ब्रेडसडॉर्फ यांनी सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व भौगोलिक परिप्रेक्ष्यात कारणमीमांसा करून आठ कारणे सांगितली आहेत. यामध्ये श्रवण आणि आकलन यामध्ये घडणारी चूक, विस्मृती, वागिंद्रियातील दोष, आळस वा सुस्ती, सदृश्यतेकडील प्रवृत्ती, आपण इतरांहून वेगळे आहोत हे दर्शविण्याची इच्छा, नवीन कल्पना व्यक्त करण्याची आवश्यकता, परभाषा वा परसमाज यांचा प्रभाव यांचा समावेश होतो. या सर्व कारणमीमांसेतून भाषिक परिवर्तनाची मूलभूत मांडणी पाहावयास मिळते. ब्रेडस्डॉर्फ यांनी सर्वप्रथम ध्वनिपरिवर्तनाचा विचार नव्याने केला आहे. आधुनिक भाषाविज्ञानात त्यालाच 'स्वनपरिवर्तन' असे म्हटले जाते. फर्दिना -द- सोस्यूर यांनी वर्णनात्मक भाषाविज्ञानात या 'स्वन' संकल्पनेची मांडणी केलेली आहे. ज्यामध्ये स्वनांची भाषावैज्ञानिक चिकित्सा पाहावयास मिळते. यालाच स्वनविज्ञान असेही म्हटले जाते. प्रस्तुत घटकामध्ये आपणास स्वनपरिवर्तनाचा विचार करावयाचा आहे. तद्पूर्वी स्वनविज्ञानाचे स्वरूप लक्षात घेणे अगत्याचे वाटते.

२आ.३. स्वनविज्ञान

आधुनिक भाषाविज्ञानात ध्वनींची मूलगामी चिकित्सा करून त्यासाठी स्वन ही नवी संज्ञा वापरलेली आहे. स्वन याला इंग्रजीत Phone असे म्हणतात. याचा स्वतंत्र अभ्यास स्वनविज्ञान (Phonetics) या शाखेमध्ये केला जातो. सामान्यत: मानव मुखावाटे असंख्य ध्वनी उच्चारू शकत असला तरी सर्वच्या सर्व ध्वनी भाषेत वापरत नाही. प्रत्यक्ष भाषेत उपयोजिले जाणारे ध्वनी म्हणजे स्वन होय. या स्वनविज्ञानांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे स्वनविज्ञान होय. याची सैद्धांतिक मांडणी भाषावैज्ञानिकांनी केलेली आहे.

मिलिंद मालशे यांनी प्राचीन व आधुनिक स्वनविज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास करून स्वनविज्ञानाविषयी मूलभूत मांडणी केलेली आहे. ते लिहितात, प्राचीन भारतीय स्वनविज्ञानाचा सखोल प्रभाव १९ व्या शतकातील पाश्चात्त्य स्वनवैज्ञानिकांवर पडलेला आहे. भाषिक ध्वनींच्या भौतिक गुणधर्माचा अभ्यास पदार्थविज्ञानाची त्याचप्रमाणे शरीरविज्ञानाची मदत घेऊन करता येतो. इतर ध्वनींपासून भाषिक ध्वनींना वेगळे काढण्यासाठी स्वन (phone) ही संज्ञा वापरता येईल. स्वनांच्या भौतिक गुणधर्मांचा अभ्यास म्हणजे 'स्वनविज्ञान' होय. स्वनांची निर्मिती म्हणजेच उच्चारण (articulation),

त्यांचे संप्रेषण वा संचारण (transmission) आणि त्यांचे श्रवण (audition) या तीन अंगांनी हा अभ्यास होतो. उच्चारणलक्ष्यी स्वनविज्ञानामध्ये (articulatory phonetics) वागिंद्रियांचा अभ्यास होतो आणि प्रत्येक स्वन कोणत्या इंद्रियांच्या साहाय्याने व कोणत्या प्रकारे उच्चारला जातो, याचे वर्णन केले जाते. प्रामुख्याने जीभ आणि ओठ यांची स्थिती, तोंडाची पोकळी किती उघडली जाते त्याप्रमाण आणि स्वर-तंत्री (vocal cords) कंपित होतात की नाही, या तीन गोष्टी ध्यानात घेऊन स्वनांचे वर्गीकरण केले जाते. उदाहरणार्थ स्वर आणि व्यंजने हे वर्गीकरण उच्चारलक्ष्यी म्हणता येईल. फुफ्फुसांमधून बाहेर येणारी हवा अवरोध वा घर्षण न होता सलगपणे आणि स्वर-तंत्रींना कंपित करीत बाहेर पडते तेव्हा निर्माण होणारे स्वन हे 'स्वर' असतात. याउलट, उच्छवासित हवेला अवरोध करून या घर्षणाने निर्माण होणारे स्वन ही 'व्यंजने' असतात. संप्रेषण-लक्ष्यी वा संचारण-लक्ष्यी अभ्यासामध्ये (acoustic phonetics) स्वनांचे हवेमधील ध्वनिलहरी म्हणून स्वरूप तपासले जाते. कर्णेंद्रिये व मेंदू यांच्याद्वारे स्वनांचे ग्रहण कसे होते याचा अभ्यास श्रवणलक्ष्यी स्वनविज्ञानामध्ये (auditory phonetics) होतो. (पृ.३६-३८) स्वनाच्या अभ्यासाला वैज्ञानिक बैठक देण्याचे कार्य स्वनविज्ञानाने केलेले आहे. यामध्ये स्वनांची सैद्धांतिक मांडणी येते.

स्वनविज्ञान याविषयी द.दि.पुंडे लिहितात, विशिष्ट स्वन कसा निर्माण होतो, म्हणजे तो निर्माण होताना आपल्या वागिंद्रियात कोणकोणत्या हालचाली होतात, तो वातावरणात कसा पसरतो आणि कानांनी तो कसा ऐकू येतो यांचा अभ्यास स्वनविज्ञानात समाविष्ट असतो. या अभ्यासाच्या आधारे स्वनविज्ञान स्वनांचे वर्णन, विश्लेषण व वर्गीकरण करते. स्वनांची निर्मिती, प्रसुती आणि स्वीकृती यापैकी भाषाविज्ञानाच्या दृष्टीने स्वननिर्मितीची माहिती तेवढी महत्त्वाची व उपकारक असते. (काळे, सोमण संपा. पृ. ४८) वरील दोन्ही भाषाभ्यासकांच्या विवेचनातून स्वनांचा अभ्यास करणाऱ्या स्वनविज्ञानाची संकल्पना आपल्या लक्षात येते. याआधारेच स्वनविज्ञानातील स्वनांच्या संरचनेचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

२आ.४. स्वन म्हणजे काय ?

भाषेच्या संरचनेतील आद्य घटक म्हणून स्वन महत्त्वाचा आहे. वास्तविक भाषेचे ध्वनी, शब्द, वाक्य आणि अर्थ हे प्रमुख चार घटक असतात. त्यातील ध्वनी हा पहिला घटक असून ऐतिहासिक भाषाशास्त्रात याचा विचार प्राधान्याने केला जातो. मात्र आधुनिक भाषाविज्ञानात ध्वनींची मूलगामी चिकित्सा करून त्यासाठी स्वन ही नवी संज्ञा वापरलेली आहे. स्वनिमविचारात स्वनाची व्याख्या विस्ताराने दिलेली आहे. भाषाभ्यासक लिहितात,

" ज्या ध्वनींच्या अंगी भाषिक ध्वनी बनण्याची क्षमता आहे व ज्या ध्वनींच्या साहाय्याने भाषेत उपयुक्त संप्रेषण कार्य होते. त्या ध्वनींना स्वन असे म्हटले जाते. "

याचा अर्थ स्वन ही संज्ञा भाषांतर्गत असलेल्या ध्वनींशी निगडित आहे. वास्तविक ध्वनी अनेक असतात. त्यातील निवडक ध्वनी भाषेत वापरले जातात. त्यांना मूलध्वनी असे म्हटले जात होते. ही संज्ञा आधुनिक भाषाविज्ञानात सूक्ष्म पद्धतीने लक्ष्यात घेऊन त्यांची व्यापक अर्थाने मांडणी केली जाते. कोणत्याही ध्वनीला स्वन बनण्यासाठी त्याकडे भाषिक

ध्वनी बनण्याची क्षमता असणे गरजेचे आहे. त्याबरोबर त्याच्या साहाय्याने भाषेत उपयुक्त संप्रेषण होणेसुद्धा आवश्यक असते. या अटींची पूर्तता करणाऱ्या ध्वनीला स्वन असे म्हणतात.

२आ.५. स्वनाचे स्वरूप

कोणत्याही भाषेचे माध्यम स्वन असतात. माणूस या स्वनांचा उच्चार करत असतो. त्यामुळे स्वनांचे स्वरूप मानवी उच्चारयंत्रणेशी निगडित असते. प्रत्येक भाषेतील स्वनांचे उच्चारण, त्याची अभिव्यक्ती ही वेगवेगळी असते. परंतु याचे केंद्र हे मानवी वागिंद्रि असते. वर्णनात्मक भाषाविज्ञानात याच आधारे स्वनांची चिकित्सा करून स्वनांचे स्वरूप विशद केलेले आहे. या स्वरूपामध्ये स्वनाच्या अभ्यासशाखांचा समावेश होतो. स्वनविज्ञानात स्वनांच्या अभ्यासाच्या तीन शाखा सांगितलेल्या आहेत. त्यामध्ये एक उच्चारणकेंद्री स्वनविज्ञान, दोन संचारणकेंद्री स्वनविज्ञान आणि तीन श्रवणकेंद्री स्वनविज्ञान यांचा समावेश होतो.

स्वनाचे विश्लेषण करताना वरील ज्या तीन अभ्यासशाखा सांगितलेल्या आहेत त्याचा विचार करता स्वनाचे स्वरूप आपल्या लक्षात येते. याविषयी स्वनविचार या लेखात द.दि. पुंडे यांनी अगदी तपशीलवार विवेचन केलेले आहे. ते लिहितात, भाषा ही स्वनरूप म्हणजे स्वनांची बनलेली असते. भाषेत वापरले जाणारे स्वन माणूस आपल्या मुखाद्वारे निर्माण करतो असे आपण स्थूलमानाने म्हणतो. प्रत्यक्षात स्वननिर्मितीसाठी आपल्या शरीरातील फुफ्फुसे, श्वासनलिका, स्वरतंत्री, घसा, पडजीभ, तोंडातली पोकळी (मुखविवर), नाकाची पोकळी (नासिकाविवर), टाळू, दात, ओठ, जीभ अशा विविध अवयवयांचा उपयोग केला जातो. या सर्व अवयवांना वागिंद्रिय असे म्हणतात. वागिंद्रियाच्या द्वारे स्वन उच्चारला जात असताना जी प्रक्रिया घडते. तिच्या अभ्यासाला उच्चारणकेंद्री स्वनविज्ञान म्हणतात. उच्चारणकेंद्री स्वनविज्ञानात स्वनांच्या प्रत्यक्ष निर्मितीचा अभ्यास असल्याने स्वनांचे स्वरूप, त्यांच्यातील साम्यभेद यांचा विचार करता येतो आणि त्याच्या आधारे स्वनांचे वर्गीकरण करता येते. आपण जे बोलतो ते हवेत, वातावरणात पसरते. उच्चारलेल्या स्वनांचा हवेवर आघात होतो. या आघाताने हवा कंप पावते. त्यामुळे स्वनलहरी (ध्वनिलहरी) उत्पन्न होतात. या स्वनलहरींचे कंपन आणि आवृत्ती (Frequency) विशिष्ट पद्धतीने मोजता येते. त्यामुळे स्वनाचा गुण (Quality) त्याची तीव्रता इत्यादी गोष्टी कळतात. हवेत निर्माण झालेल्या स्वनलहरींच्या अभ्यासाला संचारणकेंद्री स्वनविज्ञान म्हणतात. कारण उच्चारलेल्या स्वनांचा संचार हवेत कसा होतो याचा अभ्यास या शाखेत होतो. स्वनांचा हवेतील संचार ही एक भौतिक घटना आहे. वागिन्द्रियांतर्फे स्वन उच्चारला जातो. जो स्वनलहरींच्या रूपात हवेत पसरतो. हवेतून येणाऱ्या स्वनलहरी आपल्या कानाच्या पडद्यापर्यंत आदळतात, मग कानाच्या आतल्या यंत्रणेचे कार्य सुरू होते. येथे ऐकू येणाऱ्या स्वनांचा विचार केला जातो. श्रवण हे येथे महत्त्वाचे आहे. म्हणून या शाखेला श्रवणकेंद्री स्वनविज्ञान असे म्हणतात. (काळे, सोमण पृ. ४८-४९) भाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून स्वनाचे स्वरूप भाषाकेंद्री, उच्चारकेंद्री, व्यक्तीकेंद्री असते त्यामुळे त्याला महत्त्वाचे स्थान आहे.

२आ.६. स्वनाचे विशेष

१. स्वनांचा उच्चार व्यक्तिविशिष्ट असतो.

२. स्वनांच्या अंगी अर्थभेद करण्याची क्षमता असते.

३. सुट्या-सुट्या स्वनांना काही अर्थ नसला तरी विशिष्ट रचनेमध्ये गेल्यानंतर त्याला अर्थ प्राप्त होतो. त्यामुळे स्वन हा भाषेतील महत्त्वाचा आद्य घटक ठरतो.

४. स्वनाचा अभ्यास दोन प्रकारे केला जातो. त्यामध्ये एक स्थैर्यप्रधान व दोन गतिप्रधान यांचा समावेश होतो. स्वनांचे उच्चारानुसार वर्गीकरण करून त्यांची उत्पत्ती कशी होते याचा अभ्यास हा स्थैर्यप्रधान होय. तर एकाच भाषेतील स्वन कालांतराने बदलतात. त्यांच्यात परिवर्तन होते. याचा अभ्यास हा गतिप्रधान असतो.

५. दुसऱ्या प्रकारातील अभ्यास हा ऐतिहासिक भाषाशास्त्राचा पायाभूत चिंतनविषय आहे. त्यामध्ये स्वनपरिवर्तन हा मूलभूत घटक असून त्याची संकल्पनात्मक मांडणी यात केलेली आहे.

२आ.७. स्वनपरिवर्तन संकल्पना

ना. गो. कालेलकर यांनी आपल्या 'ध्वनिविचार' या ग्रंथामध्ये भाषेतील ध्वनी म्हणजेच स्वनाचा मूलभूत विचार केलेला आहे. मराठी भाषेतील भाषाविज्ञानातील हा मूलगामी ग्रंथ आहे. भाषेतील स्वनांना विशिष्ट संकेत असतात. त्यांची विशिष्ट रचना असते. त्यामध्ये परिवर्तन होते. या स्वनपरिवर्तनाची व्याख्या करताना ते लिहितात,

" एका विशिष्ट काळी, एका विशिष्ट प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या एका विशिष्ट समाजाच्या बोलण्यातील स्वन कालांतराने बदलतात. त्याला स्वनपरिवर्तन असे म्हणतात. "

स्वनपरिवर्तन ही संकल्पना भाषाविज्ञानात महत्त्वाची असून भाषेच्या संरचनेत ती आद्य रूपात आविष्कृत होते. स्वनपरिवर्तन हे कालसापेक्ष असते. एका विशिष्ट काळी स्वनपरिवर्तन घडून येते. वास्तविक भाषा ही नित्य परिवर्तनशील असते. सृष्टीतील बदलाच्या उत्पत्ती, विकास व लय या नियमाप्रमाणे भाषेतही बदल होत असतात. या परिवर्तनाचे रूप म्हणजे स्वनपरिवर्तन असते. स्वनविज्ञानात याचा विस्ताराने विचार केला जातो.

२आ.८. स्वनपरिवर्तनाचे स्वरूप

स्वनपरिवर्तन ही संकल्पना भाषिक परिवर्तनात अतिशय महत्त्वाची आहे. त्याचे स्वरूप विविधांगी आहे. ना. गो. कालेलकर यांनी 'ध्वनिविचार' या ग्रंथात या स्वनपरिवर्तनाचे स्वरूप विशद केलेले आहे. स्वनपरिवर्तन हे अखंड व सार्वत्रिक असते. त्याची एक प्रक्रिया सातत्याने कार्यान्वित असते. या प्रक्रियेचे मूळ मानवाच्या शारीरिक व मानसिक स्वभाव वैशिष्ट्यात दडलेले आहे. त्यात व्यक्तिसापेक्ष, काळसापेक्ष, प्रदेशसापेक्ष, समाजसापेक्ष असे बदल होत असतात. स्वनपरिवर्तनाचे मूळ कशात असावे यासंबंधी ऐतिहासिक

भाषाशास्त्रात काही उपपत्ती सांगितलेल्या आहेत. त्यामध्ये शारीरिक गुणधर्म व विकृती, मानसिक प्रवृत्ती, परिसारिक वैशिष्ट्ये, भाषा संपादन व उपयोजन यांचा समावेश होतो.

स्वनपरिवर्तनाचे काही स्वरूपविशेष सांगितले जातात. त्यामध्ये स्वनपरिवर्तन हे निरपवाद असते. हा स्वनपरिवर्तनातील पहिला महत्त्वाचा टप्पा असतो. एका विशिष्ट परिस्थितीमध्ये एखाद्या भाषेतील स्वन विशिष्ट प्रकारे बदलत असतात. म्हणजे त्यात होणारे बदल नियमांनी अभ्यासता येतात. हे स्वनपरिवर्तन अमर्याद असते. त्यात सातत्य असते. त्यात कोणताही खंड पडत नाही. सातत्याने, नियमितपणे त्यामध्ये बदल हे होत असतात. वास्तविक ही लवचिकता हेच भाषेचे आणि स्वनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. मानव, समाज आणि संस्कृतीमध्ये ज्याप्रमाणे सातत्याने बदल होतात त्याप्रमाणे स्वनपरिवर्तन हे स्वाभाविकपणे होते. त्यात सहजता असते. स्वनपरिवर्तनाचे महत्त्वाचे विशेष म्हणजे ते अज्ञेय असते. याचा अर्थ ते कुठे, केव्हा, कसे घडेल हे सांगता येत नाही. यामध्ये एकप्रकारची अस्थिरता पहायला मिळते. स्वनपरिवर्तन हे नियमित घडून येत असते. ते कळत नकळत घडून येते. त्याचे स्वरूप सूक्ष्म असते. यातील परिवर्तने एकदम लक्षात येत नाहीत. त्यांची जाणीव खूप नंतर लक्षात येते. स्वनपरिवर्तनात एक प्रकारचा प्रवाहीपणासुद्धा असतो. एकूणच स्वनपरिवर्तन ही संकल्पना भाषाभ्यासात महत्त्वाची असून ऐतिहासिक भाषाविज्ञानातील ती पायाभूत संकल्पना आहे.

२आ.९. स्वनपरिवर्तनाची कारणे

भाषा ही परिवर्तनशील आहे. या तत्त्वानुसार ऐतिहासिक भाषाविज्ञानात भाषेचा अभ्यास केला जातो. ब्रेडसडॉर्फ यांनी स्वनपरिवर्तनाचा मूलगामी विचार करताना त्याची अनेक कारणे सांगितली आहेत. या कारणांचे स्वरूप दुहेरी आहे. कोणतीही भाषा ही बोलणाऱ्याच्या वर्तनावर अवलंबून असते. व्यक्तीपरत्वे भिन्न असते. त्यामुळे भाषेतील स्वनपरिवर्तन विविधांगी आहे. त्याची काही कारणे आहेत. ज्यामध्ये काही कारणे बाह्य तर काही कारणे अंतर्गत आहेत. सामान्यत: यामध्ये व्यक्तिकेंद्री, सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, राजकीय परिप्रेक्ष्यातील कारणांचा समावेश होतो. त्यांचा विचार विस्ताराने पुढीलप्रमाणे करता येईल.

१. अनुकरणाची अपूर्णता

मानव भाषा शिकत असतो. त्याला ती शिकावी लागते. त्यामध्ये एखाद्याने उच्चारलेल्या शब्दांचे अनुकरण करण्याची प्रक्रिया घडत असते. मात्र हे अनुकरण व्यवस्थित झाले नाही तर त्यातून ध्वनी परिवर्तन घडून येते. उदा. डॉक्टर या शब्दांचे उच्चारण डाकटर असे केले जाते. यातून स्वनपरिवर्तन घडून येते.

२. आळस

मानव हा स्वभावत: आळशी प्राणी असतो. त्याच्या आळसामागे शारीरिक, मानसिक कारणे असतात. माणसातील या आळशीपणामुळे बऱ्याच वेळा त्याच्या बोलण्यात बदल होत असतो. विशेषत: त्याच्या बोलण्यातील ध्वनी बदलतात यातून भाषिक परिवर्तन पर्यायाने स्वनपरिवर्तन घडून येते.

३. वांशिक शरीर वैशिष्ट्ये

जन्मत: एखाद्या मुलास आई वडिलांकडून वांशिक रूपात काही आचार, विचार, विकार येतात. त्यामुळे त्याच्या उच्चार यंत्रणेत बिघाड घडून येतो. याचा परिणाम त्याच्या बोलण्यावर होतो. त्यातूनही स्वनपरिवर्तन घडून येते.

४. उच्चार इंद्रियातील दोष

मानवी शरीराची काही शारीरिक व्यंगे असतात. ती स्वन परिवर्तनास कारक ठरतात. त्यामध्ये जीभ जड असणे, दात नसणे, घशात बिघाड असणे इत्यादींचा समावेश होतो. हे स्वनपरिवर्तनाचे महत्त्वाचे कारण आहे.

५. श्रवण इंद्रियातील दोष

भाषाव्यवहारात बोलणारा हा जसा महत्त्वाचा असतो तशाच प्रकारे ऐकणारा हा सुद्धा महत्त्वाचा घटक आहे. बोलणाऱ्याचे ध्वनी जर व्यवस्थितपणे ऐकले नाहीत तर त्या ध्वनींचे उच्चारण करताना बदल होऊ शकतो. त्यामुळे श्रवण ही क्रिया महत्त्वाची आहे. कान हे श्रवणइंद्रिय असून त्यातील दोष हा स्वनपरिवर्तनास कारक ठरतो.

६. उच्चारशीघ्रता

बोलत असताना बोलण्याची गती जलद ठेवल्यास शब्दांचा उच्चार पूर्ण होत नाही. बरेच शब्द लुप्त होतात. उच्चारामध्ये फरक पडतो. याचा परिणाम म्हणजे उच्चारशीघ्रतेतून स्वन परिवर्तन घडून येते.

७. व्यवसाय

मानव अनेक व्यवसाय करत असतो. त्यात त्या व्यवसायामध्ये विशिष्ट पद्धतीने आवाज काढले जातात. उदा. भाजीवाला भाजी विकत असताना ‘भाजी घ्या भाजी !’ असा आवाज काढतो. इथे भाजी हा शब्दप्रयोग दोनदा आल्यामुळे बऱ्याच वेळा त्यातील स्वन एकदाच उच्चारले जातात. यातूनही स्वनपरिवर्तन घडून येते. त्यामुळे व्यवसाय हे सुद्धा स्वनपरिवर्तनाचे कारण ठरते.

८. लोकभ्रम

लोकभ्रम म्हणजे समाजात असणाऱ्या काही चुकीच्या प्रथा अथवा समज होत. भाषाव्यवहारात काही शब्द वापरणे अशुभ, वाईट मानले जाते किंवा त्याचा उच्चार हा अयोग्य मानला जातो. उदा. शिव्या. यातूनही स्वनपरिवर्तन घडून येते.

९. अज्ञान

बऱ्याच वेळा एखाद्या वस्तूची माहिती लोकांना असत नाही. तिचे नाव त्यांना माहीत नसते. अशावेळी त्या वस्तूनावाचा उच्चार त्या व्यक्तीला करता येत नाही. यातूनही स्वनपरिवर्तन घडते.

१०. भाऊकता

मानव हा मूलत: भावनाशील असतो. अनेक प्रकारच्या भावभावना प्रसंगपरत्वे त्याच्या मनात निर्माण होतात. प्रत्येक भावनेच्या अभिव्यक्तीवेळी माणसाचा उच्चार बदलतो. उदा.

दु:खाच्या वेळी तो रडतो. त्याचा कंठ भरून येतो. त्यावेळी होणारे उच्चार बदलतात. त्यामुळे भाऊकता हे सुद्धा स्वनपरिवर्तनाचे कारण ठरते.

११. उच्चारसौकर्य

भाषाव्यवहार हा बोलणाऱ्याच्या वर्तनावर अवलंबून असतो. बऱ्याच वेळा बोलणारा अवघड वाटणाऱ्या शब्दांचा उच्चार सोपा करून बोलण्याचा प्रयत्न करत असतो. यातून स्वनपरिवर्तन घडून येते. त्यामुळे उच्चारसौकर्य हे स्वनपरिवर्तनाचे कारण ठरत असते.

१२. आघात

काही लोक बोलताना विशिष्ट शब्दांवर आघात करून बोलतात किंवा काहींच्या आवाजात दीर्घ स्वर सातत्याने येत असतात. मुख्यत: आघातामुळे उच्चारात बदल होतो. यातून स्वनपरिवर्तन घडून येते.

१३. उच्चारदीर्घता

भाषेचा वापर करत असताना बोलणाऱ्याच्या उच्चारात जर सातत्याने दीर्घ स्वर आले तर त्यातूनही स्वनपरिवर्तन घडून येते. त्यामुळे उच्चारदीर्घता हे एक स्वनपरिवर्तनाचे कारण सांगितले जाते.

१४. लेखनपद्धती

भाषेच्या तंत्रामध्ये लेखन हे एक महत्त्वाचे तंत्र आहे. वास्तविक लिपीच्या शोधानंतर लेखनपद्धती अस्तित्वात आली. बोलणे आणि लिहिणे यात बऱ्याच वेळा फरक असतो. अशावेळी बोलणाऱ्याच्या उच्चारात बदल होतो. उदा. पारंपरिक या शब्दाचा उच्चार पारंपरिक असा केला जातो. यातून इथे स्वनपरिवर्तन झाल्याचे दिसते.

१५. नैसर्गिक मनोधैर्य

माणसाला नेहमी नव्याचे आकर्षण असते. त्याचे मन प्रत्येक वेळी नव्या गोष्टींचा स्वीकार करत असते. यातूनच भाषेत नवे शब्द येत असतात. त्या शब्दांचा उच्चार करताना बऱ्याच वेळा बदल होत असतो. यातूनही स्वनपरिवर्तन घडून येते.

१६. सामाजिक परिस्थिती

मानव समाजशील प्राणी आहे. समाज हा विशिष्ट संस्कृतीने बांधलेला असतो. त्या संस्कृतीच्या अंतरंगात उपसमाज असतात. त्यांची विशिष्ट बोली असते. यात विविधता पहावयास मिळते. या सामाजिक परिस्थितीचा परिणाम बोलीवर होतच असतो. यातूनही स्वनपरिवर्तन घडते.

१७. भौगोलिकता

भाषेवर अनेक गोष्टींचा परिणाम होत असतो. त्यामध्ये निसर्ग हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. भाषकाच्या बोलण्यावर या निसर्गाचा परिणाम होता. त्यातून त्याचे उच्चार बदलतात. उदा. महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टी या भौगोलिक ठिकाणी नासिक्य उच्चार मोठ्या प्रमाणात येतात. यातून स्वनपरिवर्तन घडून येते.

१८. स्थलांतर

माणसांचा इतिहास पाहिल्यास त्यामध्ये स्थलांतर हा महत्त्वाचा बदल होता. एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी त्याने आदिम काळापासून स्थलांतर केलेले आहे. आजही अनेक लोक व्यवसाय, प्रवास या निमित्ताने स्थलांतर करतात. यातून त्यांच्या भाषेवर परिणाम होतो. त्यामुळे हे स्थलांतर स्वनपरिवर्तनास कारक ठरते.

१९. भिन्न भाषासंपर्क

भाषा हे दोन व्यक्तींना जोडण्याचे प्रमुख माध्यम आहे. बऱ्याच वेळा व्यवसाय, पर्यटन, नोकरी या निमित्ताने दोन वेगवेगळ्या भाषिक समूहातील लोक एकत्र येतात. त्या दोघांच्या भाषेत देवाणघेवाण होते. त्यात भाषामिश्रण घडून बऱ्याच वेळा स्वनपरिवर्तन घडून येते. त्यामुळे हे स्वनपरिवर्तनाचे महत्त्वाचे कारण आहे.

२०. जित-जेते संबंध

भारतावर वेगवेगळया काळात वेगवेगळ्या परकीय लोकांनी आक्रमणे केली आहेत. त्यामध्ये आर्य, हून, डच, इंग्रज यांचा समावेश होतो. या सर्वांनी भारतावर आक्रमण करून इथल्या ऐतदेशीय लोकांना पराजित केले. यावेळी त्यांनी आपली भाषा त्यांच्यावर लादली. यातूनही भाषिक परिवर्तन पर्यायाने स्वनपरिवर्तन घडून आले.

एकूणात वरील सर्व स्वनपरिवर्तनाची कारणे महत्त्वाची आहेत. त्यामधून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व ऐतिहासिकता पाहावयास मिळते. ब्रेडस डॉर्फ यांनी या सर्वांची मूलभूत मांडणी केलेली आहे. या कारणातूनच स्वनपरिवर्तन घडून येते. त्याचे काही प्रकार पडतात. त्यांचाही विचार ब्रेडस डॉर्फ यांनी केलेला आहे. त्याचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

२आ.१०. स्वनपरिवर्तनाचे प्रकार

१. गुण

स्वनपरिवर्तनामधील गुण हा महत्त्वाचा प्रकार आहे. यामध्ये इ, ऊ, ऋ, लृ ऐवजी ऐ, ओ असे परिवर्तन घडून येते. उदा. तुण्ड › तोंड असे स्वनपरिवर्तन यामध्ये होते.

२. वृद्धी

स्वनपरिवर्तन होत असताना बऱ्याच वेळा अ, इ, ऊ, ऋ, लृ ऐवजी औ, ऑ, ल असा बदल होतो. उदा. मलीन › मैल, महिषी › म्हैस असे स्वनपरिवर्तन घडून येते. या प्रकारास 'वृद्धी' असे म्हणतात.

३. संप्रसारण

भाषाव्यवहार हा संप्रेषण असतो. यामध्ये य, व, र, ल ऐवजी इ, ऊ, ऋ असे स्वनपरिवर्तन होत. उदा. द्विप्रहर › दुपार असा बदल होतो. त्यावेळी होणाऱ्या स्वनपरिवर्तनास 'संप्रसारण' असे म्हणतात.

४. स्वरागमण

भाषाव्यवहारामध्ये बोलणाऱ्याच्या शारीरिक, मानसिकतेचा प्रभाव पडतो. वागिंद्रि यातील दोषामुळे संयुक्त स्वनिमांचे कठीण उच्चार सुलभ केले जातात. त्यात मूळ उच्चारात नसलेले स्वन येतात. उदा. स्क्रू › इसकरू. यावेळी होणाऱ्या स्वनपरिवर्तनास 'स्वरागमण' असे म्हणतात.

५. स्वरभक्ती

प्रत्येक व्यक्तीचा भाषाव्यवहार हा वेगळा असतो. बऱ्याच वेळा बोलणाऱ्याच्या उच्चारात एखादा शब्द सातत्याने येतो. याचे कारण म्हणजे त्या शब्दाविषयी असणारी आवड होय. स्वनपरिवर्तनात यातूनच स्वरभक्ती हा प्रकार निर्माण झाला आहे. उदा. धर्म › धरम, रक्त › रगत, प्रकार › परकार असे स्वनपरिवर्तन केले जाते.

६. अंत्यस्वरलोप

काही शब्दातील शेवटचे वर्ण शब्दावरील आघातामुळे किंवा उच्चाराकडे बोलणाऱ्याचे लक्ष नसल्यामुळे उच्चारले जात नाहीत. अशा अंत्यवर्णाचा कालपरत्वे लोप होतो. त्यास 'अंत्यस्वरलोप' असे म्हणतात. उदा. जावे › जावं, खावे › खावं. असे स्वनपरिवर्तन होते.

७. समानस्वरलोप

काही वेळा शब्दात येणारे दोन समान स्वर उच्चारात एकत्र उच्चारले जातात. त्यावेळी होणाऱ्या स्वनपरिवर्तनास 'समानस्वरलोप' असे म्हणतात. असे समानस्वरलोप स्वनपरिवर्तनात सातत्याने होत असते. उदा. एकएक › एकेक, सुकेकेळे › सुकेळे असे स्वनपरिवर्तन होते.

८. घोषीकरण

शब्दातील अघोष ध्वनी घोषयुक्त उच्चारले जातात. म्हणजे ऱ्हस्व उच्चार असणारे दीर्घ केले जातात. त्यावेळी होणाऱ्या स्वनपरिवर्तनास 'घोषीकरण' असे म्हणतात. उदा. मकर-मगर, कंकण- कंगन ही त्याची उदाहरणे आहेत.

९. अघोषीकरण

घोषीकरण या प्रकारापेक्षा उलट म्हणजे शब्दातील घोष ध्वनी अघोषयुक्त उच्चारले जातात. म्हणजे दीर्घ उच्चार ऱ्हस्व केले जातात. यावेळी होणाऱ्या स्वनपरिवर्तनास 'अघोषीकरण' असे म्हणतात. मदद-मदत, मेघ-मेख ही अघोषीकरणाची उदाहरणे आहेत.

१०. मात्राभेद

या प्रकारामध्ये ऱ्हस्व-दीर्घ यांच्यातील उच्चारभेद येतो. बऱ्याच वेळा काही ऱ्हस्व स्वनांचा उच्चार दीर्घ होतो, तर काही दीर्घ स्वनांचा उच्चार ऱ्हस्व होतो. यातून होणाऱ्या स्वनपरिवर्तनास मात्राभेद असे म्हणतात. उदा. लज्जा- लाज, जिव्हा-जीभ इत्यादी.

२आ.११. समारोप

ऐतिहासिक भाषाविज्ञानात भाषिक परिवर्तन हा महत्त्वाचा अभ्यासविषय आहे. त्यामध्ये ध्वनिपरिवर्तन म्हणजेच स्वनपरिवर्तन हा विशेष चिंतनाचा भाग असून त्याविषयी आधुनिक

भाषाभ्यासकांनी महत्त्वाची मांडणी केलेली दिसते. जी आपण वरीलप्रमाणे पाहिलेली आहे. कोणत्याही भाषेमध्ये हे स्वनपरिवर्तन सातत्याने घडून येते. ज्यामधून ती भाषा समृद्ध होते. तिला भाषिक वैभव प्राप्त होते. त्यामुळे स्वनपरिवर्तन हे भाषिक परिवर्तनात महत्त्वाचे आहे.

२आ.१२. संदर्भ ग्रंथ

१.	कालेलकर,ना. गो.	:	'ध्वनिविचार', मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९५५.
२.	केळकर, अशोक	:	'भाषाविज्ञान व वाङ्मय परिभाषा कोश', भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, २००१.
3.	मालशे, स.ग., इनामदार, हे.वि., सोमण, अंजली (संपा),	:	'भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००५.
४.	मालशे, मिलिंद	:	'आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन', लोकवाङ्मय गृह, मुंबई, तिसरी आवृत्ती २००६.
५.	काळे, कल्याण व सोमण, अंजली (संपा.)	:	'आधुनिक भाषाविज्ञान (संरचनावादी, सामान्य आणि सामाजिक), प्रतिमा प्रकाशन, पुणे. १९९९.

२आ.१३ पूरक वाचन

१. ना.गो.कालेलकर : 'ध्वनिविचार'

२. ना.गो. कालेलकर : 'भाषा आणि संस्कृती'

३. श्री.न. गजेंद्रगडकर : 'भाषा आणि भाषाविज्ञान'

४. लीला गोविलकर : 'वर्णनात्मक भाषाविज्ञान'

५. अशोक केळकर : 'वैखरी'

२आ.१४. सरावासाठी प्रश्न

अ) दीर्घोत्तरी :

१. भाषिक परिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट करा.

२. स्वनाची संकल्पना विशद करा.

३. स्वनपरिवर्तनाचे प्रकार स्पष्ट करा.

४. स्वनपरिवर्तनाची कारणे विशद करा.

५. स्वनपरिवर्तनाची प्रक्रिया विशद करा.

ब) लघुत्तरी

१. स्वनाचे विशेष लिहा.

२. स्वनपरिवर्तनाचे स्वरूप विशद करा.

३. भाषिक परिवर्तन म्हणजे काय?

४. स्वनपरिवर्तनाचे महत्त्व स्पष्ट करा.

५. स्वनपरिवर्तन संकल्पना स्पष्ट करा.

क) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. स्वन म्हणजे काय?

२. स्वनपरिवर्तन म्हणजे काय?

३. स्वनपरिवर्तन ही संज्ञा कोणी वापरली?

४. स्वनपरिवर्तन हे कशाशी निगडित असते?

५. स्वनपरिवर्तन यालाच पूर्वी काय म्हटले जात होते?

❖❖❖❖

२इ

अर्थपरिवर्तन

घटक रचना

२इ.१. उद्दिष्टे

२इ.२. प्रास्ताविक

२इ.३. अर्थ : संकल्पना

२इ.४. अर्थाचे प्रकार

२इ.५. अर्थपरिवर्तन संकल्पना

२इ.५.१. अर्थपरिवर्तनाची कारणे

२इ.५.२. अर्थपरिवर्तनाचे प्रकार/वर्गीकरण

२इ.६. भाषिक आदानाचे स्वरूप

२इ.६.१. भाषिक आदानाची कारणे

२इ.६.२. भाषिक आदानाचे प्रकार

२इ.६.३. आदानाचे भाषेवरील परिणाम

२इ.७. समारोप

२इ.८. संदर्भग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके

२इ.९. सरावासाठी प्रश्न

२इ.१. उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला पुढील उद्देश साध्य करता येईल.

१) शब्द व अर्थ यांचा संबंध अभ्यासता येईल.

२) अर्थाचे प्रकार समजून येतील.

३) अर्थपरिवर्तन समजून घेऊन त्याची कारणे ध्यानात येतील.

४) अर्थपरिवर्तनाचे प्रकार अभ्यासता येतील.

५) आदान प्रक्रिया समजून येईल.

२इ.२. प्रास्ताविक

शब्द व अर्थ हे परस्परांशी संबद्ध असतात. एखादा शब्द व त्याचा अर्थ माहीत असेल तर त्याचे वाक्यात उपयोजन करता येते. भाषाव्यवहार त्यामुळे सुलभ होतो. काळाच्या ओघात काही शब्दांचे अर्थ निश्चित राहतात तर काही शब्दांचे अर्थ काळानुसार बदलत जातात. शब्दाचे बदललेले अर्थ हळूहळू जनमानसात रूळतात. तर काही शब्द भाषिक व्यवहारातून लोप पावतात. संदर्भानुसार शब्दांना विविध अर्थ प्राप्त होत असतात. ही अर्थपरिवर्तनाची प्रक्रिया कशी घडते हे पाहण्याआधी 'अर्थ म्हणजे काय' हे समजून घेऊ.

२इ.३. अर्थः संकल्पना

अर्थ म्हणजे भाषेचा आत्मा असे म्हटले जाते. कोशात 'अर्थ'या शब्दाचे वेगवेगळे अर्थ सांगितले आहेत. अभिप्राय, भाव, तात्पर्य, हेतू, मतलब, आशय, उद्देश, इंगित असे ते अर्थ आहेत. शब्द उच्चारताच आपल्या मनात त्या शब्दाबद्दलची एक प्रतिमा तयार होते. 'फूल', 'समुद्र', 'आगगाडी' हे अर्थपूर्ण शब्द आहेत. कारण ते उच्चारताच त्याची प्रचिती येते. म्हणजेच शब्दांच्या द्वारे जी वास्तविक किंवा काल्पनिक प्रतीती येते तिला अर्थ म्हणता येईल. कधी कधी ही प्रतीती स्वानुभवातून येते तर कधी परप्रत्ययद्वाराही येते.

अर्थनिर्मितीमागे तीन शक्ती कार्यरत असतात. अभिधा, लक्षणा व व्यंजना या त्या तीन शक्ती होत. शब्द उच्चारल्याबरोबर आपल्या मनात जो अर्थ येतो तो मुख्यार्थ होय. (उदा. झाड म्हटले की झाडाची विशिष्ट आकृती डोळ्यासमोर येते) यालाच वाच्यार्थ म्हणतात. वाच्यार्थ ज्या शक्तीमुळे निर्माण होतो तिला 'अभिधा' असे म्हणतात. अनेकदा वाक्याचा बोध होण्यासाठी मुख्यार्थाचा उपयोग होत नाही. अशा वेळी मुख्यार्थ बाजूला ठेवून गौण अर्थ घ्यावा लागतो. हाच 'लक्ष्यार्थ' होय. (उदा. 'मी समग्र तुकाराम वाचला आहे', म्हणजे त्यांचे साहित्य वाचले हा लक्ष्यार्थ) 'लक्षणा' शक्तीमुळे लक्ष्यार्थाचा बोध होतो. काही वेळा शब्दार्थांना वाच्यार्थ्याहून, लक्ष्यार्थांहून वेगळाच अर्थ प्राप्त होत असतो. तो व्यंग्यार्थ होय. (उदा. 'पानिपतमध्ये हजार बांगडी फुटली' म्हणजे वैधव्य, रक्तपात, युद्ध, बायकांचे अश्रू आदी अनेक अर्थ प्रतीत होतात. 'व्यंजना'शक्तीमुळे व्यंग्यार्थ निर्माण होतो.

२इ.४. अर्थाचे प्रकार

१) निर्देशपर (संबोधपर) किंवा सांकल्पनिक अर्थ

२) गुणव्यंजक अर्थ

३) शैलीगत अर्थ

४) भावपर अर्थ

५) परावर्तित अर्थ

६) साहचर्यपर अर्थ

७) विषय अर्थ

१) निर्देशपर -संबोधपर- सांकल्पनिक अर्थ -

शब्द उच्चारताच अभिधा शक्तीमुळे विशिष्ट आकृतीची वस्तू आपल्या मनश्चक्षूपुढे पुढे उभी राहते. अभिधा शक्तीमुळे शब्दाचा जो वाच्यार्थ कळतो तोच शब्दाचा अंगभूत अर्थ असतो. हाच सांकल्पनिक अर्थ असतो. शब्दांना संकेताने अर्थ प्राप्त होतात. परंतु संकेताशिवायही अन्य अर्थ त्या शब्दातून व्यक्त होतात. उदा. जन्म देणारी ती आई हा मूळ निर्देशित अर्थ. या जोडीलाच आई म्हणजे ममत्व, वात्सल्य, प्रेमळपणा इ. अनुभवनिष्ठ संकल्पना जोडल्या गेल्या आहेत. थोडक्यात येथे निर्देशपर अर्थाबरोबर संकल्पना अनुभवांची जोड मिळते.

२) गुणव्यंजक अर्थ-

शब्दांना सांकल्पनिक अर्थाखेरीज रूढी व अनुभवामुळे वाच्यार्थाहून काही वेगळे अर्थ प्राप्त होतात. त्याला गुणव्यंजक अर्थ असे म्हणतात. उदा. तो मुळातच 'गाढव' आहे. येथे 'गाढव' या शब्दाच्या सांकल्पनिक अर्थापेक्षा 'मूर्खपणा'हा गुणव्यंजक अर्थ त्याला प्राप्त झाला आहे.

३) शैलीगत अर्थ -

शब्दांची निवड म्हणजे शैली. एकच अर्थ व्यक्त करणारे अनेक शब्द असतात. त्यातूनच बोलणारी व्यक्ती तिला आवडणाऱ्या किंवा योग्य वाटणाऱ्या शब्दाची निवड करते. बोलणारा-ऐकणारा, त्यांचे परस्पर संबंध, बोलण्याचा विषय यातून शैलीगत अर्थ प्रगट होतो. व्यक्तीने निवड केलेल्या शब्दावरून तिचे संस्कार, शिक्षण, स्वभाव, तिचा सामाजिक-सांस्कृतिक दर्जा, आचार- विचार, तिच्या भोवतालचे वातावरण इत्यादी अनेक गोष्टी ध्यानात येतात.

उदा. - माणसाने कोणत्याही गोष्टीचा गर्व बाळगू नये.

- माणसाने जास्त घमेंडीत राहू नये.
- माणसाने फार अभिमान बाळगू नये.
- माणसाला गुर्मी चांगली नाही.

अशाचप्रकारे खाणे, गिळणे, पोटात घालणे, हादडणे, मटकावणे, ओरपणे हे शब्द 'भरपूर खाणे' या अर्थाने वापरले जातात. परंतु विशिष्ट वाक्यासंदर्भात त्यांना वेगळे अर्थ प्राप्त होतात. तसेच पुत्र, मुलगा, सुकुमार, बालक यांचा सांकेतिक अर्थ सारखाच असला तरी शैलीगत अर्थ मात्र वेगळा आहे.

४) भावपर अर्थ –

बोलणाऱ्याच्या पद्धतीवरून त्याच्या शब्दांचे अर्थ व्यक्त होतात. एकच शब्द कशा पद्धतीने उच्चारला जातो यावर त्याचा अर्थ अवलंबून असतो. यालाच भावपर अर्थ म्हणतात.

उदा. बाळा, नेहमी **शहाण्यासारखं** वाग हा. (शहाणा)

आला मोठा **शहाणा** मला सांगणारा (आगाऊ)

तू अति**शहाणा** आहेस. (मूर्ख)

५) परावर्तितअर्थ –

एखादा शब्द विशिष्ट अर्थाने उच्चारला जातो परंतु ऐकणाऱ्याने जर त्यातून वेगळाच अर्थ लक्षात घेतला तर तो परावर्तित अर्थ असतो. एका सांकल्पनिक अर्थाच्या संप्रेषणार्थ शब्द उच्चारला जातो. परंतु ऐकणाऱ्याला वेगळ्याच सांकल्पनिक अर्थाचे ज्ञान होते. परंतु हेतुपूर्वक ही गोष्ट घडत नाही.

उदा. संस्कृतमध्ये 'अपरोक्ष' म्हणजे नजरेसमोर. परंतु मराठीत मात्र या शब्दाचा प्रचलित अर्थ हा या अर्थाच्या अगदी विरुद्ध आहे. मराठीत 'अपरोक्ष'चा अर्थ पाठीमागे, नजरेआड असा आहे. त्यामुळे 'त्याने माझ्या अपरोक्ष तुला भेटवस्तू दिली' या वाक्याचा वक्त्याच्या मनातील अर्थ व श्रोत्याला कळलेला अर्थ यात भिन्नता असू शकते.

६) साहचर्यपर अर्थ -

काही शब्द नेहमीच एकमेकांच्या बरोबरीने येत असतात. त्यांच्यात अतूट साहचर्य असते. उदा. समारंभ **संपन्न** झाला. आजच्या **ठळक** बातम्या. कामगारांनी संपाचा **इशारा** दिला. **दुःखद** निधन, **स्मित**हास्य इत्यादी.

७) विषय अर्थ-

वाक्यात विशिष्ट शब्दरचना असते. त्या विशिष्ट शब्दरचनेमुळे जो अर्थ प्राप्त होतो त्याला 'विषय अर्थ' असे म्हणतात. हा अर्थ विशेष सूरयोजना करून किंवा बलाघाताद्वारे दाखविता येतो.

उदा. पाऊस आला तेव्हा विजा कडाडत होत्या.

विजा कडाडत होत्या तेव्हा पाऊस आला.

वरवर पाहता ही वाक्ये एकाच अर्थाची वाटली तरी यात विषयार्थ बदललेला आहे.

२इ.५. अर्थपरिवर्तन संकल्पना

शब्द आणि त्याचा अर्थ याचे निकटत्व असते. हंगेरियन भाषाशास्त्रज्ञ उल्मान (**Stephen Ullmann)** यांच्या मते अर्थ म्हणजे ध्वनिरूप आकार आणि त्याचा आशय यांमधील संबंध होय. शब्द आणि त्याचा अर्थ किंवा आशय यात बदल झाला की अर्थपरिवर्तन घडून येते. अनेक शब्द काळाच्या ओघात नष्ट होतात. त्यांची जागा नवे शब्द घेतात. काहीवेळा माणसाला असणारे नाविन्याचे वेड, त्या त्या काळची परिस्थिती, परभाषेशी आलेला संपर्क, परभाषेचा अतिरिक्त वापर इत्यादी अनेक कारणांनी मूळ शब्द लोप पावतात.

२इ. ५.१. अर्थपरिवर्तनाची कारणे

अर्थपरिवर्तन नेमके कसे घडते याचा विचार केला असता असे लक्षात येते की एखाद्या शब्दाचा अर्थपरिवर्तनात अनेक कारणांचा प्रभाव असू शकतो. अर्थपरिवर्तनाची कारणे पुढील प्रमाणे

१. परिस्थितीतील बदल -

एखाद्या ठिकाणच्या परिस्थितीत, वातावरणात बदल झाला की अर्थपरिवर्तन घडते. परिस्थिती बदलामुळे काही वेळा अर्थसंकोच, अर्थविस्तार होतानाही दिसतो. मेये (Antoine Millet) या भाषावैज्ञानिकाच्या मते भाषिक परिस्थिती, ऐतिहासिक परिस्थिती तसेच सामाजिक स्तरभेद अर्थपरिवर्तनास कारणीभूत ठरतो.

अ. भाषिक परिस्थिती-

भाषेतील विशिष्ट परिस्थितीमुळे काहीवेळा अर्थपरिवर्तन घडून येते. फ्रेंच भाषेत नकारार्थी वाक्यात 'ne'हे अव्यय व अन्य शब्द यांचा एकत्रित उपयोग पूर्वी केला जात असे . उदा. ne....personnel (nobody). परंतु कालांतराने Personne हा एकच शब्द 'person' आणि 'nobody' या दोन्ही अर्थाने वापरला जाऊ लागला. 'ne' हे अव्यय या ठिकाणी लोप पावले.

आ. ऐतिहासिक परिस्थिती-

शब्दाचे स्वरूप पूर्ववत राहिले तरी परिस्थितीत घडून आलेल्या बदलामुळे अर्थपरिवर्तन होते. पूर्वी 'शेगडी' हा शब्द 'कोळशाची चूल' या संदर्भाने वापरला जाई. परंतु आता हा शब्द 'गॅसची शेगडी', 'विजेची शेगडी'या अर्थाने वापरला जातो. परिस्थिती बदलली. वस्तू रूपांतरित झाली. त्यामुळे अर्थपरिवर्तन घडून आले. थोडक्यात मेये यांच्या मते वस्तूरूपांतरात्मक अर्थपरिवर्तन घडून येण्यास ऐतिहासिक परिस्थिती कारणीभूत होत असते.

इ. सामाजिक स्तरभेद-

समाजात विभिन्न गटांत प्रचलित असणारे शब्द जेव्हा अन्य संदर्भात वापरले जातात तेव्हा अर्थपरिवर्तन घडून येते. उदा. नेत्यांना लोकांची नाडी कळली, असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा मूळ वैद्यकशास्त्राच्या संदर्भात वापरला जाणारा शब्दप्रयोग अन्य संदर्भात वापरला गेल्याचे लक्षात येते. येथे त्या शब्दाच्या मुळातील अर्थात बदल घडून आलेला दिसतो. इंग्रजी भाषेतील मदर, फादर, ब्रदर, सिस्टर हे शब्द वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या अर्थाने वापरले जातात. 'फादर'हा एकच शब्द घरात आणि प्रार्थना मंदिरात वेगळ्या अर्थाने वापरला जातो. तेच 'सिस्टर' या शब्दाबाबतही सांगता येईल. बंधू-भगिनी हा शब्द सुद्धा घरात वेगळ्या अर्थी तर व्याख्यानप्रसंगी वेगळ्या अर्थाने वापरला जातो.

२. भौगोलिक परिस्थिती -

भौगोलिक वातावरणाचा शब्दाच्या अर्थावर परिणाम होताना दिसतो. 'कॉर्न'या शब्दाचा अर्थ अमेरिकेत 'मका' असा होतो तर स्कॉच लोक तो 'बाजरी' या अर्थाने वापरतात. 'ठाकूर' हा शब्द उत्तर प्रदेशात 'क्षत्रिय', बिहारमध्ये 'न्हावी' व बंगालमध्ये 'स्वयंपाकी' या अर्थाने उपयोजिला जातो. स्थानपरत्वे घडणारे अर्थपरिवर्तन यातून दिसून येते.

३. नववस्तूंची निर्मिती -

कोणतीही नवी वस्तू निर्माण झाली की तिला काय संबोधायचे ते ठरवले जाते. यामुळे नवीन शब्दांची भर पडते. काही वेळा जुने शब्दच नव्या वस्तूंसाठी वापरले जातात आणि त्यामुळे जुन्या शब्दांत अर्थपरिवर्तन घडून येते. पूर्वी पाणी पिण्याच्या काचेच्या भांड्याला 'ग्लास' म्हटले जात असे. परंतु आता सर्वच (उदा. स्टील, पितळ, चांदी) पाणी पिण्याच्या भांड्यांना ग्लास म्हटले जाते. आज 'आकाशवाणी' हा शब्द 'रेडिओ' करिता वापरला जातो. मोबाईल संस्कृती फोफावल्यावर 'सेल्फी', 'डीपी' (Display Picture), 'डीएम' (Direct Message), मिसकॉल यासारख्या अनेक नव्या शब्दांची भर पडली आहे.

४. भाषाबंदी-

अशुभ उच्चार टाळण्यासाठी काही विशिष्ट शब्दप्रयोग केले जातात. यातून भाषाबंदीचा प्रत्यय येतो. 'मृत्यू होणे' याऐवजी 'स्वर्गवासी झाले', 'देवाज्ञा झाली', 'देवाघरी गेले', इत्यादी वाक्प्रचार वापरले जातात. त्याचप्रमाणे 'वैधव्य येणे' याऐवजी 'बांगडी फुटणे', 'कपाळ पांढरे होणे' असे वाक्प्रचार प्रचलित असल्याचे दिसून येते.

काहीवेळा भीतीपोटी एखाद्या गोष्टीचा स्पष्ट उल्लेख न करता तो आडवळणाने केला जातो. 'सापाचा' उल्लेख अनेक ठिकाणी 'जनावर', 'थोरला', 'किरडू', 'लांबडा', मामा(मालवणमधी काही भागात) असा केला जातो.

भावनातिशयातूनही भाषाबंदी निर्माण झाल्याचे दिसते. रमाबाई रानडे यांनी लेखनात आपले पती न्यायमूर्ती रानडे यांचा उल्लेख 'स्वतः' असा केला आहे.

५. रूपक -

र. बा मंचरकर यांच्या मते 'रूपक' हे एक महत्त्वाचे अर्थपरिवर्तक आहे. रूपकामुळे अर्थपरिवर्तन तात्काळ होत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. भाषिक समृद्धी प्रमाणेच विस्तार, च्युती, प्रशस्ती, भ्रंश या अर्थ प्रक्रियांना रूपकाची मदत होते. रूपकाची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे-

१. एका भाषेतून दुसऱ्या भाषेत व एका देशातून दुसऱ्या देशात अशाप्रकारे रूपकांचा प्रवास सुरू असतो. जसे 'पांढरा हत्ती', 'चहाच्या पेल्यातील वादळ' ही मराठीत रूढ झालेली रूपके इंग्रजीतून आली आहेत.

२. व्यावसायिकांच्या मर्यादित क्षेत्रातील शब्द रूपकभावाने समाजाच्या व्यापक क्षेत्रात जेव्हा वापरले जातात तेव्हा रूपकजन्य अर्थविस्तार होतो. उदा. 'उचलबांगडी' हा शब्दप्रयोग कोळी जसे जाळे उचलतात तसे उचलणे यावरून घेतला आहे.

३. काही रूपके ऐतिहासिक असतात. उदा. 'अटकेपार जाणे', 'उंट मधे घालणे' यासारखे वाक्प्रचार, तसेच 'पेशवाई', 'गनिमी कावा' यासारखे शब्दप्रयोग इतिहासाची आठवण करून देतात.

४. 'भगीरथ प्रयत्न', 'विश्वामित्री पवित्रा' यासारखी काही पौराणिक रूपकेही प्रचलित असलेली दिसतात.

५. आजूबाजूला खेळले जाणारे खेळ, चालीरीती यातूनही रूपकात्मक अर्थविस्तार होतो. बुद्धिबळासारख्या खेळातून 'मात करणे' हा वाक्प्रचार रूढ झाला.

६. गुणदोषवर्णनात्मक रूपकेही दैनंदिन जीवनात आपण वापरत असतो .उदा. 'कळीचा नारद', 'उथळ माणूस', 'जमदग्नी' इत्यादी.

७. रूपकांनी अमूर्ताला मूर्त करण्याचा प्रयत्न केला जातो. 'गगनाचे पांघरूण', 'देहाचे झाड' अशी कितीतरी उदाहरणे ज्ञानेश्वरीत आढळतात.

८. अतिशयोक्तीपूर्ण रूपकेही प्रचलित असतात . उदा. 'तळहातावरचा फोड', 'मुसळधार पाऊस' इत्यादी.

६. व्यंगात्मकता-

काही वेळा एखाद्याचा उल्लेख उपरोधपूर्ण पद्धतीने केला जातो. या उपरोधपूर्ण बोलण्यात अर्थपरिवर्तन घडून आलेले दिसते. उदा. दारूबाज माणसाला उद्देशून 'पंखाफास', 'पिंडका', 'टँकर', 'देसाड', 'रस्तामोजणी', 'बेवडा', 'तळीराम', 'पेताड', 'ठरकी', 'टँगो' असे शब्द वापरले जातात.

७. पसंती-नापसंती –

काही शब्दांच्या संदर्भातील अर्थपरिवर्तन हे पसंती – नापसंतीचे द्योतक ठरते असा विचार ब्लूमफिल्ड यांनी मांडला आहे. एका वेगळ्या दृष्टिकोनातून त्यांनी अर्थपरिवर्तनाचा विचार केला आहे. आपल्या मताच्या स्पष्टीकरणार्थ त्यांनी इंग्रजी meat या शब्दाचे उदाहरण दिले आहे. Meat या शब्दाचा पूर्वी 'खाद्यपदार्थ' असा अर्थ प्रचलित होता. परंतु आता 'मांस' हा नवा अर्थ त्याला प्राप्त झालेला दिसतो. ब्लूमफिल्ड यांच्या मते हा एका भाषिक प्रक्रियेचा परिणाम होय. 'मांस' या अर्थी योजिल्या जाणाऱ्या 'flesh' या शब्दाऐवजी त्याठिकाणी 'meat' हा शब्द वापरण्यास इंग्रजी निजभाषकांनी अधिक पसंती दर्शविली.

८. शब्दातील संदिग्धता –

काही वेळा समान अर्थाचे अनेक शब्द भाषेत प्रचलित असतात. त्यांचा निश्चित अर्थ सांगता येत नाही. अशावेळी अर्थपरिवर्तन घडते. उदा. अभ्युपगम, गृहीतक, परिकल्पना, अंदाज किंवा चांगला, उत्कृष्ट, सर्वोत्तम तसेच प्रगती, उन्नती, विकास इ.

९. साहचर्य –

वस्तू-विचार-कल्पना यांच्या साहचर्यामुळे शब्दार्थात मोठ्या प्रमाणात अर्थपरिवर्तन घडून येते. हे साहचर्य तीन प्रकारचे असते.

१. कल्पनाजन्य साहचर्य –

काही परस्परभिन्न गोष्टीतही कल्पनांचे साहचर्य असू शकते. उदा. 'आमच्या वर्गात बकासूर आहे.' असे जेव्हा एखादा मुलगा सांगतो तेव्हा प्रत्यक्ष तिथे बकासूर नसतो तर बकासुराच्या अन्न खाण्याच्या पद्धतीशी त्याचा संबंध असतो. हे आपल्या मनातील कल्पनेच्या साहचर्यामुळे हे घडते.

२. निकटत्वजन्य साहचर्य –

दोन भिन्न गोष्टी जेव्हा परस्परांच्या निकट सान्निध्यात येतात त्यावेळेस त्यांची नावे जरी वेगळी असली तरी एकीच्या संपर्कामुळे दुसरीलाही त्यासंदर्भाने नवे नाव मिळते. उदा. ताट घ्या, पाने वाढा (जेवायला वाढा), गोड गळा, तिखट कान तसेच 'ग्लास घ्या' (पाणी घ्या) असे शब्दप्रयोग निकटत्वजन्य साहचर्य दाखवितात.

३. सादृश्यजन्य साहचर्य –

दोन भिन्न गोष्टीतही मानवी मनाला काही ना काही साम्य दिसते. या साम्यामुळेच त्या गोष्टीचे साहचर्य जाणवते. यातूनच एखाद्या वस्तूला विशिष्ट नाव दिले जाते किंवा त्यातून अर्थपरिवर्तन घडते. उदा. 'मीनाक्षी' (माश्यासारखे जिचे डोळे आहेत), 'पाषाणहृदयी' (दगडासारखा, कठोर या अर्थी), 'आंबेमोहोर तांदूळ' (आंब्याच्या मोहराप्रमाणे बारीक व सुगंधी) इत्यादी.

१०. ग्राम्यतापरिहार –

काही वेळा दु:खद, लज्जास्पद गोष्टी तसेच नैसर्गिक लज्जा निर्माण करणाऱ्या गोष्टी यांचा निर्देश स्पष्टपणे न करता तो आडवळणाने, संदिग्धपणे केला जातो. उदा. मूर्ख माणसाला 'अकलेचा कांदा', 'विद्वान' असे संबोधतात. मलशुद्धीचा निर्देश 'परसाकडे', 'शौचास' या शब्दाने केला जातो. पदर येणे, जाणती होणे, वयात येणे, न्हाण आले असा उल्लेख जननक्षमता प्राप्त झालेल्या मुलीच्या बाबतीत केला जातो.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे अर्थपरिवर्तनाला अनेक कारणे असतात. अर्थपरिवर्तनामुळे काही वेळा अर्थसंकोच घडतो तर काही वेळा अर्थविस्तार होतो.

२इ. ५.२. अर्थपरिवर्तन प्रकार/ वर्गीकरण–

अ) जुने वर्गीकरण
आ) नवे वर्गीकरण

अ) जुने वर्गीकरण –

परिवर्तनपूर्व अर्थ आणि परिवर्तनोत्तर अर्थ यांच्यातील परस्परसंबंधावर जुने वर्गीकरण आधारलेले दिसते. यावरून अर्थपरिवर्तनाचे पुढील प्रकार मानले गेले आहेत.

१) अर्थसंकोच –

या प्रकारात अर्थ संकुचित झालेला दिसतो. जुन्या अर्थापेक्षा नव्या अर्थाची व्याप्ती सीमित झालेली दिसते. जुना अर्थ त्यामानाने अधिक विस्तृत व व्याप्त असल्याचा प्रत्यय येतो.

उदा.

शब्द	जुना अर्थ	नवा अर्थ
पंकज	चिखलात जन्मलेले ते (उदा.बेडूक, चिखलातील अन्य कृमी)	कमळ

खग	आकाशात गमन करणारा तो (पक्षी, विमान, सूर्य, चंद्र असा कोणताही अर्थ)	पक्षी
मृग	प्राणी	हरीण
वेणा	वेदना	प्रसूतिवेदना
Meat	Food	Edible flesh

२) अर्थविस्तार –
यामध्ये शब्दाच्या जुन्या अर्थापेक्षा नव्या अर्थाची व्याप्ती अधिक असते. अर्थात यात विस्तृतपणा जाणवतो.

शब्द	जुना अर्थ	नवा अर्थ
कुशल	दर्भ तोडणारा तो कुशल	कोणत्याही कामात निष्णात
यवन	ग्रीक	परकीय
यजमान	यज्ञ करणारा	कोणाचाही धनी, स्त्रीचा पती, भिक्षुकांचा आश्रयदाता

३) रूपकजन्य परिवर्तन–
रूपकाचा वापर रूपकजन्य परिवर्तन अधोरेखित करतो.

१) ढोर मेहनत करणे – अतिशय कष्टाचे काम करणे
२) दुधात साखर पडणे – मूळ चांगल्या गोष्टीत अधिक चांगल्या गोष्टीची भर पडणे.
३) राईचा पर्वत करणे – छोटी गोष्ट मोठी करून सांगणे .
४) बाळकडू मिळणे – लहानपणापासून शिकवण मिळणे.

४. संनिहितार्थ प्राप्ती –
काहीवेळा स्थलकालदृष्ट्या संनिहित अशा अर्थाची प्राप्ती होते. यातून अर्थपरिवर्तन घडते. उदा. आज Cheek या इंग्रजी शब्दाचा अर्थ 'गाल' असा आहे. परंतु हा शब्द प्राचीन इंग्रजीत cease असा होता. याउलट Jaw या शब्दाचा आताचा अर्थ 'जबडा' असा आहे. परंतु फ्रेंच भाषेत त्याचे पूर्वरूप Joue असे आहे. त्याचा अर्थ 'गाल' असा होतो. याठिकाणी संनिहितार्थ प्राप्तीने या दोन्ही शब्दांच्या अर्थाची अदलाबदल झालेली दिसते.

५. अवयवावयवी संबंध –
शब्दाचे दोन अर्थ अवयव – अवयवी संबंधाने जोडलेले असतात. उदा. दरडोई म्हणजे दरमाणशी. येथे केवळ या शब्दाचा अर्थ फक्त डोक्यापुरता मर्यादित नसून तो दरमाणशी (प्रत्येक माणसाला) या अर्थाने वापरला जातो.

६. सौम्यार्थत्व –
शब्दाचा जो मूळ अर्थ असतो त्यापेक्षा नव्या अर्थाचे स्वरूप सौम्य झालेले असते. उदा. अकांडतांडव म्हणजे अकाली केलेले विशिष्ट प्रकारचे नृत्य. परंतु आज त्याचा हट्टी, दुराग्रही, आरडाओरड असा सौम्य अर्थ प्रचलित आहे.

७. तीव्रार्थत्व –

शब्दाचा जो मूळ अर्थ असतो त्यापेक्षा नवा अर्थ अधिक तीव्रता दर्शविणारा असतो. उदा. अरबी भाषेतील 'मिजास' या शब्दाचा अर्थ 'प्रकृती', 'तब्येत' असा आहे. परंतु मराठीत हाच शब्द 'अवाजवी ऐट' किंवा 'शिष्टपणा' या अर्थाने वापरला जातो.

८. अर्थोत्कर्ष–

एखाद्या शब्दाचा एखाद्या भाषेत मूळ अर्थ सीमित असतो परंतु तो अन्य भाषेत अधिक विस्तृत अर्थाने आलेला दिसतो त्याला अर्थोत्कर्ष असे म्हणतात. उदा. फार्सी भाषेत 'असामी' म्हणजे 'माणूस'. परंतु मराठीत बड्या व्यक्तीसाठी असामी शब्द योजिला जातो. त्याचप्रमाणे 'चीज' या शब्दाचा मूळ अर्थ 'वस्तू' एवढाच होता. पण मराठीत उत्कृष्ट व वैशिष्ट्यपूर्ण अशा वस्तू संदर्भात हा शब्द वापरला जातो.

९. अर्थापकर्ष –

बोलण्याच्या ओघात किंवा अज्ञानामुळे काही शब्दांचा चांगला अर्थ निघून जातो. तो शब्द वाईट अर्थाने वापरला जातो. पूर्वी त्या शब्दाचा कधीतरी अर्थ चांगला होता हेही विसरले जाते याला अर्थापकर्ष असे म्हणतात. उदा. 'अवतार' हा शब्द देवादिकांचे अवतार या संदर्भात वापरला जात असे. परंतु मराठीत तो 'गबाळा', 'बावळट', 'गचाळ' या अर्थाने रूढ झाला आहे. 'श्यालक' या संस्कृत शब्दाचा मूळ अर्थ 'मेहुणा' असा आहे. परंतु मराठीत यापासून 'साला' (एक शिवी) हा शब्द आलेला आहे.

आ) <u>नवे वर्गीकरण –</u>

जुने वर्गीकरण विचारात घेता अर्थपरिवर्तन कशाप्रकारे होते हे नेमकेपणाने लक्षात येत नाही. म्हणून आधुनिक भाषावैज्ञानिकांनी वर्गीकरणासंदर्भात नव्याने विचार केलेला दिसतो. भाषावैज्ञानिक दृष्ट्या एखाद्या शब्दाचा अर्थ म्हणजे तो शब्द ज्या ज्या संदर्भात वापरला जाऊ शकतो त्या सर्व संदर्भाचा एकत्रित समूह. उदा. 'पात्र' या शब्दाचा विचार करू. 'पात्र' या शब्दाचे भांडे, नदीचे पात्र, नाटकातील पात्र, योग्य वा अर्हताप्राप्त असे संदर्भाप्रमाणे अनेक अर्थ आहेत.

या संकल्पनेनुसार अर्थपरिवर्तनाची व्याख्या 'शब्दाच्या भाषिक संदर्भात होणारा बदल' अशी होईल. या बदलाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

१. भाषिक संदर्भाचा संकोच
२. भाषिक संदर्भाचा विस्तार
३. भाषिक संदर्भातील बदल

१) अर्थसंकोच –

एखादा शब्द पूर्वीपेक्षा कमी संदर्भात वापरला जाऊ लागला की अर्थसंकोचाचा प्रत्यय येतो. काही वेळा सततच्या साहचर्यामुळे शब्दाबरोबर येणारे नाम किंवा विशेषण शब्दाचा अर्थ मर्यादित करते. मात्र नंतर या नामाचा किंवा विशेषणाचा लोप झाला तरी शब्द मर्यादित अर्थानेच उपयोगात राहिलेला दिसतो. उदा. पूर्वी 'कुंकुमपत्रिका' हा शब्द वापरात होता. परंतु आता फक्त 'पत्रिका' हाच शब्द उपयोजिला जातो. याच पद्धतीने श्राद्धतिथी – तिथी, तीर्थयात्रा- यात्रा या शब्दांचा विचार करता येईल.

ब्लूमफिल्डच्या मते, एखादा शब्द जर त्याच्या सर्व संदर्भापैकी काही विशिष्ट संदर्भातच पुन्हा पुन्हा वापरला गेला तर ऐकणारा या अर्थाशयालाच त्या शब्दाचा पूर्ण अर्थ मानतो व परिणामी अर्थसंकोच घडून येतो.

२) अर्थविस्तार –

शब्दाचा उपयोग पूर्वीपेक्षा अधिक संदर्भात केला जाऊ लागला की अर्थविस्तार घडून येतो. भाषावैज्ञानिक श्पेर्बर यांच्या मते ही अर्थविस्ताराची प्रक्रिया समजून घेण्यासाठी शब्द विस्तारित अर्थाने प्रथम कोणत्या संदर्भात वापरला गेला हे जाणणे आवश्यक असते. उदा. पूर्वी व्यास ज्या पीठावर अधिष्ठित होत त्या पीठास व्यासपीठ म्हटले जात असे. परंतु आता कोणत्याही वक्त्याची बोलण्याची जागा असा व्यापक अर्थ घेतला जातो. मागे उद्धृत केलेले 'प्रवीण' (वीणावादनात तरबेज), 'कुशल' (दर्भाचे गवत तोडण्यात निष्णात) हे शब्दही याचप्रकारे विचारात घेता येतील.

३) अर्थान्तर –

एखादा शब्द जेव्हा आपल्या जुन्या भाषिक संदर्भाचा त्याग करून संपूर्णपणे नव्या भाषिक संदर्भात वापरला जाऊ लागतो. तेव्हा अर्थान्तराची प्रक्रिया घडून येते. या संदर्भात मराठीतील 'सुतक' हा शब्द विचारात घेता येईल. पूर्वी हा शब्द 'नवीन बालकाच्या जन्मामुळे येणारे अशौच' या अर्थाने वापरला जात असे. त्यानंतर हा शब्द 'कुटुंबियांचे जन्म व मृत्यू या दोहोंमुळे येणारे 'अशौच' या अर्थाने वापरला जात असे. परंतु कालांतराने फक्त 'मृत्यूमुळे येणारे अशौच' या अर्थाने तो उपयोजिला जाऊ लागला. अर्थांतर प्रक्रियेमुळे जुना भाषिक संदर्भ जाऊन पूर्णपणे नवा भाषिक संदर्भ 'सुतक' या शब्दाला प्राप्त झालेला दिसतो.

४) वस्तुरूपान्तर–

प्रत्यक्ष शब्दाच्या आकारात व स्वरुपात बदल न होताही शब्दामुळे व्यक्त होणाऱ्या वस्तूच्या स्वरूपात बदल घडून येतो. या प्रक्रियेला वस्तुरूपान्तर असे म्हणतात. यासंदर्भात 'शेगडी' हा शब्द विचारात घेता येईल. पूर्वी हा शब्द 'कोळशाची शेगडी' या संदर्भाने वापरला जात असे. कालांतराने कोळशाच्या शेगडीची जागा गॅस व विजेच्या शेगड्यांनी घेतली. तरीसुद्धा या दोहोंसाठी 'शेगडी' हाच शब्द प्रचलित आहे.

एकंदरीत नव्या वर्गीकरणाचा विचार करता ते अधिक शास्त्रशुद्ध वाटते.

२.इ.६. भाषिक आदान स्वरूप

जेव्हा दोन भिन्न भाषक एकमेकांच्या संपर्कात येतात तेव्हा एकमेकांच्या भाषेतील शब्द, वाक्प्रचार, उच्चारण लकब तसेच काही वैशिष्ट्यपूर्ण शब्द यांचे आदान-प्रदान होते. संपर्कामुळे परस्परांतील चालीरिती, खाद्यपदार्थ, संस्कृती यांचा एकमेकांना परिचय होतो. परिणामी त्याच्याशी संबंधित असलेले शब्दही स्वीकारले जातात. मराठी भाषकांचा ज्यावेळी इंग्रजी, कानडी, फारसी, हिंदी भाषकांशी संपर्क आला तेव्हा या भाषेतील अनेक शब्द मराठीने स्वीकारले. Mobile, Bike, Mixer, Teacher, Exam, Restaurant असे इंग्रजीतील कितीतरी शब्द सर्रास वापरले जातात. कन्नड भाषेतून टपाल, चिंधी, खिडकी, अडकित्ता हे शब्द तर, फारसीतून तालुका, हमाल, ताकद, कुलूप असे शब्द मराठीत आलेले आढळतात. फारसी उपसर्ग आणि प्रत्यय लागून मराठीत कितीतरी शब्द आलेले

दिसतात. उदा. बिनतक्रार, दररोज, बेजबाबदार, नाइलाज, नापसंत, कमकुवत, बिनधास्त, दवाखाना, गोलंदाज, अर्जदार, कारागीर, गाडीवाला, उमेदवार, आरामशीर, मुलुखगिरी, जादूगार, भांडवलशाही इत्यादी. अशा प्रकारच्या आदानामुळे नक्कीच ती ती भाषा अधिक समृद्ध होत जाते. आदान - प्रदानामुळे भाषिक व्यवहार सुलभ होतो.

२इ. ६. १. भाषिक आदानाची कारणे :

एक भाषिक दुसऱ्या अन्य भाषिकांच्या भाषेतील शब्द स्वीकारतो. सहजपणे ते शब्द तो दैनंदिन व्यवहारात वापरत असतो. भिन्न भाषिकांमध्ये होणारी आदान-प्रक्रिया लक्षात घेता आदान होण्यामागे पुढील कारणे असल्याचे लक्षात येते.

१. अनुकरण प्रवृत्ती

२. अभिव्यक्तीची गरज

३. सामाजिक दर्जा

१. अनुकरण प्रवृत्ती-

अनुकरण करणे हा मानवी स्वभाव आहे. नवनवीन गोष्टी आत्मसात करणे, त्याचे अनुकरण करणे याकडे माणसाचा कल असतो. काही वेळा स्वभाषेत प्रतिशब्द असला तरी आपल्याला अपेक्षित असलेला अर्थ त्यातून प्रभावीपणे व्यक्त होतोच असे नाही. पर्यायाने अनुकरण करण्याकडे प्रवृत्ती असते. जसे 'ताण' ऐवजी 'Tension', 'शैली' ऐवजी 'Style' सहल ऐवजी 'Picnic' इत्यादी.

२. अभिव्यक्तीची गरज-

दोन भिन्न भाषिकांचे आचार- विचार, त्यांच्या चालीरिती, रूढी- परंपरा, विशिष्ट वस्तूला प्रचलित असलेले विशिष्ट शब्द, संस्कृती यात थोड्याफार प्रमाणात फरक असतो. त्यामुळे दुसऱ्या भाषिकात वर उल्लेख केलेल्या बाबींसाठी जे शब्द वापरले जातात ते कदाचित आपल्या भाषेत प्रचलित असतीलच असे नाही किंवा त्यांना प्रतिशब्द उपलब्ध नसेल तर अभिव्यक्तीसाठी असे शब्द स्वीकारण्याकडे भाषकांचा कल दिसतो. उदा. ट्रेन, लाईट, पेपर, पेन, बसस्टॅन्ड, शूज, टेबल इत्यादी.

३. सामाजिक दर्जा-

सामाजिक प्रतिष्ठा जपण्याच्या हेतूने अन्य भाषेतील शब्द स्वभाषेत स्वीकारले जातात. प्रतिष्ठेसाठी अशाप्रकारे इंग्रजीतून मराठीत आलेले कितीतरी शब्द आढळतात. आई-बाबा ऐवजी Mom - dad, जेवणा ऐवजी Lunch/ Dinner साखरपुडा ऐवजी engagement, वाढदिवसाऐवजी birthday, केशकर्तनालय ऐवजी salon, पाहुणे ऐवजी guest, परीक्षा ऐवजी exam असे कितीतरी शब्द सामाजिक दर्जापायी वापरले जातात.

२इ. ६.२. भाषिक आदानाचे प्रकार

अ.ब्लूमफिल्डचे वर्गीकरण

ब. हॉकेटचे वर्गीकरण

ब्लूमफिल्डचे वर्गीकरण :

लिओनार्ड ब्लूमफिल्ड (Leonard Bloomfield) यांनी दोन भाषिक समाजातील संबंधाचे स्वरूप व आदानाची सर्वसाधारण दिशा यावर आधारित मानलेले आदानाचे प्रकार पुढील प्रमाणे -

१. सांस्कृतिक आदान
२. संनिहित आदान
३. बोलींमधील आदान

१. सांस्कृतिक आदान-

भाषक एकमेकांच्या संपर्कात आले की त्यांच्यात आदान प्रक्रिया घडते. प्रत्येक भाषक आपल्या शेजारील सीमा प्रदेशातील भाषकांकडून, भिन्न भाषा असलेल्या शेजाऱ्याकडून काही ना काही स्वीकारत असतो. संस्कृती, आचार- विचार या बरोबरीनेच भाषिक आदान होत असते. जसे अक्कल, इमारत, गरज, फजिती, मस्करी यासारखे अरबी शब्द, जाहिरात, मेजवानी, सतरंजी, दरवाजा यासारखे फारसी शब्द मराठीत रूळलेले दिसतात. इंग्रजी भाषेतील बॅट, बॉल, कॉम्प्युटर यासारखे शब्द मराठीत सहजपणे वापरले जातात. जसे आदान घडते तसे प्रदानही घडत असते.

२. संनिहित आदान -

ब्लूमफिल्डच्या मते भौगोलिक वा राजकीय दृष्ट्या एकच गणल्या गेलेल्या समाजात ज्यावेळी एकापेक्षा अधिक भाषा बोलल्या जातात व आदान-प्रदान घडते त्याला संनिहित आदान असे म्हणतात. जीत- जेते संदर्भात आदान प्रामुख्याने श्रेष्ठ भाषेकडून कनिष्ठ भाषेकडे होताना दिसते. मराठी भाषेने अशाप्रकारे फारसी तसेच अरबी व तुर्की भाषातूनही शब्द स्वीकारलेले दिसतात.

उदा. अरबी व फारसीतून मराठीत आदान झालेले शब्द पुढीलप्रमाणे -

१) **युद्धविषयक -** कैद, फौज, तह, बंदूक, चिलखत, निशाण इत्यादी.
२) **बांधकाम विषयक -** इमारत, दरवाजा, जमीन, गिलावा इत्यादी.
३) **वस्त्रविषयक -** पोशाख, रुमाल, तुमान, सदरा, विजार इत्यादी.
४) **संगीतविषयक -** सनई, कव्वाली, मैफल, जलसा, शाहीर, तबला इत्यादी.
५) **लेखनविषयक -** कलम, किताब, कागद, दौत, शाई इत्यादी.
६) **खाद्यपदार्थ -** बिर्याणी, खिमा इ.

पोर्तुगीज भाषेतूनही आदान झालेले अननस, इस्त्री, घमेले, पगार, लिलाव इत्यादी शब्द मराठीत रूळलेले दिसतात. काही वेळा अन्यभाषी लोक स्थलांतर करून एखाद्या प्रदेशात स्थायिक झाल्यामुळेही संनिहित आदानाची परिस्थिती निर्माण होते.

१. बोलींमधील आदान -

समाजात विविध बोली बोलणारे भाषक असतात. आर्थिक व्यवहार, सभा- संमेलने, बाजारहाट अशा अनेक कारणांनी लोक एकत्रित येतात. यातून आदान- प्रदान घडते. साधारणतः समाजातील उच्चवर्णियांचे अनुकरण बहुजनवर्ग करताना दिसतो. जित- जेते संबंधात जेत्यांच्या भाषेचे अनुकरण जित लोक करताना दिसतात. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक व्यवहाराची केंद्रे ही भाषिक आदानाचीही मुख्य केंद्रे होतात. खेड्यापाड्यातून शहराकडे येणारे लोक शहरी भाषेतील कितीतरी शब्द आपल्या बोलीत वापरताना दिसतात. समाजातील लोकांचा एकमेकांशी जसा संपर्क वाढेल तसतसे हे आदान वाढत जाते. दळणवळणाच्या कित्येक गावे, शहरे जोडली गेली आहेत. साहजिकच यामुळे आदानाचा वेग वाढलेला दिसतो.

ब. हॉकेटचे वर्गीकरण -

हॉकेट (Charles F. Hockett) या भाषावैज्ञानिकाने आदानाचे प्रकार पुढीलप्रमाणे सांगितले आहेत.

१. शब्दादान (Loan word)-

एका संस्कृतीचा जेव्हा विभिन्न संस्कृतीशी संपर्क येतो त्यावेळेस त्या संस्कृतीतील अनेक गोष्टींचा (वस्तू, चालीरीती, खाद्यपदार्थ इत्यादी) स्वीकार केला जातो. त्याचप्रमाणे स्वभाषेत त्या संस्कृतीतील विविध गोष्टींसंदर्भात वाचक शब्द किंवा नावे उपलब्ध नसतील तर असे शब्द किंवा नावांचा स्वीकार करीत असतो. अशावेळी शब्दादान घडून आल्याचे दिसते. मराठीत असे इंग्रजी, पोर्तुगीज, फारसी, अरबी मधून असंख्य शब्द आलेले आहेत .

उदा.

१. इंग्रजीमधून मराठीत आलेले शब्द - बॅटरी, डॉक्टर, टेबल, ग्लास, फ्रीज, प्लंबर इत्यादी

२. पोर्तुगीजमधून मराठीत आलेले शब्द- पाव, पगार, तुरुंग, अननस, बटाटा, साबण इत्यादी

३. अरबीमधून मराठीत आलेले शब्द - अक्कल, अफवा, गरीब, तमाशा, फिर्याद, मसाला इ.

४. फारसीमधून मराठीत आलेले शब्द - कारखाना, कागद, रस्ता, सतरंजी, सामान, बक्षीस

२. रूपांतरादान (Loan shift)-

काही वेळा परभाषेतील शब्द स्वीकारण्याऐवजी स्वभाषेतील एखादा शब्द परभाषेतील शब्दाचा आदर्श ठेवून काहीशा वेगळ्या अर्थाने वापरला जाऊ लागतो. तेव्हा रूपांतरादान घडते. या दृष्टीने लग्नापूर्वीचा एक विधी 'साखरपुडा' याचे उदाहरण लक्षात घेता येईल. पूर्वी भावी वधूच्या हातात साखरेचा पुडा देण्याची पद्धत या विधीत प्रचलित होती. परंतु कालांतराने यासाठी 'एंगेजमेंट' हा शब्द वापरला जाऊ लागला. आता 'साखरपुड्या' ऐवजी 'एंगेजमेंट रिंग' देण्याची पद्धत स्वीकारलेली दिसते. तसेच sonnet या इंग्रजी शब्दाकरिता मराठी खास ध्वनिसाम्य दाखवणारा 'सुनीत' हा शब्द उपयोजिला गेलेला दिसतो. परभाषेतील शब्द दोन भिन्न अर्थाने वापरला जात असेल तर त्यानुसार स्वभाषेत केवळ एकच अर्थ तो उपयोगात आणला जातो. उदा. इंग्रजीतील 'Responsible' हा

शब्द. Responsible चा मराठी प्रतिशब्द ‘जबाबदार’ हा आहे. हा शब्द दोन अर्थाने वापरला जातो. लोकशाहीत सरकार पार्लमेंटला जबाबदार असते या वाक्यात ‘जबाबदार’ चा अर्थ ‘Answerable’ या अर्थी आला आहे. परंतु ‘कुटुंबातील जबाबदार व्यक्ती’ या वाक्यात मात्र तो प्रमुख व्यक्ती, कर्तव्य पार पाडणारी व्यक्ती असा होतो.

३. भाषांतरदान- (Loan translation)

परभाषेतील शब्द जर एकापेक्षा अधिक पदिम एकत्र येऊन बनला असेल तर परभाषेतील पदिमांना समानार्थी असे स्वभाषेतील पदिम एकत्र आणून नवीन शब्द बनविण्याकडे आदान करू इच्छिणाऱ्या भाषकांचा कल दिसतो. उदा. ओष्ठशलाका (Lipstick), हस्तपोच (Hand-delivery), यष्टीरक्षक (Wicket-keeper), मधुचंद्र (Honeymoon), भ्रमणध्वनी (Mobile), दूरचित्रवाणी (Television)

काहीवेळा मात्र यात अतिरेक होताना दिसतो. बऱ्याचदा परभाषेतील शब्दांना स्वभाषेतील क्लिष्ट शब्द प्रतिशब्द म्हणून उपयोजिले जातात. उदा. Dry-Cleaning Laundry (शुष्क वस्त्र प्रक्षालनागर). परभाषेतील अशाप्रकारचे काही वाक्प्रचारही मराठीत रूळलेले दिसतात. उदा. नक्राश्रू (Crocodile tears), सिंहाचा वाटा (Lion's share) इ.

४. संमिश्रादान - (Loan Blend)

शब्दादान व रूपांतरादान या दोहोंचे मिश्रण होऊन 'संमिश्रादान' घडून येते. यातला काही भाग हा आदान शब्द तर काही भाग भाषांतरित किंवा रूपांतरित असतो. उदा. लिहिणेबल, वाचणेबल, खाणेबल अशा शब्दांचा वापर सरासपणे होताना दिसतो. यातील -able हा इंग्रजी प्रत्यय जशाच्या तसा ठेवून क्रियेचे रूप मात्र मराठीच ठेवलेले दिसते. याव्यतिरिक्त मोटारगाडी (Motorcar), बसस्थानक (Bus stand) असेही शब्द प्रचलित आहेत. तसेच फारसीतून आलेला पण मराठीत रूळलेला ‘बाज’ प्रत्यय इंग्रजी power या शब्दाला जोडून ‘पॉवरबाज’ असा तयार झाला आहे.

५. उच्चारणादान- (Pronunciation Borrowing)

प्रतिष्ठेखातर समाजातील प्रतिष्ठितवर्ग जी प्रमाणभाषा बोलतो तसे उच्चार करण्याकडे समाजातील अन्य वर्गांचा कल दिसतो. उदा. ‘हाय’ ऐवजी ‘आहे’, ‘नाय’ ऐवजी ‘नाही’, ‘कवा’ ऐवजी ‘केव्हा’ इत्यादी.

६. व्याकरणादान - (Grammatical Borrowing)

एका भाषेकडून दुसऱ्या भाषेचे महत्त्वाचे व्याकरणिक घटक बहुधा प्रत्यक्षपणे स्वीकारले जात नाहीत. परंतु अप्रत्यक्षपणे व्याकरणादान घडत असते. प्रत्ययांसहित व प्रत्ययांशिवाय अनेक फारशी शब्द मराठीत आलेले आहेत. वतनदार, इमानदार, जमीनदार हे शब्द मराठीने स्वीकारलेच शिवाय या शब्दांमधून आलेला ‘दार’ हा तद्धित प्रत्यय लागून ‘चवदार’, ‘पाणीदार’ यासारखे मराठी शब्द प्रचारात येऊन मराठी प्रत्यय बनला. ‘पोटगी’, ‘देणगी’ यासारख्या शब्दावरून ‘गी’ हा प्रत्यय मराठीत मानला गेल्याचे दिसते.

२इ. ६. ३. आदानाचा भाषेवरील परिणाम-

आदानामुळे एका भाषेतील शब्द दुसऱ्या भाषेत स्वीकारले जातात. आदान केलेले शब्द स्वभाषेत हळूहळू रूळतात. भाषाव्यवहार अधिकाधिक सुलभ होण्यास तसेच भिन्न भाषकातील संपर्क वाढण्यास आदान महत्त्वाचे ठरते.

ज्या भाषेत आदानप्रक्रिया घडते त्या भाषेच्या रूपात बदल होतो. त्या भाषेचा शब्दसंग्रह समृद्ध होतो. व्याकरणिक आदानामुळे तर भाषेच्या संरचनेवर परिणाम होतो. कालांतराने हा बदल स्वीकारला जाऊन त्या भाषेची व्याकरणव्यवस्था ठरते. अभिव्यक्तीला ही गोष्ट तसे पाहता पोषकच ठरते. कालौघात भाषा नष्ट न होता आदान प्रक्रियेमुळे त्या नक्कीच टिकून राहतील. अधिकाधिक समृद्ध होतील. म्हणूनच आदान प्रक्रिया महत्त्वाची आहे.

२इ.७. समारोप

अर्थाचे लवचिक स्वरूप ध्यानी घेतले की अर्थप्रक्रियांचे काटेकोर वर्गीकरण कसे अशक्य आहे, त्याची कल्पना येते. अर्थाचा संबंध मन:प्रतीतीशी असल्याने अर्थपरिवर्तनाची कारणे एकमेकांमध्ये गुंतलेली दिसतात. भाषेच्या आशयाचा विचार करणारे भाषाविज्ञानाचे अंग अर्थविचार (Semantics) म्हणून ओळखले जाते. या अर्थविन्यासामधील अर्थाचे स्वरूप, प्रकार, परिवर्तनाची कारणे, प्रकार, नवे-जुने वर्गीकरण, आदान संकल्पना याबाबत आपण विचार केला.

आपली प्रगती तपासा

१) अर्थपरिवर्तन संदर्भातील लेख नीट वाचून झाल्यावर तुम्हाला अर्थपरिवर्तनाचे किती प्रकार आठवतात ते उदाहरणांसह लिहून काढा.

२इ.८. संदर्भ पुस्तके व अधिक वाचनासाठी पुस्तके

१. मालशे, स.गं., पुंडे, द.दि, सोमण, अंजली : 'भाषाविज्ञान परिचय', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९८७, तृ.आ.२००९.

२. मालशे, स.गं, इनामदार, हे.वि, सोमण, अंजली : 'भाषाविज्ञान: वर्णनात्मक आणि ऐतिहासिक', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९८२, च.आ.२०१०.

३. मंचरकर, र.बा. : 'भाषाशास्त्र – विचार', युनिव्हर्सल प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ.१९७५.

४. जोशी, प्र.न. : सुबोध भाषाशास्त्र, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ.१९९८, द्वि.आ.२००३.

५. कानडे, मु.श्री : 'मराठीचा भाषिक अभ्यास : ऐतिहासिक आणि वर्णनात्मक', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ.१९९४, तृ.आ.२००४.

६. गोविलकर, लीला : 'वर्णनात्मक भाषाविज्ञान', आरती प्रकाशन, डोंबिवली, प्र.आ.१९९२.

७. काळे, कल्याणी, सोमण, अंजली : ‘आधुनिक भाषाविज्ञान’, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९९९.

८. कुलकर्णी, आरती : ‘भाषाविज्ञान: संकल्पना व स्वरूप’, विजय प्रकाशन, दु.आ.२००९.

२इ.९. सरावासाठी प्रश्न

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. अर्थ म्हणजे काय ते सांगून अर्थपरिवर्तनाचे प्रकार सविस्तर स्पष्ट करा.
२. अर्थपरिवर्तन म्हणजे काय? अर्थपरिवर्तनाची कारणे सविस्तर लिहा.
३. अर्थपरिवर्तनातील नवे-जुने वर्गीकरण उदाहरणांसह लिहा.
४. भाषिक आदानाबाबत ब्लूमफिल्ड व हॉकेटची भूमिका सविस्तर स्पष्ट करा.
५. आदानाचे प्रकार आणि कारणे सविस्तर स्पष्ट करा.

आ) टिपा लिहा.

१. अर्थाचे प्रकार
२. अर्थपरिवर्तनाचे कारण – रूपक
३. सांस्कृतिक आदान
४. अर्थपरिवर्तन – नवे वर्गीकरण

❖❖❖❖

३

मराठी भाषेची पूर्वपीठिका
(आर्य भारतीय भाषांमधील परिवर्तन, अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांत)

घटक रचना :

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ आर्यभारतीय भाषाकुल: प्राचीन अवस्था

अ. वैदिक संस्कृत

ब. पाणिनीय-उत्तरकालीन (अभिजात) संस्कृत

३.३ आर्यभारतीय भाषाकुल: मध्य अवस्था

अ. प्राकृत

१. पाली प्राकृत

२. अन्य प्राकृत भाषा

ब. अपभ्रंश भाषा

३.४ आर्यभारतीय भाषाकुल: अर्वाचीन अवस्था

३.५ अंतर्-बहिर्वर्तुळ सिद्धांत

३.६ इतर अभ्यासकांचा विचार

३.७ मराठीची प्रकृती

३.८ समारोप

३.९ संदर्भ ग्रंथ

३.१० पूरक वाचन

३.११ सरावासाठी प्रश्न

३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- मराठी भाषेची पूर्वपीठिका सांगता येईल.
- संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश-मराठी ही साखळी उलगडून दाखवता येईल.

- आर्य भारतीय भाषेतील परिवर्तन सांगता येईल.
- आर्य भारतीय भाषांची वैशिष्टे सांगता येतील.
- आधुनिक आर्य भाषांच्या संदर्भात महत्त्वाचा मानला गेलेला अंतरवर्तुळ-बहिर्वर्तुळ हा सिद्धांत सांगता येईल.

३.१ प्रस्तावना

जगातील सर्वात बुद्धिमान प्राणी म्हणजे माणूस. त्याने आपल्या गरजा भागविण्यासाठी विविधांगाने प्रयत्न केले. आरंभीच्या काळात मानवाने इतरांशी संपर्क करणे, विचारविनिमय करण्यासाठी भाषेची निर्मिती केली. म्हणजे भाषा ही मानवनिर्मित आहे. माणूस समाजामध्ये राहत असतो. म्हणून कोणतीही भाषा समाजात निर्माण होत असते. तिथेच तिच्यामध्ये परिवर्तन होत असते. जगामध्ये आज अनेक भाषा बोलल्या जातात. यातील बऱ्याच भाषांना इतिहास आहे. भाषेची जन्मप्रक्रिया प्रदीर्घ काळ चालणारी असते. एक भाषा लोप पावते व दुसरी निर्माण होते. या संक्रमणावस्थेत दोन्ही भाषांच्या खुणा दिसत असतात. अशा भाषेच्या इतिहासाचा अभ्यास करणे म्हणजे तिची पूर्वपीठिका पाहणे होय. मराठीची निर्मिती गेल्या बाराशे-तेराशे वर्षापूर्वीची आहे. मूळ भाषेच्या आठ शाखा मानल्या जातात. आर्य भारतीय, अर्मिनियन, स्लाब्द, अल्यानियन, ग्रीक, लॅटिन, पेल्टीक, जर्मनिक. प्रत्येक परिवाराच्या उपशाखा आहेत. यातील 'भारत युरोपीय या प्रमुख भाषाकुलाची एक उपशाखा 'भारतीय आर्य या नावाने भारतात स्थिरावली. भारतातील वैदिक संस्कृत, पाणिनीय संस्कृत, पाली शौरसेनी, पैशाची, मागधी, महाराष्ट्री, अपभ्रंश, हिंदी, गुजराती या सर्व भाषांचा अंतर्भाव या पहिल्या वर्गात होतो. या 'भारतीय-आर्य' भाषाकुलातील एक वर्तमान भाषा म्हणजे मराठी होय'. भाषाशास्त्रज्ञ तिला 'इंडो-इरानियन' या प्रमुख भाषाकुलामध्ये येणाऱ्या आर्य भारतीय भाषाकुलातील भाषा आहे असे मानतात. मराठी भाषेच्या जन्मापासून आजपर्यंत अनेक परिवर्तने होऊन ती वावरते आहे. तिच्यामध्ये भाषिक स्थित्यंतरे झाली असली तरी स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व तिने टिकवून ठेवलेले दिसते. कोणत्याच भाषेची निर्मिती व तिची वाढ ही एकाकी नसते. तिच्यामध्ये बदल होत असतो. मराठीची प्रकृती संमिश्र स्वरुपाची आहे. तिने संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश भाषेतून अनेक बाबी घेतल्या. प्रामुख्याने अनेक शब्दांचे ऋण संस्कृतकडून स्वीकारले. भावे प्रयोगातील क्रियापदे तृतीयपुरूषी एकवचनी ठेवण्याची पद्धत मराठीने संसकृतकडून घेतलेली दिसते. शौरसेनी मागधी, अर्धमागधी, पैशाची या भाषांमधील अनेक खुणा मराठीमध्ये दिसतात. कमळ, सरळ, काजळ यातील 'ळ' कार पालीतून आला आहे. उष्ण: उन, पर्ण:पान, कर्ण: कान असे 'ण' चा 'न' करण्याची प्रवृत्ती पैशाचीमधून घेतलेली दिसते. 'स' बद्दल 'श' करण्याची प्रवृत्ती मागधी भाषेतून आली आहे. उदा. केशर: केसर, तर आकारान्त पुल्लिगीं नामे न बदलणे, नामे स्वरान्त ठेवण्याची वृत्ती, नामाला लागणारे विभक्ती प्रत्यय, आकारान्त पुल्लिंगी नामाचे एकवचन उकारान्त ठेवण्याची प्रवृत्ती, अन्त्य यमक, इच्छादर्शक धातू, काही छंद यासारख्या अनेक बाबी मराठीने महाराष्ट्री भाषेतून घेतल्या आहेत. अलीकडील मराठी भाषेचे स्वरुप पाहिले असता तिने उर्दू, फार्सी, द्रावीडी, पोर्तुगीज, इंग्रजी अशा अनेक

परकीय तसेच भारतीय भाषांमधून शब्द स्वीकारले आहेत. मराठीची ही प्रवृत्ती लक्षात घेऊन ती ज्या आर्य भारतीय भाषाकुलातील आहे त्याच्या विविध अवस्था याठिकाणी लक्षात घेऊ.

आर्य भारतीय भाषाकुलाच्या तीन अवस्था

1. प्राचीन अवस्था -
   - वैदिक संस्कृत इ.स.पूर्व १५०० - इ.स.पूर्व १०००
   - अभिजात संस्कृत (पाणिनीय संस्कृत) इ.स.पूर्व १००० ते इ.स. ४-५ वे शतक
2. मध्य अवस्था-
   - प्राकृत - इ.स.पूर्व ६०० ते इ.स. ६००
   - अपभ्रंश - इ.स. ४०० ते इ.स. १२००
3. अर्वाचीन अवस्था
   - आधुनिक भारतीय भाषा
   - इ.स. १००० पासून पुढे

३.२ आर्यभारतीय भाषाकुल - प्राचीन अवस्था

आजपर्यंत अनेक अभ्यासकांनी अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळाच्या परिप्रेक्ष्यातून भाषेच्या पूर्वावस्थेवर प्रकाश टाकला आहे. आर्य भारतीय भाषाकुळातील प्राचीन अवस्था दोन भागात विभागली गेली आहे. यातील एक वैदिक संस्कृत आणि दुसरी अवस्था म्हणजे पाणिनीय-उत्तरकालीन किंवा अभिजात संस्कृत.

अ. वैदिक संस्कृत (इ.स.पूर्व १५०० - इ.स.पूर्व १००० सुमारे)

सर्वसाधारणपणे इ.स.पूर्व १५०० ते इ.स.पूर्व १००० हा वैदिक संस्कृतचा कालखंड मानला जातो. वैदिक संस्कृतमधील ग्रांथिक भाषा म्हणजे ऋग्वेदाची भाषा. पूर्वीच्या उदिच्य (पंजाब) देशात वैदिक संस्कृती नांदत होती. या उदिच्यपासून पूर्वेला प्राच्य (मगध) तसेच दक्षिणेकडे विदर्भापर्यंत आर्यांच्या वैदिक संस्कृतचा प्रभाव पडण्यासाठी लागलेला हा काळ. या भाषेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील रूपवैशिष्ट्ये.

अ) वैदिक संस्कृतची भाषिक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

१. वैदिक संस्कृतमध्ये अ, इ, उ, ऋ, ए, ऐ, ओ, औ हे स्वर आढळतात.

२. ‘ट’ वर्गातील वर्ण आणि ‘ळ’ उच्चार मूर्धन्य आहेत. हे उच्चार द्रावीडी भाषेच्या संबंधातून आले असावेत.

३. आद्य ई ऱ्हस्व ‘अ’ चा ‘इ’ होतो.

४. 'ट' हा मूर्धन्य नव्याने आलेला आहे.

५. 'स', 'श' आणि 'ष' हे घर्षक स्वरूपातील आढळतात.

६. मूळ आर्य भारतीय भाषेतील 'अ', 'इ' आणि 'ओ' या ऱ्हस्व स्वरांचे वैदिक संस्कृतमध्ये 'अ' या एकाच स्वरामध्ये रुपांतर होते.

७. वैदिक संस्कृतमध्ये तीन प्रकारचे 'क' नाहीत तर 'क्व'चे 'क' किंवा 'च' मध्ये भेदन होते.

८. आत्मन मधील 'आ'चा लोप होतो. उदा. 'त्मना देवेभ्य:।'

९. येथे मध्यस्वनागम मोठ्या प्रमाणात होत असे. उदा. स्वर्गो-सुवर्गो, विश्वम-विषुवम्

१०. 'ए' आणि 'ओ' या स्वरांपुढे 'अ' स्वर आला तरी संधी होत नाही. उदा. 'उप प्रयत्ना अध्यरम्। सुजाते अश्व सूनृते।'

११. विशेषणे नामाप्रमाणे येतात.

१२. वैदिक संस्कृतमध्ये तीन लिंगे, तीन वचने, आठ विभक्ती, काळ आणि अर्थ मिळून दहा आख्याते आणि परस्मैदी व आत्मनेपदी धातू अशा भाषिक रुपांनी समृद्ध आहे.

१३. भूतकाळाची तीन रूपे आढळतात.

१४. भविष्यकाळ दर्शविताना 'स्य' प्रत्ययी रुपे दिसून येतात.

१५. कालवाचक क्रियापदांची अशी नियमित रुपे आर्य भारतीय भाषेत आढळत नाहीत.

१६. वैदिक संस्कृतमध्ये प्रथमेचे एकवचन नरास:, देवास:, ब्राईख्रणास: अशी होतात.

१७. षष्ठीचा 'स' सामासिक शब्दामध्ये येतो.

१८. 'प्र' आणि 'सम' इत्यादी उपसर्ग पादपूरणासाठी दोनवेळा येतात. उदा. प्रप्रायमग्नि

वैदिक संस्कृतचा प्राचीन नमूना म्हणून ऋग्वेदाकडे पाहिले जाते. मात्र ऋग्वेदाची रचना टप्प्या-टप्प्याने झाली असावी. असे मानले जाते. तुर्फरी, ताबुव इत्यादी शब्द खाल्डियन किंवा असुर या भाषेतून आलेले शब्द ऋग्वेदामध्ये सापडतात. त्याचबरोबर नेम, पिक, तामरस यासारखे शब्द म्लेंछ भाषेमधून आले आहेत. कमीर, कितब, कुंड, नीहार यासारखे शब्द द्रावीडी भाषेतून आलेले आहेत असे म्हटले जाते. एकूणच वैदिक संस्कृत भाषेवर परकीय भाषांचा प्रभाव असल्याचे म्हटले जाते.

ब. पाणिनीय-उत्तरकालीन (अभिजात) संस्कृत - इ. स. पूर्व १००० ते इ. स. ४-५ वे शतक

वैदिक संस्कृतचे शुद्ध रूप टिकावे म्हणून उदिच्य देशातील पाणिनी यांनी इ.स.पूर्व ५ व्या शतकात 'अष्टाध्यायी' हा ग्रंथ लिहिला. संस्कृतची ही पुढची अवस्था. वैदिक धर्मात समाविष्ट झालेल्या आर्येतरांच्या भाषेचा परिणाम होऊन आर्यांची वैदिक संस्कृत हळूहळू भ्रष्ट होऊ लागली. या काळात संस्कृत भाषेला व्याकरणाच्या चौकटीत बसविलेल्या

व्याकरणबद्ध भाषेला 'पाणिनीय संस्कृत' असे म्हणतात. जगातील श्रेष्ठ भाषा म्हणून संस्कृतचे वैभव या काळात वाढले. या काळात 'रामायण' आणि 'महाभारत' अशी महाकाव्ये रचली गेली. महाकवी कालिदास, कवी भवभूती यांच्या रचना या काळातील. तसेच शंकराचार्य, रामानुजार्य इत्यादींची तत्त्वज्ञानपर भाष्ये याच काळात लिहिली गेली. अभिजात संस्कृत वैदिक संस्कृतची उत्तरकालीन अवस्था असल्यामुळे त्यांच्या स्वनव्यवस्थेमध्ये फारसा फरक दिसत नाही. पाणिनी, पतंजली या व्याकरणकारांनी उत्तरकालीन संस्कृतचे व्याकरण मांडून तिचे स्वरुप स्पष्ट केले. संस्कृतचे व्याकरण मांडल्यामुळे ग्रांथिक भाषा म्हणून ती मान्यता पावली मात्र तिचे बोलीभाषेचे जिवंत, प्रवाही रूप राहिले नाही.

पाणिनीय- उत्तरकालीन (अभिजात) संस्कृतची भाषिक वैशिष्टे :

१. अभिजात संस्कृतमध्ये मूर्धन्य उच्चार असलेले शब्द जास्त प्रमाणात आढळतात.

२. ऋग्वेदाच्या प्राचीन मंडलामध्ये 'र' हा स्वन आढळतो. दहाव्या मंडलापासून 'र' व'ल' हे दोन्ही स्वन आढळतात नंतर 'ल' अधिक प्रमाणात सापडतो.

३. आदान केलेल्या शब्दांची संख्या अधिक आहे.

४. नामविभक्तीमध्ये प्रत्ययांची विपुलता आहे. संस्कृतच्या प्रत्ययी रुपामुळे एक प्रकारचा ठाशीवपणा निर्माण झालेला दिसतो.

५. सामासिक शब्द करण्याची प्रवृत्ती टिकविलेली आहे.

६. वैदिक संस्कृतप्रमाणेच अभिजात संस्कृतमध्येही रुपांची समृद्धी आढळते.

७. अभिजात संस्कृतमध्ये प्रथमेचे एकवचन नरा:, देवा:, ब्राईख्रणा: अशी होतात.

३.३ आर्यभारतीय भाषाकुल : मध्य अवस्था

प्राकृत आणि अपभ्रंश या भाषांचा अंतर्भाव आर्य भारतीय भाषेच्या मध्यावस्थेत केला जातो. संस्कृत व्याकरणबद्ध केल्यामुळे बोलीभाषेच्या वैभावापासून संस्कृत दूर लोटली गेली. तिच्यामध्ये प्रवाहीपणा राहिला नाही. संस्कृत ग्रांथिक भाषा म्हणून राहिली. आपल्याकडे संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश अशी परंपरा मांडली जाते. यासंदर्भात मतभेद आहेत. या भाषांमध्ये सीमारेषा आखता येत नाहीत. एका मतानुसार संस्कृत भाषेपासून निघालेल्या भाषांपैकी संस्कृत भाषेशी विशेषत: वैदिक संस्कृत भाषेशी अत्यंत सादृश्य असलेली भाषा म्हणजे पाली प्राकृत. तिला 'बौद्धमागधी' असेही म्हटले जाते. प्राकृत भाषांचा जन्म कदाचित संस्कृतपूर्वी झाला असावा असा एक मतप्रवाह आहे. गौतम बुद्ध, महावीर यांच्या काळात प्राकृत भाषांचा पुन्हा विकास झाला असावा. या काळात महावीर आणि गौतम बुद्धांचा उदय होऊन त्यांनी धर्मप्रसारासाठी लोकभाषा म्हणून रूढ असलेल्या प्राकृत भाषेचा स्वीकार केला. प्राकृतची व्याकरणे संस्कृत भाषेच्या प्रभावाने निर्माण झाली. प्राकृत भाषांमध्ये प्रथम प्राकृत म्हणून पाली आणि अन्य काही प्राकृत भाषांचा अंतर्भाव होतो.

अ. प्राकृत भाषा - इ.स.पूर्व ६०० ते इ.स. ६००

गौतम बुद्धाने धर्मभाषा म्हणून पालीचा स्वीकार केला. पुढे तिला राजाश्रयही प्राप्त झाला. अनेक भाषाशास्त्रज्ञ पालीला पाणिनीय संस्कृतची भाषाभगिनी मानतात कारण पाली ही पाणिनीय संस्कृतपेक्षा आधीची मानण्याकडे अनेकांचा कल आहे. पाली ही प्रथम प्राकृत म्हणजे सर्वात जुनी प्राकृत भाषा होय. या भाषेच्या नावाबद्दल विद्वानांमध्ये मतभेद आहेत. वि.का.राजवाडे यांनी प्राकृत-पाकड-पाअल-पाल-पाली अशी व्युत्पत्ती सांगितली आहे. तर धर्मानंद कोसंबी 'पाल' म्हणजे 'सुरक्षित राखणे' यावरून ज्या ग्रंथात बुद्धाचे तत्त्वज्ञान सुरक्षित आहे, त्या भाषेला पाली म्हणावे. असे म्हणतात. काही बौद्ध धर्मीय वाङ्मय आणि सम्राट अशोकाच्या काळातील वीसपेक्षा अधिक शिलालेखामध्ये पाली आढळून येते. पाली भाषेची काही वैशिष्ट्ये आपणास दिसून येतात.

१. पाली भाषेची वैशिष्टये -

पाली भाषेमध्ये,

१. 'ऋ' या संस्कृत स्वराऐवजी 'अ', 'इ', 'उ', 'री' असे स्वर येतात. उदा. मृदू-मुदु, धृत-धत

२. 'ऐ' आणि 'ओ' या संयुक्त स्वराऐवजी 'ए' आणि 'ओ' असे एकेरी स्वर येतात. उदा. कैलाश -केलाश, गौतम- गोतम, ऐरावण-एरावण

३. संस्कृत 'अ' चा पाली भाषेत कधी 'ए' कधी 'इ' तर कधी 'उ' होतो. उदा. शय्या-सेया, ऋपु-त्रिपु

४. पालीमध्ये एकमेकांच्या सान्निध्यातील वर्णांच्या उच्चारांचा परस्पर परिणाम होऊन पूर्ववर्ण द्वित किंवा परवर्ण द्वित होतो. उदा. पुत्र-पुत्त (पूर्ववर्ण द्वित) पर्ण - पण्ण, धर्म-धम्म(परवर्ण द्वित)

५. जोडाक्षरांचे सुलभीकरण करताना कधी-कधी मध्येच स्वर जोडला जाऊन स्वरभक्ती होताना दिसते. उदा. सुक्ष्म-सुखुम, दुःखम-दुक्खम, स्मरति-सुमरति

६. पालीमध्ये 'स', 'श', 'ष' ऐवजी फक्त 'स' हा एकच उष्मा वापरला जातो.

७. 'ळ' हा स्वन आढळतो.

८. प्रथमेचे रुप नेहमी ओकारान्त दिसते. उदा. पुत्तो

९. विभक्तीचा विचार करता चतुर्थीऐवजी षष्ठी तसेच पंचमीऐवजी तृतीया विभक्ती यांचा उपयोग केलेला दिसतो. तसेच आकारान्त नामाचा अपवाद सोडता चतुर्थीऐवजी सर्वगामी षष्ठी वापरली जाते.

१०. संस्कृतमधील व्यंजनान्त शब्द पाली भाषेत स्वरान्त आढळतात. उदा. श्रीमत्-श्रीमन्त, गुणवत् - गुणवन्त

११. पालीने संस्कृतमधील निरनिराळे काळ व अर्थ कायम ठेवले. या भाषेत सुलभीकरणाची वृत्ती दिसते.

१२. पालीमध्ये द्विवचन दिसत नाहीत.

२. अन्य प्राकृत भाषा - इ.स. २०० ते इ.स. ६००

इ.स. २०० ते इ.स. ६०० पर्यंतच्या कालखंडात संस्कृत नाटकांतून शौरसेनी, मागधी, महाराष्ट्री या भाषा म्हणजे प्राकृत भाषा आढळतात. त्यातील मागधी प्राच्य देशातील भाषा तर शौरसेनी उदिच्य देशातील भाषा असावी. याबाबत अभ्यासकांमध्ये मतभेद आहेत. एका मतानुसार, संस्कृत नाटकांत गद्यासाठी शौरसेनी तर पद्यासाठी महाराष्ट्रीचा वापर झालेला दिसतो. महाराष्ट्री ही तत्कालीन सर्वच प्राकृत भाषांना सांधून जाणारी भाषा. स्टेनकौनो यांनी महाराष्ट्री ही महाराष्ट्र देशाची भाषा मानली यासाठी त्यांनी दण्डी यांच्या 'महाराष्ट्रश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदु:' या वचनाचा हवाला दिला आहे. मराठीमध्ये महाराष्ट्रीचे विशेष प्रामुख्याने दिसतात. त्यामुळे मराठीच्या पूर्वपीठिकेत तिचा विचार महत्त्वाचा ठरतो. प्राकृतातील बदल हा एक प्रकारचा प्राकृतिक बदल असलेला दिसून येतो. प्राकृत भाषा संस्कृतपासून फार दूर गेलेल्या दिसतात. तसेच त्या पालीच्या जवळच्या दिसतात. प्रथम प्राकृत म्हणून पालीचे विशेष लक्षात घेता येतात. मात्र याठिकाणी पालीपेक्षा वेगळे विशेष पाहता येतात.

अन्य प्राकृत भाषांची वैशिष्टे खालीलप्रमाणे

१. प्राकृतमध्ये चतुर्थी ऐवजी षष्ठी विभक्तीचा वापर झाला.

२. प्राकृतात संस्कृतची गणव्यवस्था कायमची लोप पावली.

३. परस्मैपद, आत्मनेपद याचा भेद राहिला नाही.

४. आख्यात रूपांची व्यवस्था पूर्णत: पालटली.

५. संस्कृतातील कठोर व्यंजने प्राकृतात मृदू होतात.

६. संस्कृतमधील ऱ्हस्व स्वराचा दीर्घ आणि दीर्घ स्वराचा ऱ्हस्व स्वर करणे ही प्रक्रिया सरसकट दिसते.

ब. अपभ्रंश भाषा

एखादी भाषा एकदा व्याकरणबद्ध झाली की साचेबद्धता येते. संस्कृतला पाणिनीने व्याकरणबद्ध केले तर प्राकृत भाषेचे व्याकरण रचून तिला व्याकरणबद्ध करून स्थैर्य प्राप्त करून देण्याचा प्रयत्न वररुची यांनी केला. व्याकरणबद्ध झालेल्या प्राकृतला स्थैर्य मिळाले. या स्थिरत्वामुळे बोलीतील चैतन्य देण्याचे तिचे सामर्थ्य खुंटले. साहजिकच भाषिकांच्या सुलभीकरणाच्या वृत्तीमुळे प्राकृत भाषांचे अवस्थांतर होऊ लागले. यातून इ. स.६०० च्या सुमारास अपभ्रंश भाषांचा उदय होऊ लागला. अभिरादी लोकांकडून बोलली जाणारी भाषा म्हणजे अपभ्रंश भाषा होय. हेमचंद्र आपल्या 'प्राकृतचंद्रिका' या ग्रंथात अपभ्रंश भाषांचे एकूण २७ प्रकार सांगतात. दण्डी आपल्या 'काव्यादर्श' या ग्रंथामध्ये अपभ्रंश ही अभीर लोकांची भाषा आहे असे म्हणतात. अपभ्रंश भाषा 'पैशाची अपभ्रंश', 'मागधी अपभ्रंश', 'अर्धमागधी अपभ्रंश', 'शौरसेनी अपभ्रंश', 'महाराष्ट्री अपभ्रंश' अशा नावाच्या आहेत. जे लोक प्राकृत भाषा बोलत होते त्या लोकांकडून त्या त्या

प्रदेशात अपभ्रंश भाषा निर्माण झाल्या. या अपभ्रंश भाषांपासून अर्वाचीन भाषा तयार झाल्या.

अपभ्रंश भाषांची वैशिष्ट्ये -

1. अपभ्रंश भाषेत 'ऋ' या स्वरा/ ऐवजी 'अ', 'इ', 'उ', 'र', किंवा 'रि' हे पर्याय येतात.
   - 'ऐ' ऐवजी 'ए' किंवा 'अइ' तर 'औ' ऐवजी 'ओ' किंवा 'अउ' येतात.
   - 'न' चा 'ण' होतो.
   - शब्दांच्या शेवटी 'उ' येतो. स्वरांचा उच्चार सानुनासिक होतो.
   - स्त्रीलिंगी नामे आकारान्त होताना दिसतात.
   - क्रियापदाच्या रुपात अगदी सरलत्व आहे.
   - यामध्ये प्राकृतप्रमाणे तीन लिंगे, दोन वचने असून नामाचे चतुर्थी व षष्ठीचे प्रत्यय सारखे आहेत.

३.४ आर्यभारतीय भाषाकुल: अर्वाचीन अवस्था

हिंदुस्थानवर भिन्न भिन्न वंशाच्या, भिन्न संस्कृतीच्या वेगवेगळ्या लोकांनी स्वाऱ्या केल्या. संपूर्ण देश परकीय संस्कृतीच्या सान्निध्यात आल्यामुळे भिन्न भिन्न भाषांचा संघर्ष झाला. त्यातून आधुनिक आर्य भारतीय भाषा निर्माण झाल्या. सर्वसाधारणपणे अर्वाचीन भाषांच्या उदयाचा काळ अकराव्या शतकाचा मानला जातो. प्राकृतमधून अपभ्रंश आणि अपभ्रंश भाषेतून मराठी, राजस्थानी, गुजराती, हिंदी, छत्तीसगढी, अवधी, मैथिली, भोजपुरी, बंगाली अशा भाषा निर्माण झाल्या. मराठी भाषेच्या उदयासंदर्भात अनेक मत-मतांतरे आहेत

अर्वाचीन आर्य भारतीय भाषांची वैशिष्ट्ये -

१. लिखित भाषेत तत्सम म्हणून 'ऋ' चा उपयोग केला जातो.

२. उष्म्यांमध्ये 'स', 'श','ष' यांच्यापैकी ष चा उपयोग 'श' प्रमाणे केला जातो. उदा. कोष-कोश

३. परकीय भाषांमधील अनेक शब्दांचा भरणा आधुनिक आर्य भारतीय भाषांमध्ये दिसून येतो.

४. प्राचीन भारतीय आर्य भाषेत स्त्रीलिंग, पुल्लिंग आणि नपुंसकलिंग यांचा उपयोग केलेला आहे. आज मराठी आणि गुजराती भाषा वगळता इतर भाषांमध्ये फक्त स्त्रीलिंग आणि पुल्लिंग यांचा उपयोग होतो.

५. अर्वाचीन मराठीचा शब्दसंग्रह, विभक्तीप्रत्यय आणि अख्यातव्यवस्था अपभ्रंशाशी मिळतीजुळती असलेली पहावयास मिळते.

६. ऋ बद्दल अ, इ, उ, र, रि हे पर्याय स्वीकारण्याची पद्धत अपभ्रंशाप्रमाणे असलेली दिसून येते.

७. मराठीने पुल्लिंगी अकारान्त नामाच्या प्रथमेची एकवचनी रूपे कधीकधी ओकारान्त करण्याची अपभ्रंशातील प्रवृत्ती स्वीकारली.

८. धातूसाधिते वापरून क्रियापदाचे रूप साधण्याची पद्धती अपभ्रंशाप्रमाणे दिसून येते.

९. मराठीने अपभ्रंशात न आढळणारे भविष्यकाळाचे 'ल' हे नियतचिन्ह स्वीकारले.

१०. अख्यातविभक्तीचा विचार करता क्रियापदांची प्रत्ययी रूपे व धातूसाधिते मराठीने अपभ्रंशातून घेतली आहेत. मात्र संयुक्त क्रियापदे मराठीने स्वतंत्रपणे बनवली.

११. य श्रुती आणि व श्रुती यांचा अपभ्रंशापेक्षा अधिकतर वापर होऊ लागला.

१२. मराठी काव्यामध्ये आढळणारी अन्त्य यमक जुळविण्याची पद्धती मराठीने अपभ्रंशापासून घेतलेली दिसते.

१३. अर्वाचीन भाषेमध्ये स्वरांचे सानुनासिक उच्चारण करण्याची प्रधान प्रवृत्ती दिसून येते.

अशा प्रकारे अर्वाचीन भारतीय भाषांची ठळक वैशिष्ट्ये सांगता येतात. अर्वाचीन भारतीय भाषांचा शब्दसंग्रह मुख्यत: संस्कृतोद्भव समजला जातो. मराठीमध्ये द्रावीडी, कन्नड, तेलगू, अरबी, फार्सी, पोर्तुगीज, इंग्रजी अशा भाषांमधील अनेक शब्द रूढ झालेले आहेत.

आधुनिक आर्य भारतीय भाषा-अपभ्रंश भाषांकडून देशी भाषांकडे प्रवास इ. स. आठव्या शतकापासून भिन्न भिन्न वंशाच्या लोकांनी हिंदुस्थानावर अनेक स्वाऱ्या केल्या. या संघर्षाचा परिणाम आधुनिक आर्य भारतीय भाषांवर झालेला दिसतो. किंबहुना या संघर्षातून आधुनिक आर्य भारतीय भाषा उदयास आल्या. मराठीच्या संदर्भात विचार करताना मराठीची उत्पत्ती कोणत्या भाषेपासून झाली हा प्रश्न वेगळा आहे पण मराठी भाषा महाराष्ट्री प्राकृतशी जुळते. मात्र महाराष्ट्री प्राकृत आणि यादव मराठी यांच्यातील दुवा म्हणजे अपभ्रंश हे विसरून चालणार नाही. "मराठी भाषेच्या स्वरुपाविषयी शं. गो. तुळपुळे यांनी "मराठी हा अपभ्रंशाचा अपभ्रंश नसून संस्कृतीकरणाचा संस्कार झालेला असा उत्क्रांत स्वरुपातील अपभ्रंश होय." असे म्हटले आहे.



आतापर्यंत आपण भाषेच्या विविध अवस्था पाहिल्या. आपण मराठीची पूर्वपीठीका समजून घेताना मराठी ज्या आर्य भारतीय भाषेशी संबंधित आहे तिचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. भारतीय भाषा भारत युरोपीय परिवारातील असून यातील भारत-इराणी-आर्य भाषा हे महत्त्वाचे भाषाकुल. या भाषा कुळातील एक वर्तमान भाषा म्हणून मराठी भाषा प्रचलित आहे. मराठीचा मागोवा घेताना आर्य भारतात आले कोठून आले? कसे आले? किती टोळ्यांनी आले? ते भारतात आले तेव्हा त्यांची भाषा कोणती होती? तीच जनक स्थानी आहे का? याचा विचार करता येतो. भाषाभ्यासकांमध्ये याविषयी मत-मतांतरे पहावयास मिळतात. ही मत-मतांतरे लक्षात घेऊनही सर्वसाधारणपणे आर्य

हिंदुस्तानात टोळी टोळीने अफगाणिस्तानमार्गे आले असावेत. हा काल साधारणत: इ. स. पूर्व १५०० च्या पूर्वीचा नसावा असे मानले जाते. आर्य भारतात आले तेव्हा येताना त्यांनी त्यांची स्वसंस्कृती आणि स्वभाषा आणली. या संदर्भात अंतर्- बहिर्वर्तुळ सिद्धांत आणि त्यासंदर्भातील विविधांगी मते लक्षात घेतल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. त्यामुळे याठिकाणी अंतर्- बहिर्वर्तुळ सिद्धांताचा परिचय करून घेऊ...

३.५ अंतर्- बहिर्वर्तुळ सिद्धांत

आर्य भारतीय भाषा त्याचबरोबर अर्वाचीन अवस्थेतील भाषानिर्मितीच्या बाबतीत होर्न्ले यांनी जो सिद्धांत मांडला तो सिद्धांत 'अंतर्-बहिर्वर्तुळ सिद्धांत' या नावाने प्रसिद्ध आहे. आर्य भारतात येताना आपली भाषा आणि संस्कृती दोन्हीही घेऊन आले. आर्य लोकांच्या भाषेचा विचार भाषाभ्यासकांनी केलेला आहे. त्यापैकी होर्न्ले यांनी मांडलेला अंतर्-बहिर्वर्तुळ हा सिद्धांत खालीलप्रमाणे सांगता येईल.

होर्न्ले यांनी १८८० मध्ये आपल्या 'Comparative Grammar of the Gondian Language' या ग्रंथात भाषिक निकषांवर आधारित अंतर्-बहिर्वर्तुळ सिद्धांत मांडलेला आहे. आपल्या सिद्धांतामध्ये ते म्हणतात, आर्य भारतात आले ते दोन टोळ्यांनी. पहिली टोळी गंगेच्या पश्चिम दुवाबात वसाहत करून राहिली. परंतु नंतर आलेल्या आर्यांनी प्रथम आलेल्या टोळीला हुसकावून लावले व ते स्वत: तेथे स्थिर झाले. या पहिल्या टोळीचे अंतर्वर्तुळ. या अंतर्वर्तुळाची बोली शौरसेनी. शौरसेनीपासून पश्चिमेकडील हिंदी ही अर्वाचीन भाषा निर्माण झाली. पहिले आलेले आर्य लोक गंगेच्या दुवाबात पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर असे सभोवती राहिले. म्हणजे नंतर आलेल्या आर्यांच्या सभोवती त्यांचे एक कडे निर्माण झाले. होर्न्ले यांच्या मते हे बहिर्वर्तुळ होय. बहिर्वर्तुळाची बोली म्हणजे मागधी. या बहिर्वर्तुळातील भाषा या आर्यांच्या बोलीपासून म्हणजे मागधी बोलीपासून बिहारी, बंगाली, आसामी, ओरिया अशा भाषा निर्माण झाल्या. पुढील तक्त्याच्या माध्यमातून आपण समजून घेऊ.

भारतात आधी आलेल्या आणि नंतर पांगलेल्या आर्य टोळ्या	बहिर्वर्तुळ	या टोळीच्या भाषेपासून मागधी प्राकृत व उत्तरकालात मराठी, सिंधी, ओरिया, बिहारी, बंगाली, आसामी व लांढी या अर्वाचीन भाषा निर्माण झाल्या.
भारतात नंतर आलेल्या आणि गंगा-यमुना दुबावात स्थीर झालेल्या टोळ्या	अंतरवर्तुळ.	या टोळीच्या भाषेपासून शौरसेनी, प्राकृत आणि अर्वाचीन पश्चिम हिंदी या भाषा उत्क्रांत झाल्या.

होर्न्ले यांच्या मते प्रागैतिहासिक काळात उत्तर हिंदुस्थानात दोन बोली भाषा होत्या. 1.पश्चिमेकडील हिंदी 2. पूर्वेकडील मागधी बोली. परंतु तत्पूर्वीच्या काळात उत्तर हिंदुस्थान मागधी बोलीने व्यापलेला असावा. नंतर शौरसेनीची लाट त्यामध्ये पाचरीसारखी घुसली आणि शौरसेनीची लाट येताच मागधी बोलीला पूर्व आणि

दक्षिणेकडे हटावे लागले. पुढे शौरसेनीपासून निर्माण झालेल्या पश्चिम हिंदी भाषेभोवती मागधीपासून उत्क्रांत झालेल्या भाषांचे वर्तुळ निर्माण झाले. याला ‘पाचर सिद्धांत’ किंवा ‘द्विरागमन सिद्धांत’ असे म्हणतात. होर्न्ले यांच्या पाचर सिद्धांतानुसार मराठी ही बहिर्वर्तुळातील भाषा ठरते. त्यांनी आर्य भारतीय भाषेचे चार गट मानले. याला त्यांनी ‘गौडी भाषा’ म्हटले आहे. विविध दिशांमधील भाषांच्या आधारे त्यांनी भाषांचे वर्गीकरण केले.

१. पूर्व गौडीयन - पूर्व हिंदी, बंगाली, उडिया, आसामी

२. पश्चिमी गौडीयन - पश्चिमी हिंदी, गुजराती, सिंधी, पंजाबी

३. उत्तरी गौडीयन - पहाडी

४. दक्षिण गौडीयन – मराठी

भाषिक साधर्म्यानुसार पूर्व-दक्षिण गौडीचा एक गट. त्याची पूर्वावस्था मागधी. मागधी गटातील भाषा म्हणजे बहिर्वर्तुळातील भाषा. तर पश्चिम-उत्तर गटाची पूर्वावस्था शौरसेनी. या गटातील भाषा म्हणजे अंतर्वर्तुळातील भाषा. अशी होर्न्ले यांची मांडणी आहे.

ग्रिअर्सन यांनी अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळातील भाषिक विभागणी मान्य केली असली तरी होर्न्ले यांचा द्विरागमन सिद्धांत त्यांना मान्य नाही. दोन्ही वर्तुळातील भाषांशी साम्य सांगणारा ‘अंतर्बहिर्वर्तुळ’ असा वेगळाच गट सांगून त्यामध्ये पूर्व हिंदी, पंजाबी, राजस्थानी व गुजराती या भाषांचा अंतर्भाव केला आहे. होर्न्ले आणि ग्रीअर्सन यांनी केलेली मांडणी अंतर्वर्तुळातील शौरसेनी >अपभ्रंश > पश्चिम हिंदी तर बहिर्वर्तुळातील मागधी > मागधी अपभ्रंश > बिहारी, बंगाली, आसामी, पंजाबी ओरिसा, अर्धमागधी > अर्धमागधी अपभ्रंश > पूर्व हिंदी तसेच महाराष्ट्री >, महाराष्ट्री अपभ्रंश > मराठी अशी आहे. या विवेचनानुसार मराठीला महाराष्ट्रीने जन्म दिला असे स्पष्ट होते. तिचे बहिर्वर्तुळातील भाषांशी भाषिकदृष्ट्या अधिक साम्य दिसते. त्यामुळे ती बहिर्वर्तुळातील भाषा ठरते.

रामप्रसाद चंदा यांनी होर्न्ले यांनी सांगितलेल्या सिद्धांताला थोडा तपशील वगळता मान्यता दिलेली दिसते. मराठी भाषा ही आर्यलोक आणि मराठी भाषिक प्रदेशातील मूळचे द्रवीड व निषादकरोल यांच्या संकरापासून तयार झालेल्या लोकांची भाषा असे प्रतिपादन केले आहे. सुनितकुमार चतर्जी यांनी अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांत मान्य केलेला नाही. होर्न्ले आणि ग्रीअर्सन यांनी दिलेली कारणे त्यांना अपूर्ण वाटतात. सुनितकुमार चतर्जी यांनी केलेल्या विवेचनानुसार आर्य हिंदुस्थानात केवळ एक टोळीने न येता अनेक टोळ्यांनी आले. या आर्यांच्या बोली वेगवेगळ्या असल्या तरी त्यांचे भाषाकुल एकच होते. अर्थात आधुनिक आर्यभारतीय भाषांच्या मागे वेदकालीन बोली असल्या पाहिजेत. त्यांनी वेबर यांनी मांडलेली उत्पत्ती मान्य केली आहे. पा. दा. गुणे यांना अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ हा सिद्धांतच मान्य नाही. त्यांच्या मते, मराठीचे काही प्रमाणात अंतर्वर्तुळातील तर काही बहिर्वर्तुळातील भाषांशी साम्य आढळते. त्यामुळे याचे काटेकोरपणे वर्गीकरण करता येत नाही.

३.७ इतर अभ्यासकांचा विचार

स्टेन कौनो यांची मीमांसा –

स्टेन कौनो यांनी होर्न्ले यांच्या विवेचनाची चिकित्सा केली आहे. होर्न्ले यांनी म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्री व शौरसेनी या एकाच प्रकारच्या भाषा असून शौरसेनी गद्यासाठी व महाराष्ट्री पद्यासाठी योजलेली असे मत मांडले. स्टेन कौनो यांनी मराठीच्या जनकभाषेचा विचार करताना रुप आणि ध्वनी या दोन्ही अंगाने विचार करून महाराष्ट्रीचे जनकत्व सप्रमाण सिद्ध केले. मराठी व महाराष्ट्री यांचे नाते स्पष्टपणे मांडले. तसेच त्यांनी महाराष्ट्री ही महाराष्ट्रातील भाषा असल्याचे सांगितले आहे. प्राकृतची वर्गवारी करताना त्यांनी 1. शौरसनी 2. महाराष्ट्री, मागधी व अर्धमागधी अशी केली. महाराष्ट्री व शौरसेनी यांच्यातील साम्यापेक्षा महाराष्ट्री व अर्धमागधी यांच्यातील साम्य अधिक आहे.

३.८ समारोप

मराठीची पूर्वपीठिका पाहताना सर्वसाधारणपणे आर्य भारतीय भाषेच्या ज्या विविध अवस्था आहेत त्या लक्षात घेता येतात. आर्य भारतीय भाषा संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश – अर्वाचीन भाषा असा प्रवास दिसून येतो. मराठी भाषा संस्कृतोत्पन्न भाषा मानली जाते. या भाषेतील काही विशेष अंतर्वर्तुळातील भाषेशी तर काही विशेष बहिर्वर्तुळातील भाषेशी नाते सांगणारे आहेत. तरीही मराठीने स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले आहे. विविध भाषांमधील शब्दांचा साज तिने चढविला आहे. थोडक्यात मराठी भाषेचा प्रवास हा दिवसेंदिवस विविध भाषा सामावून घेत अविरत सुरू आहे.

३.९ संदर्भ ग्रंथ

१. तुळपुळे, शं. गो. : 'यादवकालीन मराठी भाषा', पहिली आवृत्ती, व्हीनस प्रकाशन पुणे.

२. कालेलकर, ना.गो. : 'ध्वनीविचार', दुसरी आवृत्ती, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

३. कुलकर्णी, कृ.पा. : 'मराठी भाषा: उद्गम आणि विकास', मेहता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर

४. ग्रामोपाध्ये, गं. ब. : 'भाषाविचार आणि मराठी भाषा', व्हीनस प्रकाशन, पुणे

५. गोसावी, र. रा : 'मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

३.१० पूरक वाचनासाठी

१. गोरे, दादा : 'आधुनिक भाषाविज्ञान आणि मराठी भाषा', गोदा प्रकाशन

२. जोशी, प्र. न. : 'सुबोध भाषाशास्त्र', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

३. जोगळेकर, ग. ना. : 'मराठी भाषेचा इतिहास'

४. झुल, ब्लोक : 'मराठी भाषेचा विकास'

५. मंचरकर, र. बा. : 'भाषाशास्त्रविचार'

३.११ सरावासाठी प्रश्न

१. संस्कृत-प्राकृत -अपभ्रंश -मराठी अशी साखळी उलगडून दाखवा.

२. मराठी भाषेची पूर्वपीठिका थोडक्यात सांगा.

३. आर्य भारतीय भाषांमधील परिवर्तनाचा थोडक्यात आढावा घ्या.

४. अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांत सांगा.

❖❖❖❖

४अ

मराठी भाषेचे कालिक भेद

घटक रचना :

४अ.० उद्दिष्टे

४अ.१ प्रस्तावना

४अ.२ यादवकालीन मराठी भाषा

४अ.२.१ यादवकालीन भाषाभ्यासाची साधन सामग्री

४अ.३ मराठी भाषेची उत्पत्ती

४अ.३.१ यादवकालीन मराठीचे नमुने

४अ.३.२ यादवकालीन मराठीचे स्वरूप

४अ.४ बहामनी काळातील मराठी भाषा (इ.स. १३५०-१६००)

४अ.४.१ बहामनीकालीन भाषाभ्यासाची साधन सामग्री

४अ.४.२ बहामनीकालीन मराठीचे नमुने

४अ.४.३ बहामनीकालीन वर्णनप्रक्रिया

४अ.५ शिवकालीन मराठी

४अ.५.१ शिवकालीन भाषाभ्यासाची साधन सामग्री

४अ.५.२ शिवकालीन मराठीचे नमुने

४अ.५.३ शिवकालीन भाषा विशेष

४अ.६ पेशवेकालीन मराठी भाषा

४अ.६.१ पेशवेकालीन मराठी भाषेचे नमुने

४अ.६.२ पेशवेकालीन भाषा विशेष

४अ.७ आंग्लकालीन मराठी भाषा (१८५०-१९५०)

४अ.७.१ मराठी वाङ्मय चळवळीला सुरुवात

४अ.७.२ आंग्लकालीन मराठी भाषेचे नमुने

४अ.७.३ आंग्लकालीन मराठी शब्दसंग्रह

४अ.८ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी भाषा (इ.स. १९५० ते २०१०)

४अ.८.१ स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी शब्दसंग्रह

४अ.९ जागतिकीकरणाच्या प्रभावातील भाषा

४अ.१० समारोप

४अ.११ संदर्भ ग्रंथ

४अ.१२ अधिक वाचनासाठी पुस्तके

४अ.१३ सरावासाठी प्रश्न

४अ.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो तुम्हाला अभ्यासक्रमाला असलेली ऐतिहासिक भाषाविज्ञान ही अभ्यासपत्रिका विशेष महत्त्वाची आहे. या पत्रिकेतील शेवटचा घटक म्हणजे कालिकभेद हा होय. ह्या घटकाचे अध्ययन केल्यामुळे खालील उद्दिष्ट्यांची परिपुर्ती होते.

१) कालिकभेद हा घटक अभ्यासल्यामुळे भाषिकभेदांचे स्वरूप, कारणे याची माहिती मिळते.

२) काळ या घटकांचा भाषेवर कसा परिणाम होतो याचे आकलन होते.

३) भाषेचा कालखंडनिहाय अभ्यास केल्यामुळे भाषेचा अभ्यास करणे सोयीचे जाते याची माहिती मिळते.

४) वेगवेगळ्या काळात भाषा कशी बदलत जाते याची जाणीव होते.

५) या घटकांचा अभ्यास केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी भाषेबद्दलची अभिरुची वाढते.

४अ.१ प्रस्तावना

भाषा हे विचार विनिमयाचे प्रभावी माध्यम आहे. भाषा परिवर्तनासाठी स्थळ आणि काळ हे दोन घटक महत्त्वाचे असतात. भाषा ही स्थळ आणि काळानुसार बदलत असते. भाषेत काळानुसार कसे बदल होत गेले याचा अभ्यास करण्यासाठी भाषा अभ्यासाची सोय म्हणून राजकीय कालखंडाचा आधार घेणे अपरिहार्य असते. भाषा परिवर्तनाचा अभ्यास करण्यासाठी योग्य आणि नेमक्या स्थळ, काळाच्या काटेकोर सीमारेषा ठरविणे कठीण असते. भाषेच्या कालिकभेदाचा अभ्यास करताना त्या काळात लिहिले गेलेले ग्रंथ, त्या काळातील ताम्रपट, शिलालेख, पत्रव्यवहार यांचा आधार घेऊन भाषेच्या कालिकभेदाचा अभ्यास करता येतो. काळानुसार भाषेत भेद कसे होत गेले किंवा काळानुसार भाषिक परिवर्तन कसे होत गेले याचा अभ्यास करणे म्हणजे कालिकभेदाचा अभ्यास करणे होय. यादवकाळ, बहामनी काळ, शिवकाळ, पेशवेकाळ, आंग्लकाळ, स्वातंत्र्योत्तर काळ, जागतिकीकरणाच्या प्रभावातील भाषा, माहिती आणि तंत्रज्ञान काळातील भाषा असे वेगवेगळे कालखंड पाडून मराठी भाषेच्या कालिकभेदाचा अभ्यास करता येतो.

४अ.२ यादवकालीन मराठी भाषा

राजकीय सत्तेचा भाषा व्यवहारांवर परिणाम होत असतो. राजकीय सत्ता समग्र मानवी जीवनावर परिणाम करीत असते. राजकीय सत्तेच्या व्यवहाराची भाषा कोणती असते तिच भाषा समाजाला शिकावी लागते. इ.स. १२०० ते १३५० ह्या काळात यादवांची सत्ता होती. या काळातील मराठी भाषा जी होती तिला यादवकालीन भाषा म्हटले जाते. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात हा काळ सुवर्णाक्षरांचा काळ समजला जातो. याच काळात मुकुंदराजाने 'विवेकसिंधु' ग्रंथ लिहिला. तसेच महानुभाव संप्रदायातील 'सातीग्रंथ' तसेच 'महदंबेचे धवळे,' 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ यु.म. पठाण यांनी इ.स. १२०० ते इ.स. १३५० या काळालाच मराठी भाषेचा पहिला कालखंड किंवा आदिकाल मानले आहे. असे असले तरी एक अभ्यासाची सोय म्हणून यादवकालीन भाषेचा अभ्यास करण्यासाठी यादवकालीन भाषेचा अभ्यास हा शब्द वापरणे सोयीचे होते.

४अ.२.१ यादवकालीन भाषाभ्यासाची साधन सामग्री :

या कालखंडातील भाषाभ्यास करण्यासाठी विपुल अशी साधन सामुग्री उपलब्ध आहे. मराठी कोरीव लेख-शिलालेख व ताम्रपट तसेच यादवकालीन साहित्य संपदा इ. चा आधार यादवकालीन भाषाभ्यासासाठी करता येतो. मुकुंदराजाचा 'विवेकसिंधू', 'ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव', 'चांगदेव पासष्टी', ज्ञानेश्वर, नामदेवांचे 'अभंग', 'लीळाचरित्र', 'गोविंदप्रभुचरित्र', 'महदंबेचे धवळे', चोंभाविरचित 'उखाहरण' नरेंद्राचे 'रुक्मिणी स्वयंवर' इ. चा या संदर्भात निर्देश करावयास हवा. एका अर्थाने हे विपुल साहित्य उपलब्ध असल्यानेच या कालखंडातील मराठी भाषेचा अभ्यास करणे सोपे झाले आहे.

४अ.३ मराठी भाषेची उत्पत्ती

मराठीची उत्पत्ती संस्कृत - प्राकृत - अपभ्रंश अशा क्रमाने झाली आहे. महाराष्ट्रात रूढ असलेल्या अपभ्रंशाप्रमाणेच तिच्यामध्ये महाराष्ट्री प्राकृतचे अवशेष दिसतात, असे डॉ.शं.गो. तुळपुळे यांनी आपल्या प्रबंधात मांडले आहे. यादवकालीन मराठी भाषेचे स्वरूप विशद करण्यासाठी यादवकालीन भाषेतील ध्वनीविचार, रूप-विचार, शब्दसिद्धी, शब्दसंग्रह, वाक्यरचना व वाक्प्रचार या घटकांचा अभ्यास करावा लागेल. तरच यादवकालीन भाषा कशी होती हे समजण्यास मदत होते.

४अ.३.१ यादवकालीन मराठीचे नमुने :

१) श्री सर्वेस्वराचे शिरी धरुनियां चरण :
मग धवळी गाईन गोविंदराणा :
जेणे रुक्मिणी हरियेली तेणें पवाडे केले अति बहुत:
पाविजे परमागति भगती आइकतां कृष्णचरित्र : जय श्री प्रभु गोविंद ॥
भीमकाकुळी रुक्मिणी केला अवतरु:

रूपलावण्ये तिया जिंकियेला संवसारुः
या त्रिभुवनामाझारीं रूपे सुंदरु वाखाणे मुरारी ।। (धवळे)

२) ये ग ये ग विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥१॥
भीमा आणि चंद्रभागा । तुझ्या चरणीच्या गंगा ॥२॥
इतुक्यासहित त्वां बा यावे । माझे अंगणी नाचावे ॥३॥
माझा रंग तुझे गुणी । म्हणे नामयाची जनी ॥४॥

४अ.३.२ यादवकालीन मराठीचे स्वरूप :

यादवकालीन भाषेचे स्वरूप-विशेष पुढीलप्रमाणे पाहता येतात. यात वर्णप्रक्रिया, स्वर, व्यंजन, विभक्ती, सर्वनामाची रूपे, शब्दसंग्रह, वाक्प्रचार इ. घटकांचा अभ्यास करता येतो.

अ) स्वरप्रक्रिया :

यादवकालीन भाषेचा अभ्यास करताना यादवपूर्वकालीन भाषेतील स्वर हे यादवकालीन मराठीतही पहावयास मिळतात. दीर्घ 'ऋ' हा संस्कृत भाषेत आहे. यादवकालीन मराठी भाषेत 'ऋ' हा स्वर उच्चारास कठीण असल्याने प्राकृतात व पुढे मराठीच्या यादवकाळात त्याचे सुलभीकरण करण्याचा प्रयत्न झाला आहे. यात प्रामुख्याने ऋ>अ, ऋ>इ, ऋ>उ या तीन प्रक्रिया झाल्याचे दिसते.

उदा.

१) ऋ>अः, तृण>तणकट, मृदू >मऊ, वृषभ>वसो

२) ऋ>इः, तृतीय>तीज, दृष्टि>दिठी, हृदय>हिये

३) ऋ>उः, ऋजु>उजु, प्रावृष>पाऊस, भातु>भाऊ इ.

अशीच काही स्वरप्रक्रियेची उदाहरणे देऊन स्वरप्रक्रिया चांगल्याप्रकारे समजून घेता येईल.

ऱ्हस्व स्वर प्रक्रिया :

ऱ्हस्व स्वर म्हणजे ज्या स्वरांचा उच्चार दीर्घ होत नाही असे स्वर म्हणजे ऱ्हस्व स्वर होय. ज्या स्वरांचा उच्चार आखूड होतो, त्यांचा उच्चार करण्यास कमी वेळ लागतो म्हणून त्यांना ऱ्हस्व स्वर असे म्हणतात. स्वरांचा उच्चार स्वतंत्र होतो. दुसऱ्या कोणत्याही वर्णाचा आधार घेण्याची गरज नसते त्यास ऱ्हस्व स्वर असे म्हणतात. उदा.

कुमर>अ

ऱ्हदया>ऋ

यरव्ही>ए

अशी काही यादवकालीन मराठीचे उदाहरणे देता येतील.

दीर्घ स्वर प्रक्रिया :

ज्या स्वरांचा उच्चार दीर्घ होतो किंवा स्वरांचा उच्चार करण्यास अधिक वेळ लागतो त्या स्वरांना दीर्घ स्वर असे म्हणतात. त्यांचा उच्चार लांबट होतो म्हणून त्यांना दीर्घ स्वर असे म्हणतात. खालील दीर्घ स्वर यादवकालीन मराठीत पहावयास मिळतात. उदा.

माहासुखासी>आ

आईके>ऐ

महाराष्ट्री>ई

आझुई>आ, ई

संयुक्त स्वर :

दोन स्वर एकत्र येऊन बनलेल्या स्वरांना 'संयुक्त स्वर' असे म्हणतात. स्वरांपुढे स्वर आल्याने त्यांचा उच्चार करणे अवघड जाते. या स्थितीला प्रगृह्य किंवा Hiatus (बोलण्यातील खंड) असे म्हणतात. प्रगृह्य टाळण्यासाठी अ + इ = ऐ किंवा अ + उ = औ अशा संयुक्त स्वरांचा उपयोग केला जातो.

अ + इ = ऐ:सं. प्रतिष्ठान > प्रा. पइट्ठाण > म. पैठण

सं.प्रतिज्ञा > प्रा.पइज्जा > म.पैज

अ + उऔ:सं. चतुष्क > प्रा.चउवक > म.चौक

सं.चतुर्थ > प्रा.चउत्थ > म.चौथ. असे संयुक्त स्वर यादवकालीन मराठी भाषेमध्ये पहावयास मिळतात.

व्यंजन प्रक्रिया :

व्यंजनाचा उच्चार करताना स्वरांचा आधार घ्यावा लागतो त्यास व्यंजन असे म्हणतात. यादवकालीन मराठी भाषेत खालीलपैकी व्यंजन होते हे लक्षात येते.

चिलिसी, भिच्छा, मंगळवेट, गच्छति, निगाला, रिगाला,

जूझ, निदसुरे, खवणेया, संतोखेली, वीखे, भणिजे, सांधितली, संवछरे

भणती, जाळीण, सपींनी, वोलखे, उपावो, गुडाकेष, म्हाजन, संसारसायर, भणती, जाळीण,

सेत, सरभंग, मागीसर, षोपिला, लिषित कुलकर्णी, सरावण, वरूषा, लक्षुमी, रकुमिणी, कीर्ति,

धर्म्म, कर्म्म, वर्णियिली, आइक, इ.

ब) नामविभक्ती प्रत्यय :

नामे व सर्वनामे यांचे वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या विकारांनी दाखविले जातात त्या विकारांना विभक्ती असे म्हणतात. यादवकालीन मराठी भाषेमध्ये विभक्तीचे सात प्रकार असलेले पहावयास मिळतात.

१) प्रथमा : गणेशु, अनुग्रहो, देओ, संशयो, दिओ, सूर्यो.

२) द्वितीया : इया, जीर्णोद्धारू, गोसवियाते, अभिप्राये, भावाँ, रायाँ.

३) तृतीया : ईश्वरें, राणेन, हरिदेवें, लेखरूवे, मत्स्त्यरूपे, सर्वज्ञे, सोनारे, पंडिती, इ.

४) चतुर्थी : चौकीचिया, दारवंठेया, पन्हेया, तेयासी, सागरा.

५) पंचमी : मेघाहुनि, मेघौनि, समुद्रौनि, सनकादिकांहूनि.

६) षष्ठी : विठलाची, व्यासाचा, उजलाचे, संयमाचेनि.

७) सप्तमी : देऊळी, सकुटुंबी, पाटणी, चरणी, ग्रामांतु, पायाँ.

१) सर्वनामे : सर्वनाम म्हणजे वाक्यात नामाच्या ऐवजी येणारा शब्द म्हणजे सर्वनाम होय. नामांचा पुनरूच्चार टाळण्यासाठी सर्व प्रकारच्या नामांच्या जागी येणाऱ्या विकारी शब्दाला 'सर्वनाम' असे म्हणतात.

सर्वनामे : तुआ, मी, तूं, कव्हणी, जो, जे, काई, कोणहु.

मा, मिये, तां हया.

तिया, मिया, जेणे, तेया, तिआ.

तेयाते, येया, आपुलेया, ऐसेया, तया, तयाते.

जेयाचा, तेयाचे, तेयांची, केहाचा, जेहाचा, जेहाचे, तेहाचे.

२) आख्यात विभक्ती (क्रियापदाचे प्रत्यय)

संस्कृतात क्रियापदाला 'आख्यात' असे म्हणतात. क्रियापदांना म्हणजेच आख्यातांना प्रत्यय लागून विविध काळ व अर्थ यांची तयार रूपे होतात. त्यांना आख्यात प्रत्यय असे म्हणतात. काळ व अर्थ क्रियापदांना होणारे विकार असल्यामुळे यांनाच आख्यातविकार असे म्हणतात. यादवकालीन मराठी भाषेतील काळप्रक्रिया पुढीलप्रमाणे पहावयास मिळते.

३) १) वर्तमानकाळ :

धांडोळित, करीत, आस, आइके, चाखे, आठवी, बोले, टाठे, घेई, निघे, बांधिती, झांकळीती, करीती.

२) भूतकाळ :

सूतला, सिके, झाले, केला, धारिएला, बोभाविली, सरले, निगाला, सांघीतली, रिगाला, ठेविलिआ, उतरिला.

३) भविष्यकाळ :

नाशैल, सांडिजैल, अभिवैल, असलै, होवैल.

१) आज्ञार्थ : परिसै, सुनु, करीजेसु, न्हवावा, करावे.

२) अव्यये : जे तेथोनि, पुढारी, तथा, जैं, ऱ्हवी, तर्ही, म्हणौनि, आझुई, कडौनु, आचंद्रार्क, वरी, लागौनि, वेर्ही, वांचौनि.

क) विशेष शब्द : यादवकालीन मराठीचा शब्दसंग्रह समृद्ध असून यादवकाळात मराठी भाषा ही लोकजीवनाची भाषा होती त्यामुळे शब्दसंग्रहाच्या दृष्टीने मराठी भाषा समृद्ध आणि संपन्न होती हे शब्दसंग्रहामुळे लक्षात येते.

सोनेसळा, कानवडा, जोहार, मांदुस, जिआले, असिवारु, बोहरी, मांदोडा, कुरौंडी, नव्हळी, सासीन्नली, दिठिवा, पायाचेमोगरू, बोहरी, मांदोडा, असलग, आंतौरी, मांदियाळी, राणीव, बहुवस, गातांबील, बुंथी, आरोगन असे शब्दसंग्रह यादवकालीन मराठीत पहावयास मिळतात.

ड) वाक्प्रयोग : शब्दश: होणाऱ्या अर्थापेक्षा भिन्न व विशिष्ट अर्थाने रूढ होऊन बसलेल्या शब्दसमूहाला 'वाक्प्रचार' असे म्हणतात. असे काही वाक्प्रयोग पुढीलप्रमाणे आहेत.

रथ पेलणे, बाधा पावणे, वरपडा होणे, स्वधर्मे राहाटणे, साहोनि जाणे, आटी काढणे, अंगी वाजणे, आड घालणे, आड जाणे, कान झाडणे, झाडी करणे, नखी लागणे, पाटी बैसणे, मोड धरणे असे वाक्यप्रयोग यादवकालीन मराठीत पहावयास मिळतात.

४अ.४ बहामनी काळातील मराठी भाषा (इ.स. १३५०-१६००)

देविगिरीच्या यादवांचे राज्य सन १३१८ साली समाप्त झाले. सन १३५० साली यादवकालीन वाङ्मयाचे सुवर्ण युग समाप्त झाले आणि महाराष्ट्रभर उत्तरेतून इस्लामी धर्मियांचे परचक्र आले. अहमदनगर, विजापूर, विदर्भ, बिदर, गोवळकोंडा या ठिकाणी इस्लामी राज्ये सुरू झाली. या राजवटीचा एकंदरीत महाराष्ट्राच्या सर्वांगीण जीवनावर परिणाम झाला. या काळातील मराठी भाषा कशी होती याचा अभ्यास करण्यासाठी या काळातील लिहिलेल्या मराठी वाङ्मयाचा आधार घेऊन या काळातील भाषेचा अभ्यास करता येतो.

३.४.१ बहामनीकालीन भाषाभ्यासाची साधन सामग्री :

काही शिलालेख, ताम्रपट, गद्य व पद्य ग्रंथ, ऐतिहासिक पत्रव्यवहार, विजापूर (इ.स. १३३०) खाटेग्राम (इ.स.१३४८) नागाव इ.स. १३६७ मढगाव, वेळुस, बांदोडे येथील काही कोरीव लेख उपलब्ध असलेले पहावयास मिळतात.

'उखाहरण' कर्ता चोंभा, 'वरदनागेश' कर्ता अज्ञानसिद्ध, बहिरापिसा उर्फ बहिराजातवेद, कान्होपाठक-नामापाठक, कान्होपात्रा, दामाजीपंत, भानुदास, श्रीपादवल्लभ व नृसिंह सरस्वती, सरस्वती गंगाधर, जनार्दन स्वामी इत्यादींनी आपापल्या परीने मराठीत ग्रंथकर्तृत्व केले आहे. हिंदू व मुसलमान यांच्या आचारविचारांची व भक्तिपद्धतींची काहीशी सांगड या काळात दत्तसंप्रदायात घातली गेलेली दिसते.

चतुःश्लोकी भागवत, एकनाथी भागवत, रूक्मिणी स्वयंवर, भावार्थरामायण, अभंग व पदे, भारूडे इत्यादी विपुल वाङ्मयसंपदा एकनाथांनी निर्माण केली. शिवकल्याण, रमावल्लभदास, विष्णुदासनामा, जनी जनार्दन, रामाजनार्दन, विठा रेणुकानंद, कृष्ण याज्ञवल्की, रंगनाथ मोगरेकर, महालिंगदास, शांतलिंग, मुक्तेश्वर, 'बालबोध' कर्ते त्र्यंबकराज, शेख महंमद असे अनेक ग्रंथकर्ते या काळात झाले. 'गीतार्णव' कर्ते दासोपंत हे एक याच काळातील असे अनेक ग्रंथकार होत.

४अ.४.२ बहामनीकालीन मराठीचे नमुने :

१. चोंभाकृत उखाहरण :

आला आला नारदमुनी । पाहाती बगाटे उचलौणी ।

अस्थानी तेणें देषीली आंसुवे । अवघेयांचा लोचणी ॥ ते वीनोद देषत असे । केही न माये तेने संतोसे । मादीये माजी उभा ठेला । कांही न बोले ना न बैसे ॥ राजी करीतु आहे इर्द्राहुनु । तो बळीया उग्रेसेनु । मुनी बैसा सीहासनी । साउमा पावो अवधारुनु ॥ आता जाले आमचेया ऐसे । धरीतां धरीतां येताये हांसे । तंव अर्ध सीहासन । सोडिले रूष किसे ॥ तेव्हळी म्हणत असे मुनीरावो । न बैसा मोटा असे संदेहो । बाइलां माजी बैसतां । आंगा येईल अन्यावो ॥

२) गुरुचरित्र सरस्वती गंगाधर :

सिद्ध म्हणे नामधारकासी । अपूर्व झाले परियेसी ॥ गुरुचरित्र विस्तारेंसी । सांगता संतोष होते ॥१॥ गाणगापुरी असतां गुरु । ख्याती झाली अपरंपारू । भक्त होता एक शुदू । तयाची कथा एक पा ॥२॥ श्रीगुरु नित्य संगमासी । जात असता अनुष्ठानासी । मार्गी तो शुद्र परियेसी । आपुले शेती उभा असे ॥३॥ श्रीगुरुते नित्य देखोनी । धांवत येऊनि शेतांतूनि । आपण साष्टांगी नमोनी । पुनरपि जात आपुले स्थाना ॥४॥ माध्यान्हकाळी मठासी येता । पुनरपि चरणी ठेवीन माथा । ऐसे कितीएक दिवस होतां । शुद्राची भक्ति वाढली ॥५॥

३) एकनाथ :

अर्जदास्त अर्जदार बंदगी । बंदेनबाज साहेब आलोकम् सलाम । कायापुरीकर जिवाजीपंत सुभेदार । बुधाजीपंत फडणीस । परगणे शरीरबाद ॥ हकिकत ॥

सरकारची रजा घेऊन निघाले । तो स्वार होऊन किल्ले कायापूर येथे दाखल जाहले ।। दरोबस्त अंमलदार सर्व सरकारकामास वाकब नव्हते ॥

४) सिंहासनबत्तिशी महालिंगदास :

पुनरपि राजा मुहूर्त पाहे । सतरावीये पुतळीये संनीध जाये। तंव तीस वाचा होउनी बोळिली काये। ते परियेसा पा ॥ तु विक्रमासारीखा धीर्य उदार्य होसि। तरीच ये सीहासनी बैसे । भोजु म्हणे ते कैसे। सांगे मज ॥ रावो विक्रम उदार्य अति । त्रीलोकीं वाढली ज्याची किर्ती । बहुळोक्ती ज्या भळा म्हणति । तोचि धन्यु ॥

४अ.४.३ बहामनीकालीन भाषा विशेष :

या काळातील भाषेचा विशेष म्हणजे अरबी आणि फारसी भाषेतील अनेक शब्द मराठी भाषेत पहावयास मिळतात. यादवकाळात 'ल' कार प्रामुख्याने होता. 'ळ' नव्हता असे नाही, पण बहामनी काळात 'ळ' कार सर्वत्र दिसू लागला. 'स' च्या ऐवजी 'श' अथवा 'ष', 'ख' च्या ऐवजी 'ध' व 'थ' असेही फरक या काळात झालेले दिसून येते.

१) बहामनीकालीन वर्णप्रक्रिया :

बहामनीकालीन वर्णप्रक्रिया खालीलप्रमाणे दिसून येते. यादवकालीन मराठीतील वर्णात बहामनीकालीन मराठीत पुढीलप्रमाणे बदल झाल्याचे दिसते.

कृ. पा. कुलकर्णी यांनी या संदर्भात यादवकालीन भाषा आणि बहामनी भाषा याची जी तुलना केली ती लक्षात घेतल्यास भाषेचे स्वरूप समजण्यास मदत होते.

यादवकाळ		**बहामनीकाळ**
रुतु	-	ऋणिया
रिणीया	-	ऋणिया
गाजति	-	गर्जती
ठावो	-	थावो
साचचि	-	सत्यचि
उपेग	-	उपयोग
रोसें	-	रोषे
नोहे	-	नव्हें
बेहों	-	भिवो
उभगला	-	उबगला
काई	-	काय
वोझे	-	ओझे
निसाण	-	निशान
सकल	-	सकळ
पुडुती	-	पुढती

इत्यादी शब्दांची नवी रूपे या काळातील लक्षात येण्यासारखी आहेत.

३) प्रत्यय प्रक्रिया :

बहामनी काळातील मराठी भाषेची प्रत्यय प्रक्रिया विचार पुढीलप्रमाणे असलेली पाहता येते. कंसातील शब्द त्या शब्दांच्या यादवकालीन रूपातले आहेत.

४)

बहामनी काळ		**यादवकाळ**
तयातें	-	(तेयांते)
डोळ्या	-	(डोलेयां)
मान	-	(मानु)
द्यावा	-	(देयावा)
देव	-	(देवो)
तुजसी	-	(तुसी)
म्हणोनि	-	(म्हणौनि)
जाहला	-	(जाला)
आतल	-	(आतैल)
बोलाचे	-	(बोलाचिया)
वर्षे	-	(वरिखे)
तळवटी	-	(तलहाटी)
हृदयावरी	-	(हृदयवेर्ही)
विकास	-	(विकोशु)
सगळा	-	(सकल)
पावया	-	(पविया)
अद्यापि	-	(आझुइं)
विषयी	-	(विषि)
जलिया	-	(जालेया)

इत्यादी शब्दांची बहामनीकालीन रूपे नव्या वळणाची वाटतात. फार्सीबरोबर संस्कृतनिष्ठता थोडी वाढलेली दिसते.

- **नामविभक्ती :**

१. **प्रथमा :** अधिवासु, सोल्हासु, विश्वासु, उत्सावो, मावो, निर्वाहो इ., नामांची रूपे लक्षणीय आहेत.

२. **द्वितीया :** निजभृत्या, कोण्हा, उदरा, रावळा, सेवेसी, आम्हांसी, माते, निरुपणाते, आम्हांलागुनि, यालागी;

३. **तृतीया :** विश्वासे, येणे, देवे, नारदे, नमनेशी.

४. **चतुर्थी :** वधार्थ, शापार्थ, गमनार्थ, नामासाठी

५. **पंचमी :** धर्माहूनि, द्वारकेहुनी, देवापरिस, तुजपासी

६. **षष्ठी :** लहरीचिया, सेवेचिया, संताचे, त्याचेनि, तुझेनि

७. **सप्तमी :** रणी, दशमी, कानी, माझारी, माजी.

आख्यात रूप :

बहामनी काळातील मराठीमध्ये पुढीलप्रमाणे आख्यात रूप पहावयास मिळतात.

करता, पहातो, करिती, उत्पादी, पाळी, करी, उपजे, प्रकटे इत्यादी.

वर्तमानकाळाची रूपे :

ठकला, ठेला, वाढिन्निला, लाजल्या, सांगे, म्हणे, अर्पी, करी, मारी इत्यादी.

भूतकालीन रूपे: बहामनीकालीन शब्दांचे भूतकालीन रूपे पुढीलप्रमाणे

करीन, म्हणाल, देखाल, पडेल, नासेल इत्यादी.

भविष्यकाळाची रूपे :

असोतु, पाहो, करी, अवधारी, लाहो, इत्यादी.

आज्ञार्थी रूपे :

याजिले, बोलिजे, वर्तविजे, म्हणिजे, वंदिजे इत्यादी. या काळात फार्सी - अरबी शब्दांचा जो प्रभाव मराठीवर उमटला त्याचे वर्णन मागे आले आहेच.

शब्दसंग्रह :

बहामनीकालीन मराठीमध्ये खालील शब्दसंग्रह पहावयास मिळतात.

नारदमुनी, बगाटे, आंसुवे, लोचणी, वीनोद, संतोसे बळीया, आइकोनि, कपटे, तयासि, उभारुनु, बरवेया, असारू, भातेय, आषीष, परिग्रहो, कवणाचा, वेणू, गाईव्याघ्र, रविमंडळ, तृणचारा, रूणझुण, विमानीं, बाच्छाव, माहार, रसद, तगादा, कोठाडी, बापुडी, बांदोडी, अंबरा, जगत्पूर्णा, सीहासनी, पुनरपि, गाणगापुरी, अनुष्ठानासी, ममताई, वाकब, उखडे, परगणा, इ. मुसलमान राजवट असल्यामुळे सरकार दरबारी फार्सीत कागदपत्रे लिहिली गेली. त्यामुळे फिऱ्यादी, फैसला, इन्साफ, कागद, अधिकारी जमादार, हवालदार, शिलेदार, राईक, पाईक, राऊत बारी, दरबारी अर्ज असे शब्द व्यवहारात या काळात रूढ झालेली दिसून येतात.

४अ.५ शिवकालीन मराठी (१६००-१७००)

हा काळ म्हणजे शिवरायांच्या निमित्ताने एक नवे तेज प्रकाशमान झालेला होता. शिवरायांच्या नेतृत्वाने जुलमी इस्लामी आक्रमणाविरूद्ध प्रतिकारशक्ती याच काळात

जागी झाली. या स्वराज्य स्थापनेच्या सुरूवातीच्या काळात समर्थ रामदास, संत तुकाराम हे दोन फार मोठे सत्पुरूष उदयास आले. भावभक्तीचा एक उत्कट संस्कार संत तुकारामाच्या अभंगवाणीने जनमानसात निर्माण केला. समर्थ रामदासांनी प्रयत्नवाद, संसार व परमार्थ यांचा त्रिवेणी संगम या काळात घालून दिला. याच काळात वामनपंडित, रघुनाथ पंडित यांनी स्वराज्य काळात अनुकूल अशा पंडिती वळणाच्या काव्यलेखनास सुरूवात केली होती.

४अ.५.१ शिवकालीन भाषाभ्यासाची साधन सामग्री :

शिवकालीन भाषाभ्यासाची साधनसामग्री म्हणून त्या काळात लिहिलेल्या साहित्याचा आधार घेता येईल. मुक्तेश्वर, शेख महंमद, फादर स्टीफन्स, रंगनाथ स्वामी, आनंदमूर्ती, केशवस्वामी, नागेश, विठ्ठल, वेणाबाई, अक्काबाई, बहिणाबाई, निळोबा, पिंपळनेर इत्यादी साधुकवी व कवयित्री याच काळात होऊन गेल्याने वाङ्मयरचनेचे प्रकार वाढले. फार्सी, अरबी, शब्दांची वाढ याच काळात झाली. राजकारण वाढले तसे मराठी पत्रलेखन नव्याने वाढू लागले. पत्रलेखन आणि या काळात लिहिलेल्या साहित्याचा आधार घेऊन शिवकालीन भाषेचा अभ्यास करता येतो.

४अ.५.२ शिवकालीन मराठीचे नमुने

१) समर्थ रामदासांचे दासबोध :

ओ नमो जि गणनायका । सर्वसिद्धी फळदायेका । अज्ञानभ्रंतिछेदका । बोधरूपा ॥१॥

माझिये अंतरी भरावे । सर्वकाळ वास्तव्य करावे । मज वाक् संन्यास वदवावे । कृपाकटाक्षेकरूनी ॥२॥

तुझिये कृपेचिनि बळे । वितुळती भ्रंतीची पडळे । आणि विश्वभक्षक काळे । दाश्यत्व कीजे॥३॥

येता कृपेची निज उडी । विघ्ने कांपती बापुडी । होऊन जाती देशधडी । नाममात्रे॥४॥

म्हणोन नामें विघ्नहर । आम्हा अनाथांचे माहेर । आदि करुनी हरीहर । अमर वंदिती॥५॥

२) वामनपंडिताचे यथार्थदीपिका :

व्यापक नसे शरारीं । तों भोग घडे कोणेपरी । अत एव सूक्ष्मतर । भिउनी भेदवादी म्हणती व्यापक ॥ की चंदनाचा बिंदु सुक्ष्मतरा परी । शैत्ये व्यापी शरीर । ऐसे बोलती परंतु चरणी पडता नीर । नव्हे ओला टिळा ललाटी, हे नकळे ॥ चरण भिजती जळी । परी टिळा ओला नव्हे चंदनाचा कपाळी । पाय पोळता अग्निज्वाळी । चंदन ललाटी नव्हे उष्ण ॥ तैसा छेदिता हात । जीव दुःखी नव्हे हृदयात । तरी हा साजेल दृष्टांत । व्यापकत्वी ॥

३) रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्र :

संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग, दुर्ग नसतां मोकळा देश परचक्र येताच निराश्रय, प्रजा भग्न होऊन देश उद्ध्वस्त होतो. देश उद्वस झाल्यावरी राज्य असे कोणास म्हणावे? याकरितां पूर्वी जे जे राजे झाले त्यांणी आधी देशांमध्ये दुर्ग बांधून तो तो देश शाश्वत करून घेतला, आणि आलेले परचक्रसंकट दुर्गा श्रयी परिहार केले. हे राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनी गडावरूनच निर्माण केले. जो जो देश स्वशासनवश न होय त्या त्या देशी स्थलविशेष पाहून गड बांधिले. तसेच जलदुर्ग बांधिले; त्यावरून आक्रम करीत सालेरी अहिवंतापासून कावेरीपर्यंत निष्कंटक राज्य संपादिले.

४अ.५.३ शिवकालीन भाषा विशेष :

शिवकालीन स्वरप्रक्रिया खालीलप्रमाणे पहावयास मिळते.

स्वरप्रक्रिया :

अमच्या, अम्हांस, अश्रिवाद, विस्णदास, लाखोटा, पायमाली, प्रामाथीनाम, हरिवख्त, गाईत्रीची, विषइ, लुखोबा, देऊ, मशारनुले, उलखित, क्रुस्णा, जाग्रुती, पित्रु, धर्मादाऊ, पेडगाऊ, नाचणगाऊ, सत्येस्वर, धर्मपरायेण, छेत्रपती, वेवसाय, दुकोळ, नोबल, विस्लो, भोगोटा, वडिगो, उपद्रौ इ.

व्यंजनप्रक्रिया :

शिवकालीन व्यंजनप्रक्रियेची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

दुकोळ, खंदिल, लायख, झरोखा, ज्याजती, जेष्ठ, जोखालत, जजू, देव्हडी,

थापना, थीरावीळ्या, विहमाने, धाशत, पनाळ, कार्बारी, खूब, सिताबी, येस्यास,

वळखिले, नामघोश, पलंगपोष, सिवाजी, स्याहाणे, सुद, गोस्ट, अभिसेक इत्यादी.

विभक्ती :

शिवकालीन विभक्ती प्रत्यय कसे होते हे पुढीलप्रमाणे पहाता येतील.

१. **प्रथमा :** नेमु, झुंजारराऊ, संबंधु, जीऊ, राती, हकीकती, मुदती.

२. **द्वितीया :** महालासी, आपणियासी, रयतीस.

३. **तृतीया :** भटे, महाराजे, जगदळे, आत्मसुखे, हेजिबी.

४. **चतुर्थी :** द्वितीयेप्रमाणे.

५. **पंचमी :** घरीहून.

६. **षष्ठी :** गावीचा, साहेबांची.

७. **सप्तमी :** लोकी, उत्तरे, पश्चिमे, कथे.

शिवकालीन सर्वनामे :

तू, मी, जे, ते, मिया, तुवा, यैसी, तुज,

त्यांणी, तेही, येही, कोण्हो, तिही.

आख्यात रूपे :

वर्तमानकाळ :

गातो, नाचोतो, दोषवितो, असिजे, नेतो, होसी, बुझाविसी, आलेसी, चालिलेस, करिताती, आहेती, देताती, खाताती.

भूतकाळ :

जाले, मारिला, दिधले, आनिले, बैसले, खादली, म्हटिले, बोलिले, ठेविले, पुसिले

भविष्यकाळ :

येईना, पवाडेल, चालशील इत्यादी.

शब्दयोगी अव्यये :

त्यावरी, तुजपरी, माणसाकरवी, मेलियावरी, याउपरे, देखत, खालते, तेथुनु, बरहुकुम, नजदीक, कारणे, मागती.

उभयान्वयी अव्यये :

आणि, आण, यैसे, जे, म्हणौनु, व, तर्ही, जैसे, तैसे.

उद्गारवाचक अव्यये :

बेलाशक, खूप, वाहवा, छे, छी, बस, हां, अलबत इत्यादी.

शिवकालीन शब्दसंग्रह :

समर्थ रामदास, संत तुकाराम, वामन पंडित, मुक्तेश्वर सारखे कवी या काळात होऊन गेले. त्यांच्या काव्यातून शिवकालीन शब्दसंग्रह कसे होते हे लक्षात येते. विशेष करून या काळातील मराठी भाषेवर अरबी, फार्सी, तुर्की भाषांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. गणनायका, वदवावे, सर्वसिद्धी, बापुडी, हरीहर, वंदिती, सर्वज्ञा, ओघु, यथाशक्ती कथिजे, ऋषिचरणां निरोपिली कल्पतरू परिमळामाजी टिळा शाश्वत छेदिता परिहार इ.

अरबी शब्द : अख्त्यार, अमीन, इस्ताद, इशारत, खासा, हशम, हिंमत, सलाबत, मुशाहिरा, मजालस, तगादा, जाब, कस्त इत्यादी.

फार्सी शब्द : उस्तवारी, उमेद, खोगीर, आमदरपोती, अस्करा, हुन्नर, सर्फराजी, बेलगाम, जेर इत्यादी.

शिवकालीन वाक्प्रयोग :

शिवकालीन वाक्प्रयोग पुढीलप्रमाणे पहावयास मिळतात परागंदा होणे, दाखल होणे, गूम होणे, शिरजोरी होणे, दूधभात व बेलभांडार यांची क्रिया करणे, कौल लावणे, गनीमास घेरा करणे इत्यादी.

४अ.६ पेशवेकालीन मराठी भाषा

शिवकालीन कालखंडानंतर पेशवेकालीन राजसत्तेचा उदय झाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर छत्रपती संभाजीराजेंचा वध, शाहूची कैद, राजारामाची कारकीर्द, शाहूची सुटका अशा काळात कधी सत्ता स्थिर कधी अस्थिर झाली. पुढे पेशव्यांच्या हाती सत्ता आली. पेशव्यांनी जसे साम्राज्य वाढविली तसेच पेशव्यांच्या पराभवाला तेच कारणीभूत ठरले. मराठी कविता या काळात संतपरंपरेतून पंतपरंपरेकडे झुकली. त्यामुळे पांडित्य आणि शृंगार यात मराठी कविता अधिक गुंतलेली दिसून येते. या काळातील रूक्मिणीहरणकर्ता सामराज व निरंजन माधव हे दोन महत्त्वाचे कवी होते. 'शिवदिनकेसरी', 'हरिवरदा' कर्ते कृष्णदयार्णव, मध्वमुनीश्वर, अमृतराय, मोरोपंत, श्रीधर, महिपतीबुवा इत्यादी कवी याच काळात होऊन गेले. याच काळात मराठ्यांच्या व पेशव्यांच्या पराक्रमीच्या बखरी निर्माण होऊन मराठी भाषेतील गद्याची परंपरा वाढीस लागली. पेशवाईच्या उतरत्या काळात रामजोशी, प्रभाकर, होनाजी बाळा, सगनभाऊ, अनंतफंदी इत्यादी शाहिरांना मराठी भाषेस लावणी आणि पोवाडा हे दोन काव्यप्रकार लिहून मराठी भाषेची प्रतिष्ठा वाढवली. या इंग्रजांचा आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव मराठी भाषेवर वाढला. या काळात अनेक ऐतिहासिक पत्रे लिहिली गेली. त्यातून मराठी भाषेचे वेगळेपण जाणवू लागले.

४अ.६.१ पेशवेकालीन मराठी भाषेचे नमुने :

१. श्रीधर नाझरेकर लिखित श्रीरामविजय :

अबलां न कळे संस्कृत वाणी । जैसे आडातील निर्मळ पाणी ।

परि दोर पात्रावाचोनि । अशक्त जनां केवि निघे ।।

ते तडागासी येतां त्वरे । तत्काळचि तृषा हरे ।

अबलाजन तारावया ईश्वरे । प्राकृत ग्रंथ निर्मिले ।

सर्वास मान्य गीर्वाण । जरी असेल पूर्वपुण्य ।

तरीच तेथींचे होय ज्ञान । अबला जन केवि तरती ।।

२) भाऊसाहेबाची बखर :

'भाऊसाहेब मृत्यू पावले हे कोणी ऐकिले नाही पाहिले नाही. भगवंत इच्छेकरून त्या शहरातून पार पडून वाचून हर एक कोठे असले तरि निर्माण होतील.'

३) रामजोशी :

हटातटाने पटा रंगवुनी जटा धरिशी का शिरी । मठाची उठाठेव का तरी । वनांत अथवा जनांत हो कां मनाते व्हावे परी । हरीचे नाव भवांबुधि तरी ॥ काय गळ्यात घालिती तुळशीची लाकडे । ही काय भवाला दूर करितिल माकडे । बाहेर मिरविशी अंत हरिशी वाकडे । अशा भक्तिच्या रसासहित तू कसा म्हणविशी बुधा । हरिरस सांडुनि घेसी दुधा ॥

४) मोरोपंतांचे आर्याभारत :

कृष्ण म्हणे, राधेया, भला बरा स्मरसि आज धर्मातें

नीच व्यसनीं बुडता निंदिती देवासि न स्वकर्मातें ॥

जेव्हा सभेसि नेली पांचाली मानिले न मनीं शर्म

तेव्हा गेला होता कोठे राधासुता तुझा धर्म ॥

४अ.६.२ पेशवेकालीन भाषा विशेष :

स्वरप्रक्रिया : पेशवेकालीन स्वरप्रक्रिया पुढीलप्रमाणे असलेली पहावयास मिळते.

महाभारत, कर्तव्य, येश, येथाज्ञान, क्रपा, ठराविला, मृत्य, हेत, माजोरी, पारायेण, बैसला, ठैराव, दिसोन, भरोसा, उदासन, माजोरी, विरुध्य, येथास्थित, सप्तरिसी, द्रुस्टि, इत्यादी.

पेशवेकालीन व्यंजनप्रक्रिया :

पुरस्कार, राजकारण, (ज) पुण्याचवळ (ज), फंडच्या (शा) विच्यार, ज्यार, प्रयोज्यन, भोज्यनास, वसोछर्ग, संवछर, औरंगाबाज, लडाई, धाण्या, बातनी(मा), डाळिंभ, भांधून, औशध, सिव्या, काहाडणे, ठहरतील, विज्यापूर, शेनापती, शीमा, वोक, गल, नगी, त्याजकरू इत्यादी.

नामविभक्तीचे काही नमुने :

गोष्टी, स्वामी, यादी, हेत इत्यादी.

४. **प्रथमा :** पुणियास, नबाबासी, डेरियासी, साहेबा.

५. **द्वितीया :** जातिनिशी, प्रकारे, घाटे, चोरटियांनी, श्रीमंतांही.

६. **तृतीया :** तलेगावीहून.

७. **पंचमी :** कोण्हाचा, कोणाच्याने

८. **षष्ठी :** रायपुरी, सातारा, रात्रौ, पुणेयांत, कारखानेयांत,

९. **सप्तमी :** खुळ, मातबर, सरदार मातबर इत्यादी.

१०. विशेषण : पेशवेकालीन मराठी भाषेत फार्सीच्या धर्तीवर विशेषणाच्या पुढे विशेषण आढळते.

उदाहरणार्थ, परिच्छिन्न, अवलिंबे, वरचेवरी, मागती, मधल्यामधी, देखत, जन्मदारभ्य, होयेस्तवर इत्यादी.

११. सामान्यरूपे : पुणेयास, कारखानेयात, उपाध्येचा, बोलणेंयाचा इत्यादी.

१२. पेशवेकालीन शब्दसंग्रह : पाय उतारा, पायगोवा, पान्हव, पोटतिडिक, बिराडराखे, भाईचार, थानपिते, भुकेबंग, वारा पाणी, लागभाग, इत्यादी शब्द ही मधून मधून पेशवेकालीन मराठीत भेटतात.

पेशवेकालीन वाक्प्रयोग :

पेशवेकालीन मराठी भाषेमध्ये खालील वाक्यप्रयोग पहावयास मिळतात.

खुळ उभे करणे, दुवा घेत असावे, हिसका पडला, गुंता उरकला, ध्यानात भरत नाही, होषा खादणे, कान पाडिणे, मऱ्यादा न राहाणे असे काही वाक्प्रचार या काळातील भाषेत पहावयास मिळतात.

४अ.७ आंग्लकालीन मराठी भाषा (१८५० - १९५०)

इ.स. १८१८ ला पेशवाई संपली. इंग्रजाची राजवट सुरु झाली. त्यामुळे समाजात सर्व क्षेत्रात परिवर्तन घडून आले. सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात आमुलाग्र बदल झाला. इंग्रजी संस्कृती आणि भाषेचा शिरकाव सर्वत्र वाढला. इ.स.१८५७ साली मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. याचा परिणाम मराठी भाषेवर झाला. इतर भाषेचा प्रभाव कमी होऊन इंग्रजी भाषेचा प्रभाव वाढला. इंग्रजाच्या राजवटीमुळे छापखान्याची सुविधा उपलब्ध झाली. इंग्रजाच्या शैक्षणिक धोरणातून इ.स.१८२२ मध्ये बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी तर्फे क्रमिक पुस्तके तयार करण्यात आली. बंगालकडील सेरामपूर येथील विल्यम करे यांच्या देखरेखीखाली मराठी - इंग्रजी कोश तयार झाला. यातूनच मराठी वाङ्मय चळवळीला सुरुवात झाली.

४अ.७.१ मराठी वाङ्मय चळवळीला सुरुवात :

इंग्रजांची राजवट स्थिर झाली. पुस्तके छपाईची सुविधा उपलब्ध झाल्याने पुस्तके, साप्ताहिके, मासिके, वृत्तपत्रे सुरु झाली. सिंहासन बत्तीशी, रघुजी भोसल्यांची वंशावळ, गीता भावचंद्रिका इत्यादी पुस्तके छापली गेली. इ.स.१९७४ साली विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेने भाषा आणि वाङ्मयाच्या क्षेत्रात एक नवयुग सुरु केले. निबंध, चरित्र, कादंबरी, कथा नाटक इ. वाङ्मय प्रकार लिहू लागले. बाळशास्त्री जांभेकरांनी पहिले 'दर्पण' वृत्तपत्र याच काळात सुरु केले. बापू छत्रे, परशुराम गोडबोले, दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री, लोकहितवादी, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, गो.ग. आगरकर, शि.म.परांजपे, इत्यादींनी आपल्या वैचारिक निबंध, वाङ्मयाने समाज

परिवर्तनात महत्त्वाचे योगदान होते. याचाच परिणाम साहित्य क्षेत्रावर झाला. यातूनच मराठी भाषा आणि वाङ्मय समृद्ध झालेले पहावयास मिळते.

४अ.७.२ आंग्लकालीन मराठी भाषेचे नमुने :

१) 'वेळेचा व्यर्थ खर्च'-लोकहितवादी :

"जेथे हिंदू लोकांचे राज्य आहे, तेथे सर्वत्र न्यायाचा अंध:कार असतो. एवढेच नाही, परंतु विद्येचा व विचारांचाही असतो. बाहेर होते काय व जाते काय याचा काही एक विचार नसतो. ज्यांचे त्यांचे ज्ञान आपले पुरतेच, आपले घरापुरते असते. त्यास दूसरे काही एक ठाऊक नसते. कोणी म्हणतील की, थोर लोकांच्या पदरी भिक्षुक, भट, शास्त्री, पंडित असतात. परंतु ते लोक निरुपयोगी असतात. शास्त्री जे आहेत त्यास मागील हजारों वर्षाचे ग्रंथ उलटतांनाच पुरे होते; कारण संस्कृत भाषेचे कुलपांत ते असतात".

२) महात्मा फुले यांचा शिवाजीचा पवाडा :

’कुळवाडी-भूषण पवाडा गातो भोसल्याच्या ।

छत्रपती शिवाजीचा ।।

लंगोट्यास देई जानवी पोषींदा कूणब्यांचा ।

काळ तो असे यवनांचा ||”

३) सावित्रीबाई फुलेकृत जोतिबाचा बोध :

"स्वामी जोतिबांचा। लागे मी चरणी

त्यांची गोड वाणी। मनीं घुमे

महार मागांची। करते मी सेवा

आवडीच्या देवा स्मरुनिया

सेवा सत्यधर्म। देई समाधान

ठेवी शांत मन। आपल रे."

४अ.७.३ आंग्लकालीन मराठी शब्दसंग्रह :

परसा, पावती, बोध, आरसा, प्याजी, दुनावले, लडी, मोती, ताणिले, भवया, हासूं, विषाद, मृग, मोघीले, जडवांची, कडी, भाळवटी, चांभारगोंदी, लेविवले, छपविले, पैका, बिरडी, दोंदीले, दंगेखोर, खमठोकी, साटिवले, ताडपत्रा, शीपाया, शालजोडी, तस्मात, कुळंबी, गंगातरि, टोपकर, भिक्षुकी, व्यय, यजमान, इत्यादी.

४अ.८ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी भाषा (इ.स. १९५० ते २०१०)

भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु इंग्रजी राजवटीचा प्रभाव कमी झाला नव्हता आणि ते शक्यही नव्हते. प्रदीर्घ पावणेदोनशे वर्षाचा मराठी समाजावर झालेला प्रभाव एकदम जाणे शक्यही नव्हते. इंग्रजी, संस्कृती भाषेचा प्रभाव जनमानसावर कायम होता. तो साहित्यावर होणेही साहजिक होते. ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजूरांची मुले शिक्षण घेतल्यामुळे साहित्य लिहू लागले. त्यामुळे त्यांची भाषा ही साहित्याची भाषा बनली. याच काळात व्यंकटेश माडगूळकर, श्री. ना. पेंडसे, भावे, गोखले, गाडगीळ, अण्णा भाऊ साठे, उद्धव शेळके, रणजित देसाई, ना.रा. शेंडे, शंकर पाटील, जयवंत दळवी, चि. त्र्यं. खानोलकर, मधु मंगेश कर्णिक, आनंद यादव, चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे, शंकरराव खरात, नारायण सुर्वे, दया पवार, आनंद पाटील, बाबाराव मुसळे, अशोक व्हटकर, राजन गवस, रंगनाथ पठारे, अरुण साधू, सदानंद देशमुख, नागनाथ कोतापल्ले, नागनाथ पाटील असे असंख्य साहित्यिक या काळात साहित्य लेखन करीत होते.

४अ.८.१ स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी शब्दसंग्रह :

१) बी. रघुनाथ 'आडगावचे चौधरी' :

झडपी, करडा, लघळ, सिपरा, बिल्वदळ, चहाटळ, कडोसरी, किटाळ, इरकली, आडवाड, आकडू इत्यादी.

२) रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' :

अज्जाती, अवचिंद, आयतळ, इस्कोटा, उखटतोंड्या, कडुसं, कवर, डांबीसपणा, पीरपीर, बक्कळ, बाजिंदी, बोचकं, बक्कळ इत्यादी.

३) ना. धों. महानोराची 'गांधारी' :

कमीजा, कुरवंडी, तुले, तकावी, खोंग, धटिंगण, पयुभाऊ, बाक्कोळ, बारबिजे, बीट, सप्पर, बजांटी, बिघा, बोन, इत्यादी.

४) 'कोंडणातलं जिणं' नागनाथ पाटील :

उकटील्यावनी, उबळ, कडबोळ, खदाट, रांडरु, मईद, सटका, टेंबरी, खोडा, उबळ, खदाट, कोंडा, सरका, हिदहिद, खिळा, कडबोळ, बुंग, बोंदा इत्यादी.

५) संभूती बाबू बिरादार :

अडबंग, आळंक्या, कुंची, कुड्या, इचिदंर, अडबंग, अंजूमन, किरडू, इसताऱ्या, खडान, खणवट इत्यादी.

४अ.९ जागतिकीकरणाच्या प्रभावातील भाषा

भाषा ही फक्त व्यक्ती-व्यक्तींमध्ये संवाद साधणारी गोष्ट नाही तार ती संस्कृतीचे वाहक म्हणूनही कार्य करत असते. त्यामुळे तत्कालीन समाज आणि संस्कृतीवर जे प्रभाव जाणवतात तेच प्रभाव आपल्याला भाषेवर देखील दिसून येतात. सध्याचा काळ हा जागतिकीकरणाचा काळ आहे. ज्याला 'माहिती आणि तंत्रज्ञान' युग असेही म्हटले जाते. यामुळे 'जग एक खेडे' ही संकल्पना विकसित झाली. ज्यातून संपर्काची घनता वाढली. ज्याचा एक परिणाम भाषेवर देखील झाला. जगभरातल्या भाषा, संस्कृतीतील विविधता, राजकारण, धर्म, दळण-वळण, कला, साहित्य, शिक्षण, तत्त्वज्ञान अशा कितीतरी गोष्टींचा प्रभाव भाषेवर जाणवू लागला. महाराष्ट्राचा विचार केला तर अनेक परकीय, बहुराष्ट्रीय कंपन्या व उद्योगधंद्यांची वाढ या काळात महाराष्ट्रात झाली. त्यामुळे आपसूकच मराठी भाषेचे महत्त्व या काळात वाढले. मराठी भाषेचे अस्तित्व महाराष्ट्राबाहेर गोवा, मध्यप्रदेश, कर्नाटक, गुजरात, तामिळनाडू, उत्तरप्रदेश अशा अनेक राज्यातही आहे. एका अभ्यासानुसार दहा कोटी लोकांची भाषा ही मराठी भाषा आहे.

दळण-वळण, व्यापारीकरण व औद्योगीकरण प्रक्रियेत मराठी भाषा सतत इतर भाषांच्या संपर्कात येत राहिली. या कारणामुळे मराठी भाषेत अनेक भाषांचे संक्रमण होत राहिले. तसेच विविध समाज आणि संस्कृतीशी संपर्क वाढल्याने नव्याने ओळख झालेल्या खाद्य पदार्थ, राहणीमान, पेहराव, वर्तनरीत याचा जसाच्या तसा स्वीकार होत राहिला. यामुळे या नव्या गोष्टींसाठी नवे भाषिक पर्याय न शोधता त्यांचा तसाच स्वीकार मराठी भाषेतही होत राहिला. तसेच प्रतिष्ठा म्हणूनही काही मराठी शब्दांना टाळून इंग्रजी व इतर भाषेतील शब्द दैनंदिन जीवनात स्वीकारले गेले. उदा. 'स्वयंपाक घर' या शब्दाऐवजी 'किचन रूम' शब्द आला. 'चिमणी', 'कंदील', 'दिवा' या शब्दांना 'लाईट' हा एकच शब्द उपयोजनात आला. हॉल, बेडरूम, मिक्सर, कुलर, शॉवर, थर्मास, गिझर, कुकर, फॅन, टि.व्ही. डायनिंग टेबल अशा कितीतरी शब्दांनी घरामध्ये जागा मिळवली. आईस्क्रीम, बिअर, व्हिस्की, मोबाईल, मोटार सायकल, टेबल, सेलफोन, सेल, गेट टुगेदर अशा कितीतरी शब्दांची भर आपल्या दैनंदिन जीवनात पडलेली दिसते. एकूणच जागतिकीकरणामुळे हा मराठी भाषेवरील प्रभाव आपल्याला दिसून येतो.

माहिती आणि तंत्रज्ञान काळातील मराठी भाषा :

२१ वे शतक हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे शतक आहे. संगणक आणि आंतरजाल ही या काळाच्या विकासाची गुरुकिल्ली आहे. ज्ञान, माहिती, व्यापार, उद्योग, शिक्षण, अर्थकारण, मनोरंजन, क्रीडा, प्रसारमाध्यमे, जनसंपर्क, यासारख्या विविध क्षेत्रात संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू आहे म्हणूनच या युगाला 'संगणक युग' म्हणून ओळखले जाते.

माहिती आणि तंत्रज्ञान काळातील शब्दसंग्रह :

वर्ड प्रोसेसिंग, इंटरनेट, वेबसाइट, बुक क्लब, सर्चिंग, ई-मेल, नेटवर्क, केबल ऑनलाइन, कॉम्प्युटर्स, वर्ल्ड वाइड वेब, मल्टिमिडीया इंटरफेस, क्रेडिट कार्ड, इलेक्ट्रॉनिक कॅश,

बुक क्लब, ॲप्लिकेशन, महाजाल, सायबरमॉल, हायपर टेक्स्ट मार्क अप लँग्वेज सर्व्हर, युनिकोड, एडिटर, मार्क अप, प्रोग्राम, कन्व्हर्टर प्रोग्रॅम्स, प्रोव्हायडर, संकेत स्थळ, हायपरटेक्स्ट, लिंक, ॲनिमेशन, सर्च, गणकयंत्र, पिसो, एटीएम, इत्यादी शब्द माहिती आणि तंत्रज्ञान काळातील असलेले पहावयास मिळतात.

आपली प्रगती तपासा :

प्रश्न १) शिवकालीन मराठी भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.

४अ.१० समारोप

भाषा ही परिवर्तनशील असते. परिवर्तनशीलता हे भाषेच्या जिवंतपणाचे लक्षण असते. भाषा परिवर्तनासाठी स्थळ आणि काळ हे घटक कारणीभूत असतात. या प्रकरणात काळ हा घटक भाषा बदलासाठी कसा कारणीभूत असतो हे अभ्यासण्यासाठी राजकीय राजवटीच्या कालखंडाचा आधार घेतलेला आहे. त्यामुळे भाषेचा कालिकभेद अभ्यासण्यासाठी सोयीचे गेले आहे. यादवकाळ, बहामनीकाळ, शिवकाळ, पेशवेकाळ, आंग्लकाल, स्वातंत्र्योत्तर काल, जागतिकीकरणाच्या प्रभावातील मराठी भाषा, माहिती आणि तंत्रज्ञानाचा काळ असे टप्पे पाडून स्थूलपणे भाषिक कालिक भेदाचा अभ्यास केलेला आहे.

४अ.११ संदर्भग्रंथ

१) कुलकर्णी, कृ.पा. : 'मराठी भाषा : उद्गम व विकास', मॉडर्न, पुणे, १९६३ चौथी आवृत्ती.

२) गजेंद्रगडकर, श्री. न. : 'भाषा आणि भाषाशास्त्र', व्हीनस, पुणे, १९९१ तिसरी आवृत्ती.

३) कानडे, मु.श्री. (संपा.) : 'मराठीचा भाषिक अभ्यास', स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, १९९४

४) हिरेमठ, राजशेखर : 'भाषा परिचय', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, प्रथमावृत्ती, ऑगस्ट, २००७.

५) गोविलकर, लीला : 'वर्णनात्मक भाषाविज्ञान', आरती प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती जानेवारी, १९९२

६) कदम, महेंद्र : 'मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे प्रथमावृत्ती, १ जानेवारी, २००३.

७) कालेलकर, ना.गो. : 'भाषा : इतिहास आणि भूगोल', मौज प्रकाशन गृह, मुंबई आवृत्ती, तिसरी १५ डिसेंबर, २०००.

८) इंदापूरकर, चं.द. : 'मराठी भाषा : व्यवस्था आणि अध्यापन', कॉन्टिनेन्टल, पुणे १९८९.

९) मंचरकर, र.बा.: 'भाषाशास्त्र विचार, युनिव्हर्सल, कोल्हापूर, १९७५

१०) काळे, कल्याण (संपा.) सोमण, अंजली : 'वर्णनात्मक भाषाविज्ञान: स्वरूप आणि पद्धती', गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक १९८५.

११) वाळिंबे, मो.रा. : 'सुगम मराठी व्याकरण लेखन', नितिन प्रकाशन, पुणे, सुधारित आवृत्ती २०११.

१२) डॉ. जाधव, मा.म. (संपादक) : 'साहित्यधारा', इसाप प्रकाशन, नांदेड प्रथमावृत्ती नोव्हेंबर २०१४.

१३) जंबाले, डॉ. विठ्ठल : 'ग्रामीण साहित्य व ग्रामीण कादंबरीचे स्वरूप', ओम साई प्रकाशन, देगलूर, प्रथमावृत्ती २१ डिसेंबर, २०१२

४अ.१२ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) गोसावी, र.रा. : 'मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९९.

२) मालशे, स.ग., इनामदार हे. वि.सोमण, अंजली : 'भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक' : पद्मगंधा प्रकाशन पुणे, चतुर्थ आवृत्ती २६ ऑक्टोबर २०१०

३) जोशी, प्र. न. : 'सुबोध भाषाशास्त्र', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीय आवृत्ती : २४ एप्रिल, २००३.

४) गोरे, दादा : 'आधुनिक भाषाविज्ञान आणि मराठी भाषा', गोदा प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती.

५) ग्रामोपाध्ये, गं.ब. : 'भाषा-विचार आणि मराठी भाषा', व्हीनस, पुणे, १९६४.

४अ.१३ सरावासाठी प्रश्न

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१) मराठी भाषेचे कालिकभेद कोणते आहेत ते लिहा.

२) शिवकालीन भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.

३) शिवकालीन भाषा आणि पेशवेकालीन भाषा यातील साम्यभेदाची चर्चा करा.

४) यादवकालीन भाषांचे वेगळेपण स्पष्ट करा.

५) इंग्रजी राजवटीचा परिणाम आंग्लकाळात मराठी भाषेवर कसा झाला ते लिहा.

ब) लघुत्तरी प्रश्न

१) शिवकालीन वाक्प्रयोग लिहा.

२) शिवकालीन भाषाभ्यासाची साधन सामुग्री कोणती ते लिहा.

३) यादवकालीन भाषेची विभक्ती प्रत्ययाची माहिती लिहा.

४) माहिती आणि तंत्रज्ञान काळातील शब्दसंग्रह लिहा.

५) बहामनी कालीन मराठी भाषेचा कोणताही एक नमुना लिहा.

क) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) इ.स. १८५० ते इ.स. १९५० हा कुठल्या भाषेचा कालखंड आहे?

२) मराठी-इंग्रजी कोश कोणत्या देखरेखीखाली तयार झाला?

३) शिवाजी महाराजांचा पोवाडा कोणी लिहिला?

४) भाषा परिवर्तनासाठी कोणते घटक महत्त्वाचे असतात?

५) कोणाच्या निबंधमालेने भाषा आणि वाङ्मयाचे नवयुग सुरु केले?

❖❖❖❖

४आ

लिपीविचार

(धम्म लिपी, ब्राह्मी लिपी, रोमन लिपी, देवनागरी लिपी आणि मोडी लिपी)

घटक रचना :

४आ.१ उद्दिष्टे

४आ.२ प्रस्तावना

४आ.३ लिपीचा उद्गम आणि विकास

४आ.४ लिपींचे वर्गीकरण

४आ.४.१. भ्रूण लिपी (Embryo Writing)

४आ.४.२. चित्रात्मक लिपी (Pictographic Script)

४आ.४.३. सूत्रात्मक लिपी

४आ.४.४. भावात्मक किंवा संकेतात्मक लिपी (Ideographic Script)

४आ.४.५. ध्वन्यात्मक लिपी (Phonetic or Phonographic Script)

१. अक्षरात्मक लिपी

२. वर्णात्मक लिपी

३. रेखाक्षरात्मक लिपी

४आ.५ लिप्यांचे कौटुंबिक वर्गीकरण

४आ.६ भारतातील विविध लिप्या

४आ.६.१ सिंधू संस्कृतीतील लिपी

४आ.६.२ ब्राह्मी लिपी

४आ.७ ब्राह्मी लिपीची वैशिष्ट्ये

४आ.८ उत्तर शैलीतील लिपी

४आ.८.१ गुप्त लिपी

४आ.८.२ कुटील लिपी

४आ.८.३ नागरी लिपी

४आ.८.४ शारदा लिपी

४आ.८.५ बंगला लिपी

४आ.९ दक्षिण शैलीतील लिपी

४आ.९.१ पश्चिमी

४आ.९.२ मध्यप्रदेशी

४आ.९.३ तेलगु कन्नडी

४आ.९.४ ग्रंथ लिपी

४आ.९.५ कलिंग लिपी

४आ.९.६ तामिळ लिपी

१. खारोष्ट्री लिपी

४आ.१० देवनागरी लिपी

४आ.११ देवनागरी लिपीची वैशिष्ट्ये

४आ.१२ मोडी लिपी

४आ.१३ मोडी लिपीची वैशिष्ट्ये

४आ.१४ रोमन लिपी

४आ.१५ रोमन लिपीची वैशिष्ट्ये

४आ.१६ समारोप

४आ.१७ संदर्भ ग्रंथ

४आ.१८ सरावासाठी प्रश्न

४आ.१ उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला पुढील उद्देश साध्य करता येतील.

- लिपीविचाराचा उद्गम आणि विकास स्पष्ट होईल.
- जगभरात कोणकोणत्या प्रकारच्या लिप्या आहेत त्यांचा परिचय होईल.
- भारतातील लिप्यांचा परिचय होईल.
- ब्राह्मी लिपी आणि त्यातून निर्माण झालेल्या इतर लिप्यांचे स्वरूप स्पष्ट होईल.
- रोमन लिपी, देवनागरी लिपी, मोडी लिपी यांचा परिचय होईल.

४आ.२ प्रस्तावना

मानवाच्या विविध आविष्कारातील एक महत्त्वाचा आविष्कार म्हणजे लिपी. लिपी ही भाषा जतनाची उच्चतम अवस्था. मानवी विकासात वाणीनंतर लिपीला महत्त्व दिले जाते. मुळात मानव हा इतर प्राण्यापेक्षा वेगळा आणि श्रेष्ठ ठरतो तो त्याच्या बोलणे,

आकलन करणे आणि लिहिणे या कलांमुळे. भाषा आणि लिपी यांचा अनोन्य संबंध आहे. भाषा हा शब्द उच्चारला की आपल्या नजरेसमोर सर्वात प्रथम येते ती लिपी. म्हणजे लिखित भाषा. लिपी भाषेचे वाहन आहे कारण लिपी आहे म्हणून दूरवर संदेश पोहोचविणे शक्य होते. लिपीमार्फत स्थळ काळाची बंधने ओलांडून एका प्रदेशाकडून दुसऱ्या प्रदेशात संदेश पोहोचण्याचे काम सुलभतेने होते. भाषा ही लिपीच्या आधीची अवस्था. भाषा आणि लिपी यात अंतर आहे. भाषेतील काही गोष्टी लिपीत येऊ शकत नाहीत. लिपी अस्तित्वात येण्याच्या आधी हजारो वर्षे भाषा बोलली जात होती. आजही अशा अनेक भाषा आहेत की, ज्या लिपीशिवाय आपले कार्य पार पाडीत आहेत. त्यांना त्यांची लिपी नाही. काही देशांत भाषांना लिपी अलीकडेच प्राप्त झाली आहे. उदाहरणार्थ, तीस लाखांपेक्षा जास्त लोकांमध्ये बोलली जाणारी फिनीश भाषा. उच्चारण हवेत विरून जाते मात्र जे लिपीबद्ध आहे ते कायम राहते, म्हणून लिपीला प्राधान्य दिले जाते. ध्वनी हा सतत परिवर्तनशील असतो. कोणताही उच्चार कायम स्थिर राहत नाही तो व्यक्तिगत, समाजगत, पिढीगत, व्यवसायगत, शिक्षण यामुळे त्यामध्ये बदलत असतो. लिपी दृश्य असल्यामुळे शब्दकोश, व्याकरणग्रंथ लिपीला प्राधान्य देतात. भाषेच्या निर्मितीनंतर बऱ्याच कालावधीने निर्माण होणारी लिपी ही नंतरची अवस्था. जगातील अनेक ग्रंथाना सुरक्षित करून ठेवणे शक्य झाले आहे ते लिपीमुळे. भाषेतून उच्चारलेल्या शब्दांच्या लेखनासाठी लिपीचा उपयोग होत असतो. एखाद्या भाषेत जर विशिष्ट उच्चार नसतील तर तिच्या लिपीतही ते दर्शविणाऱ्या अक्षरखुणा असत नाहीत. उदा. इंग्रजीत देवनागरीप्रमाणे ष, ळ... उच्चार नाहीत. कधी कधी उच्चार असूनही चिन्हे नसतात. मराठीतला "गवळी" हा शब्द रोमन लिपीत GAVALI असा लिहिला जातो. त्याचा उच्चार गवळी / गवली / गावली / गावळी / गवाळी / गावाळी / गवाली असा काहीही होऊ शकतो. तमिळमध्ये ख, ग, घ ... अशी अक्षरे लिहिता येत नाहीत, पण यांच्यापैकी काही उच्चार आहेत. याचाच अर्थ असा की लिप्यंतर करताना काही मर्यादा येऊ शकतात.

मानवी विकासामध्ये लिपीला महत्त्वाचे स्थान आहे. जगात लिपीमुळे भाषांचा विकास होऊ शकला. दूरच्या ठिकाणी संदेश पाठवता येत आहे. कमी वेळात कल्पनांचा प्रसार करता येतो. विविध काळातील कर्तृत्व जपता येते. अनेक विषयांवरील ग्रंथ जतन करता येत आहेत. अनेक विषयांवर संशोधन केले जाऊ शकते. कला, तत्त्वज्ञान, विज्ञान आणि हस्तकला इत्यादींमध्ये प्रगती होत आहे यामागेही लिपीचा हातभार आहे. भविष्यातील प्रगतीकडे नेण्यास लिपी समर्थ ठरते. भाषा आणि लिपी हे मानवी विकासाचे अविभाज्य भाग आहेत. भाषा हा मानवी जगणे सुलभ करणारा भाग आहे आणि भाषेशिवाय लिपीही टिकू शकत नाही. लिपी भाषेचे वाहन आहे. भाषा एकाच वाहनातून प्रवास करते. लिपी काही निश्चित चिन्हांच्या स्वरूपात भाषेचे प्रतिनिधी म्हणून कार्य करते. सुरुवातीपासून आजपर्यंत जगातील लोक आपापल्या देश, काळ आणि परिस्थितीनुसार वेगवेगळ्या ध्वनीनुसार चिन्हे वापरत आले आहेत. मानवी विकासाबरोबरच माणसाने ठरवलेले ध्वनीही उत्क्रांत होत राहिले. बदलत्या जगात, भाषा आणि लिपीमध्ये नेहमीच बदल होत असतात. बदलामुळे विकास होत असतो. विकास मानवाला पुढे घेऊन जातो. हा क्रम सुरुवातीपासून चालू आहे. आरंभीच्या काळात मानवाने अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून चित्रांची निर्मिती केली. जगभरातील चित्रे याची साक्ष देतात. चित्रातून भावाभिव्यक्ती तर

लिपीतून संकलन आणि संदेशवहनाचे कार्य पार पडले जाते. जगभरातील प्रत्येक लिपी हेच कार्य पार पाडत आहे. या प्रकरणात आपण लिपी आणि त्यासंदर्भातील माहिती घेणार आहोत.

४आ.३ लिपीचा उद्गम आणि विकास

लिपी शब्दाच्या अर्थाचा विचार करता, लिपी हा शब्द संस्कृत धातू शिंपडणे, चितारणे यावरून साधला आहे. लिपी, लिपिकार या शब्दांचा उल्लेख पाणीनीच्या 'अष्टाध्यायी'मध्ये आढळतो. लिपी हा शब्द लिप् या मूळ शब्दापासून तयार झाला असून याचा अर्थ होतो. लिंपणे, माखणे किंवा सारवणे, कागदाने कागदावर शाईने काहीही लिंपले की त्याला लिपी म्हणतात. लिग्गू म्हणजे खुणा करणे, कोरणे, पाषाणावर, ताडपत्रावर पूर्वी लोक कोरीत असत ती लिपी. वस्तुतः लेखन हे भाषेचे प्रतिबिंब आहे, म्हणून लिपीला प्रधान मानले जाते. सुरुवातीच्या काळात लोक आपले विचार, भावना व्यक्त करण्यासाठी गुहेच्या भिंती, दगड, ताम्रपट, ताडपत्र यावर कोरून ठेवत. त्यामुळे अशा प्रकारच्या कोरून ठेवलेल्या खुणा याला लेखन म्हटले गेले. ब्युहर यांच्या मते, लिपी हा शब्द प्राचीन पर्शियन लिपी सूचक शब्द 'दिपी' यावरून आला असावा. लिपी म्हणजे ध्वनी व्यक्त करण्यासाठी कागदावर केलेल्या खुणा. झाडाच्या पानांवर, सालीवर, हल्ली कागदावर आपण ज्या खुणा-चिन्हे लिहितो त्यांना लिपी म्हणतात. प्रारंभीच्या काळात जगभरात लिपी परमेश्वर निर्मित आहे हाच सिद्धांत मान्य होता. भारतामध्येही लेखन कलेचा उगम ईश्वरनिर्मित मानला जातो. भाषा वापराच्या आरंभीच्या काळात मानव निसर्गातील ध्वनीचा उपयोग संदेशवहनासाठी करत असावा. जेव्हा तो टोळ्यांनी राहू लागला तेव्हा समाजजीवनात सामाजिक संकेतांची गरज भासू लागली. सांकेतिकीकरणाच्या सुरुवातीच्या काळातील अवस्थेला भ्रूणलिपी म्हटले जाते. परंतु याला लिपीचा दर्जा दिला जात नाही. नंतरच्या काळात मानवाने आपल्या दैनंदिन वस्तूंचे सांकेतिकीकरण केले आणि आपल्या भावाभिव्यक्तीचे साधन म्हणून चित्रकलेचा उपयोग केला. याचा काळ निश्चित सांगता येत नसला तरी चित्रकलेचा आधार घेऊन लिपिचिन्हांचा आरंभ झाला. कोणत्याही भाषेचा लिपीदरम्यानचा प्रवास ध्वनिसंलग्न चिन्हीकरण, चिन्हाचे चित्रीकरण, चित्रित चिन्हांमधून संदेशवहन आणि त्यानंतर चित्रित चिन्हाचे ध्वनिसंलग्न भाषिक रूपांतर असा होऊन नंतर तो लिपीपर्यंत पोहोचेल. अर्थात त्यासाठी मानवी समाजाचा सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक विकास आवश्यक आहेच. आरंभीच्या काळात दूरवर पाठविल्या जाणाऱ्या चित्रचिन्हांना एकच एक अर्थ होता. उदा. सूर्य म्हणजे सूर्य. चंद्र म्हणजे चंद्र. या लिपिचिन्हांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भावप्रधानता. लिपिचिन्हांचा दुसऱ्या टप्प्यात चित्रातील सांकेतिकीकरण महत्त्वाचे ठरले. यावेळी सूर्याला सूर्य असा मर्यादित अर्थ न राहता त्याला सूर्य, दिवस, प्रकाश, उन्हाळा असे अर्थ प्राप्त झाले. यानंतरचा टप्पा म्हणजे सांकेतिक चित्रांना ध्वनी प्राप्त करून देणे. ही पायरी लिपीला खऱ्या अर्थाने लिपी ठरवते. म्हणजे भावाभिव्यक्तीची जाणीवच मानवी इतिहासातील लिपीचे बीज आहे असे लिपीतज्ज्ञ मानतात. अशी भावाभिव्यक्ती लक्षात घेऊन जगभरातील लिपीतज्ज्ञांनी लिपीच्या मुळाशी सुमेरमधील चित्रे ठेवून लिपिविकास मान्य केला. जगभरात लिपीसंदर्भात जे सिद्धांत मांडले गेले ते लिपी ईश्वरनिर्मित आहे या

दृष्टिकोनातून मांडले आहेत आणि केवळ भारतातच नव्हे तर जगभरात ईश्वरीय सिद्धांत म्हणूनच तिच्याकडे पाहिले. अनुक्रमे देश लिपी आणि देवता यांचा विचार करता मेसापोटेमिया (सुमेर)- किलाकर लिपी- नेबू, मिस्र मधील हिरोग्लीपस- थॉठ, चीन – चीनी- वेनचांग, इस्त्राईल- हेब्रू- जेहोवा, फिनीशिया उत्तर सेमिटिक – कैडमस, ग्रीस-ग्रीक- हर्मिस, रोम- रोमन- मर्क्युरी, भारत- ब्राह्मी- ब्रह्मा, अरब – अरबी- अल्लाह आदम, आयर्लंड - केल्टिक ओगम- ओगामा असा लिप्यांचा जन्म देवतांपासून झाला असे मानले जाते. अनेक विद्वानांनी आपले संपूर्ण जीवन लिपींचा शोध आणि प्रकटीकरणासाठी समर्पित केला. जगभरातील लिपीशास्त्र असे मानते की, लिपीचा जन्म हा सुमेरियन चित्रलिपीपासून झाला आणि त्यापासून इतर लिपींचा विकास झाला.

४आ.४ लिपींचे वर्गीकरण

प्राचीन लिपी जसजशा समोर येऊ लागल्या तसतशी इतर लिपींशी तुलना केली जाऊ लागली. त्यांच्यावर नवनवीन संशोधन होऊ लागले आणि त्यांचे वर्गीकरणही होऊ लागले, जे पुढीलप्रमाणे आहेत.

४आ.४.१ भ्रूण लिपी (Embryo Writing) :

काही चित्रे होती, काही ओळी, ज्याचा कोणताही हेतू स्पष्ट होत नाही किंवा ती काही तांत्रिक किंवा धार्मिक चित्रे आहेत असेही वाटत नाही. हे लेखन लिपी नव्हते. या प्रकारची चित्रे वेगवेगळ्या देशांतील रहिवाशांनी सुमारे वीस हजार वर्षे ते दहा हजार वर्षांच्या दरम्यान कोरली होती, ज्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे

१. दक्षिण फ्रान्समधून मिळालेले रंगीत दगड.

२. स्पेनमधून प्राचीन चित्रे मिळाली.

३. पोर्तुगालमध्ये खडकांवरील शिलालेख आढळले.

४. खडकावरील शिलालेख इटलीमधून मिळाले.

५. पॅलेस्टाईनकडून रेषा, गणितात्मक चिन्हे प्राप्त झाली.

६. क्रीटमधून रेखाचित्रे मिळाली.

७. इजिप्तमध्ये हस्तिदंतावर छापलेली चिन्हे सापडली.

८. इजिप्तमधून रेखाचित्रे मिळविली.

९. आफ्रिकेत खडकांवर कोरलेली रंगीत चित्रे सापडली.

१०. कॅलिफोर्निया (यूएसए) कडून चिन्हे प्राप्त झाली.

११. ॲरिझोना (यूएसए) येथून चिन्हे प्राप्त झाली.

१२. काही चिन्हे बहामास (कॅरिबियन समुद्र) वरून मिळवल्या गेल्या.

१३. ब्राझील (दक्षिण अमेरिका) पासून चिन्हे प्राप्त झाली.

१४. ऑस्ट्रेलियाकडून चिन्हे प्राप्त झाली.

४आ.४.२ चित्रात्मक लिपी (Pictographic Script) :

प्राचीन काळात मनुष्याने आपले विचार व्यक्त केले. दूरच्या ठिकाणी संदेश पाठवण्यासाठी दैनंदिन जीवनातील उपयोगी वस्तूंची चित्रे वापरण्यात आली. त्याकाळी चित्राचा अर्थ फक्त त्या वस्तूपुरता मर्यादित होता. सूर्याच्या चित्राचा अर्थ फक्त सूर्य होता. हीच परिस्थिती प्रत्येक प्राचीन सुसंस्कृत देशात होती जिथे कोणत्या ना कोणत्या लिपीचा जन्म झाला. आजही ही लिपी वाहनचालकांसाठी आणि इतर कारणांसाठी रस्ता चिन्हांसाठी वापरली जाते.

४आ.४.३ सूत्रात्मक लिपी :

प्राचीन काळी काही देशांमध्ये, संदेश पाठवण्याची प्रक्रिया दोरीमध्ये गाठ बांधून केली जात असे. याचे पुरावे आफ्रिका, पेरू (दक्षिण अमेरिका) आणि चीनमध्ये सापडले आहेत. असे इतर देशांमध्ये देखील प्रचलित असू शकते, परंतु पुरावे उपलब्ध नाहीत. आजही त्याची उपयुक्तता स्काउटिंगमध्ये होताना दिसून येते.

४आ.४.४ भावात्मक किंवा संकेतात्मक लिपी (Ideographic Script) :

लिपीच्या विकासात माणूस जसजसा प्रगती करत गेला तसतसा तो त्याच्या भावना दैनंदिन वस्तूंची चित्रे किंवा प्रतीके यांच्या माध्यमातून व्यक्त करू लागला. उदाहरणार्थ, सूर्याचे चित्र पूर्वी फक्त सूर्याचे सूचक होते, परंतु आता ते दिवस, उष्णता आणि प्रकाश देखील दर्शवू लागले. आकाशातील तारा आता फक्त तारा राहिला नसून तो आकाशाचा निदर्शकही होता. संदेश लिहून पाठवता यावेत म्हणून चित्राचे अर्थ ठरवले जाऊ लागले. यामध्ये चित्राचा एकच अर्थ किंवा चिन्ह निश्चित केले जात असे, परंतु काही ठिकाणी एकापेक्षा जास्त अर्थही वापरले गेले.

४आ.४.५ ध्वन्यात्मक लिपी (Phonetic or Phonographic Script) :

मानवी विकासाबरोबर माणसाच्या गरजा वाढल्या. त्यांचे उत्पादन वाढले, उत्पादन वाढवण्याची साधने वाढली आणि प्रत्येक क्षेत्रात प्रगती होऊ लागली. प्राचीन काळी माणसाच्या दैनंदिन जीवनात मर्यादित गोष्टी वापरल्या जात होत्या तर आता अमर्याद गोष्टी आहेत. या कारणास्तव, जेव्हा सुरुवातीचे शब्द अपुरे पडले तेव्हा त्या शब्दांची पूर्तता करताना मानवाने अक्षरांची प्रणाली शोधून काढली. शब्दासाठी चिन्ह निश्चित करणे असे हे एक उत्कृष्ट आणि दुर्मिळ कार्य होते.

हा शोध एका देशात झाला किंवा अनेक देशांत याबाबत विद्वानांमध्ये अजूनही एकमत नाही. त्याच्या उत्पत्तीचा पुरावा अनेक देशांमध्ये उपलब्ध नसल्यामुळे, सध्या असे मानले जाते की इजिप्तच्या प्राचीन रहिवाशांनी प्रथम २४ अक्षरे (व्यंजन, स्वर नव्हे तर लिपी) तयार केली, परंतु ती इतर देशांनी स्वीकारली नाही किंवा त्यात आणखी प्रगती झाली नाही. इजिप्तच्या शेजारील देश फिनिशियाने या कामात इतके यश मिळवले की आज जवळपास सर्वच देश जपान, भारत इ. त्याच देशाच्या लिपीचा सुधारित फॉर्म वापरतात. आपण ज्याला आज 'उत्तर सेमिटिक लिपी' म्हणतो, त्याची उत्पत्ती इ.स.पूर्व

पंधराव्या शतकाच्या आसपास झाली आणि ज्यामध्ये वर्षानुवर्षे फक्त २२ व्यंजने तयार झाली. ध्वनी हा ध्वन्यात्मक लिपीद्वारे वर्णमालेमध्ये आणला गेला. चित्राचा ठराविक भाग घेतला गेला आणि पहिला किंवा शेवटचा आवाज घेऊन त्या चित्राचे तात्काळ नाव निश्चित केले गेले. हा लिपी निर्मितीचा प्रयत्न अप्रतिम होता. सचित्र आणि भावनिक लिपींमध्ये, चित्रे किंवा चिन्हे एखादी वस्तू किंवा भावना प्रकट करतात, तर ध्वन्यात्मक लिपीमध्ये, चिन्हे कोणतीही वस्तू किंवा भावना प्रकट करत नाहीत तर केवळ लक्ष व्यक्त करतात आणि त्या ध्वनींच्या आधारे वस्तू किंवा भावनांचे नाव लिहिले जाऊ शकते. ही ध्वनी-आधारित लिपी पुन्हा तीन प्रकारांमध्ये विभागली जाऊ शकते:

१. अक्षरात्मक लिपी

या लिपीमध्ये, चिन्हे एक उच्चार व्यक्त करतात. उदाहरणार्थ नागरी लिपी. नागरी लिपीतील अक्षरांमध्ये दोन अक्षरे आहेत; जसे 'क' मध्ये 'क' + 'अ' आहे किंवा 'ब' मध्ये 'ब' + 'अ' आहे म्हणजेच अक्षरामध्ये स्वर ध्वनी आहे. अशा प्रकारे आर्वी, पर्शियन, बंगाली, गुजराती, पंजाबी, तेलुगू आणि ओरिया या अक्षरात्मक लिपी आहेत.

२. वर्णात्मक लिपी

लिपीची पहिली पायरी म्हणजे चित्रमय लिपी आणि शेवटची पायरी म्हणजे वर्णात्मक लिपी. या लिपीत प्रत्येक ध्वनीसाठी स्वतंत्र चिन्हे विहित केलेली आहेत. भाषाशास्त्राच्या दृष्टिकोनातून ही एक आदर्श लिपी आहे. रोमन लिपी हे त्याचे प्रतीक आहे.

३. रेखाक्षरात्मक लिपी

यामध्ये प्रत्येक शब्दासाठी स्वतंत्र आकृती आणि प्रत्येक ध्वनीचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये चिनी आणि जपानी लिपींचा समावेश आहे. पण जपानने आपली लिपी सोपी करण्यात अनेक वर्षे खर्ची घातली आहेत.

४आ.५ लिप्यांचे कौटुंबिक वर्गीकरण

ज्याप्रमाणे मानवजातीचे वर्गीकरण आणि भावांचे वर्गीकरण केले गेले, त्याचप्रमाणे विद्वानांनी देखील लिपींचे वर्गीकरण केले आहे. येथे I. J. GELB यांनी केलेले वर्गीकरण राही ईश्वरचंद्र यांच्या ‘लेखनकला का इतिहास’ या ग्रंथामध्ये पृष्ठ क्रमांक ५ वर दिले आहे. त्यांनी लिपींचा मूळ स्त्रोत सुमेरच्या ओळी मानल्या, ज्यांचे मूळ सुमारे ४००० इ. स. पूर्व मानले जाते. या कल्पनेवर अनेक लिपी तज्ज्ञांची मान्यता मिळाली आहे. हे वर्गीकरण असे आहे...



यावरून जगातील सर्वात पहिली लिपी म्हणून आदिकालीन सुमेरियन चित्रात्मक लिपीला ओळखले जाते. लिपीचा जन्म सुमेरियन आणि मिश्र चित्रांपासून झाला असे समजले जाते. याचा काळ इ. स. पूर्व ३००० ते इ. स. पूर्व २५०० असा मानण्यात आला आहे. सुमेरियन किलाकर लिपी (खिळ्यांच्या आकाराची) ही लिपी स्वतंत्र लिपी म्हणून ओळखली जाते. या लिपीला सुमेरियनांनी प्रस्थापित केल्यामुळे या लिपीला सुमेरियन किलाकर म्हटले जात असावे. प्रारंभी ही लिपी उभ्या ओळींमध्ये लिहिली जात. नंतरच्या म्हणजे इ. स. पूर्व १८०० मध्ये बेबिलोनियन संस्कृतीत कसाईट शासकांनी तिला डावीकडून उजवीकडे लिहिण्यास सुरुवात केली. मात्र भारतातील सर्वात जुनी समजली जाणारी हडप्पा संस्कृतीतील सिंधू लिपीचे वाचन अद्यापही झाले नव्हते. त्यावेळी हा सगळा प्रपंच मांडला होता असे दिसते. अगदी अलीकडेच प्रचंड प्रयत्न करून डॉ रवींद्र इंगळे चावारेकर यांनी सिंधू लिपीचे वाचन करून सर्व लिपींच्या उत्पत्तीचे केंद्र सिंधू

संस्कृतीत असल्याचे सिद्ध केले आहे. त्यांनी जागतिक लिपीचा विकास सांगताना सिंधू मारअंकी लिपी – ब्राह्मी लिपी – सेमिटिक – फिनीशिया – अरमायक – पाश्चिमात्य लिपी असा लिपीविकास सांगितला असून ते म्हणतात, सिंधुमधूनच लिपी व्यापाराद्वारे व्हाया जावक प्रांत पर्शियामध्ये पोहोचली. पुढे हीच सिंधुमधील ब्राह्मीची आवक जावक पर्शियामध्ये होती.

४आ.६ भारतातील विविध लिप्या

बुद्ध काळातील धम्म लिपी म्हणजेच ब्राह्मी लिपी होय. इ. स. पूर्व ५०० पासून इ. स. ३५० पर्यंतच्या भारतातील सर्व लिप्या ब्राह्मी मानल्या जातात. आरंभीच्या काळात भारतामध्ये ब्राह्मी लिपी प्रचलित होती. ज्या काळात ब्राह्मीचा वापर सुरु होता त्याच काळात भारताच्या वायव्य भागात खारोष्ट्री लिपीचा वापर सुरू होता. सिंधू संस्कृतीतील मारअंकी लिपीचे प्राचीनत्वही अलीकडे स्पष्ट झाले आहे.

४आ.६.१ सिंधू संस्कृतीतील लिपी :

भारतातील सर्वात जुनी लिपी म्हणजे सिंधू संस्कृतीतील चित्र लिपी. उत्खननामध्ये सिंधमधील मोहेन जो दडो आणि पंजाब मधील हडप्पा या प्राचीन नगरांचा शोध लागला. ही नगरे पाच हजार वर्षांपूर्वी वसली होती. १९३१ मध्ये सर जॉन मार्शल यांनी या नगरात सापडलेल्या पुराण वस्तूंवर आधारित एक त्रिखंडात्मक ग्रंथ प्रसिद्ध केला. या नगरात राहणारे लोक भूमध्य समुद्राभोवतालच्या देशातून आले होते असे मार्शल यांचे मत आहे. (Marshall, Sir John, monenjo - daro and the lindus civilization, London 1931) त्यानंतर या उत्खननाविषयी जे. एच. मेके यांनी दुसरा द्विखंडात्मक (१९३७-३८) ग्रंथ प्रसिद्ध केला. फादर हेअर हॉर्स यांनी या नगरवासीयांचा संबंध द्रविडांशी जोडला आहे. तसेच सिंधू संस्कृतीतील भाषेचा संबंध द्रविडांच्या तामिळ भाषेशी दाखवला. भारतीयांनी सिंधू लिपीचे वर्गीकरण 'पूर्वभारतीय लिपी' असे केले असून चित्रलिपी आणि वर्णलिपी मधला हा लिपीविशेष आहे. संशोधकांनी सिंधू संस्कृतीत सापडलेल्या मुद्रांचे सांकेतिक चित्रचिन्हे असे वर्गीकरण केले आहे. सिंधी लिपी हिटाईप, हेरिओग्लिफिक लेखन पद्धती सदृश्य आहे असे हंटर यांचे मत आहे. तसेच फिनिशियन सबियन आणि सायपरस मधील लिप्या सिंधू लिपीवरून निघाल्या असेही ते सांगतात. याबद्दल “अक्षररूपांवरून सिंधू लिपी पूर्व-इलामाईटशी जास्त जवळ आणि सुमेरियन अक्षर रूपावरून सिंधू लिपी पूर्व-इलामाईटशी जास्त जवळ आणि सुमेरियन लिपी पासून थोडी वेगळी आहे. अर्थात याला त्यातील सगुणरूपी चिन्हांचा अपवाद आहे. यातील दुसरी पद्धती इजिप्शियन (प्राचीन आणि मध्ययुगीन) लेखन पद्धतीच्या जवळची दिसते. या तिन्ही लिपीतील साम्य इतके आहे की, ते केवळ योगायोगाने आले असे मानणे कठीण. परंतु हे साम्य परंपरेने आले की अनुकरणाने आले याबद्दल निश्चित मत देता येत नाही. लिपीचे एक व्यवच्छेदक लक्षण म्हणजे मूळ चिन्हातून दुय्यम चिन्हाची निर्मिती. अंतरिक किंवा बाह्य कानामात्रा सुमेरियानांच्या गुणवृद्धीप्रमाणे. यामुळे अर्थात किंवा उच्चारात बदल होत नाही. एक किंवा अनेक जादा कानामात्रा, यातील दुसऱ्या प्रकारात ध्वनीत बदल होतो. हे अवयव ब्राह्मी लिपी पद्धतीप्रमाणे आणि

तशाच हेतूतून आलेले आहेत. असे मोहेंजोदडो लिपी समाज आणि संस्कृती पूर्वार्ध १९७५ श्री. के. गोळेगावकर यांनी आपल्या विवेचनांमध्ये म्हटले आहे. सिंधू लिपी ही वैदिक आर्यांची निर्मिती आहे तिचेच विकसित रूप म्हणजे ब्राह्मी लिपी. ब्राह्मी लिपी आणि प्राथमिक अवस्थेतील सिंधू लिपी यांच्यात साम्य आहे. तमीळ हे नागवंशीय आहेत वैदिक आर्य आणि नाग भिन्न परंपरा असलेले पण एकाच वैदिक धर्माचे अनुयायी होत. आर्य किंवा देव हे पितृप्रधान कुटुंब पद्धतीचे तर नाग आणि यक्ष हे मातृप्रधान कुटुंब पद्धतीचे पुरस्कर्ते होते. या दोन समाजाच्या सांस्कृतिक देवाण-घेवाणीतून हिंदू संस्कृती उदयास आली. सिंधू लिपीचा उगम चित्र लिपीतून झाला. प्राथमिक अवस्थेत यात काही स्वर आणि व्यंजने होते अ इ उ ए ओ आणि अं हे स्वर तर क, च, ट, ण, त, न, प, म ,र, ल, श, ह, अशी व्यंजने आहेत. आजच्या तामिळशी तिचे साम्य असल्याचे गोळेगावकर यांनी उदाहरणासह सांगितले आहे.

४आ.६.२ ब्राह्मी लिपी :

ब्राह्मी लिपीला भारतातील सर्वात प्राचीन लिपी मानली जाते. धम्म लिपीला ब्राह्मी लिपी म्हटले जाते. प्राचीन भारतामध्ये लेखनकला अवगत होती की नाही याबद्दल विद्वानांमध्ये मतभेद आहेत. मात्र प्राचीन भारतीय वाङ्मयामध्ये महाकाव्ये, पुराणे, स्मृती ग्रंथ, काव्ये, नाटके यामध्ये लिपी या अर्थाने अनेक उल्लेख आहेत. सामान्यतः पाणिनीच्या 'अष्टाध्यायी' या ग्रंथामध्ये लिपी, लिपिका, यावनानी अशा शब्दांचा अंतर्भाव आहे. पाणिनीचा व्याकरण विषयक हा ग्रंथ इसवी सन पूर्व ६-५ व्या शतकात त्यांनी लिहिला. यावरून या शतकामध्ये लिपी निश्चितपणे अस्तित्वात होती असे अनुमान बांधता येते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही लेखनविषयक पुरावे सापडतात. मुलाचे चौककर्म झाल्यावर त्यास अक्षरे व पाढे शिकवावे असे आपल्या विचारांमध्ये कौटिल्याने सांगताना लिपी विद्येचाही उल्लेख केलेला आहे. वात्स्यायनाच्या कामसूत्रात 'पुस्तकवाचन' ही एक कला मानली आहे. सण्वयांगसूत्र, पण्णवसूत्र या सूत्रामध्येही १८ विविध लिपींच्या यादी मिळतात. त्यामध्ये ब्राह्मी, अयस्त, माहेश्वरी, तेवणया, जवनाला (ग्रीक) यांचा उल्लेख सापडतो. तर ब्राह्मी, खारोष्ट्री, द्रविड, कनरा, चीनहूण, देव, यक्ष, किन्नर, असुर, अपरगौड, उत्तर कुरुद्वीप, पूर्वविदेह यासह एकूण ६० लिप्यांचा अंतर्भाव 'ललितविस्तार' ग्रंथामध्ये आहेत. काही अभ्यासक असे म्हणतात की, ही प्राचीन सिंधू लिपी मधून निर्माण झाली की भारतामध्ये पूर्वीपासून प्रचलित होती. सिंधू लिपीनंतर प्राकृत भाषा लिहिण्यासाठी ब्राह्मीचा उपयोग होऊ लागला. प्राकृतमध्ये पालीमध्ये लिहिलेले सम्राट अशोकाचे बौद्ध उपदेश आजही सुरक्षित आहेत यावरून असे दिसते की या लिपीचा विकास मौर्यने केला. अशोककालीन शिलालेखामध्ये ब्राह्मी आणि खरोष्ट्री या दोन्ही भाषांमध्ये शिलालेख कोरलेले दिसून येतात. गया येथील शिलालेखात अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ, ओ, औ, अ, अः, क, ख, ग, घ, ङ, च, छ, ज, झ, ञ ही अक्षरे आहेत. ब्युहलर यांनी म्हटले आहे की, ध्वनीशास्त्र आणि व्याकरणाचे नियम ज्ञात असलेल्या ब्राह्मण विद्वानांनी ब्राह्मी लिपी शोधून काढली. ब्राह्मणांच्या आणि पंडितांच्या बुद्धिवैभवाशिवाय त्यांची निर्मिती होऊच शकली नसती. (Buhler origin of brahmi chapter 3) तसेच ही लिपी द्राविडी लिपी ब्राह्मी लिपीची दक्षिणात्य पद्धती असावी

असेही त्यांचे मत आहे. ब्राह्मी लिपीस काही युरोपियन संशोधकांनी बॅक्ट्रियन, इंडो-बॅक्ट्रियन, बॅक्ट्रो पाली, अँरिअनो पाली इत्यादी नावे दिली होती. काही अभ्यासकांचे मत आहे की, ब्राह्मी लिपीचा जन्म फिनीशियन लिपी मधून झाला आहे. यामध्ये नॉर्थ सेमिटिक ही पॅलेस्टाईन त्याचबरोबर सिरीया येथील फिनिशियन लोक लिहीत असत. ब्राह्मीतील २२ अक्षरे नॉर्थ सेमिटिक पासून उत्पन्न झाली आहेत असेही विद्वानांचे मत आहे. तसेच ब्राह्मी आणि नोर्थ समिती या लिपींमध्ये बरेचसे साम्य आढळते त्यामुळे नोर्थ समिती हे ब्राह्मीचे उगमस्थान म्हणून अनेक विद्वानांनी मान्यता दिली आहे. जसा अरबी, युनानी, रोमन या लिप्यांचा जन्म झाला तसाच ब्राह्मी लिपीचा सुद्धा जन्म झाला. काही अभ्यासक ब्राह्मी लिपीचा विकास हा भारतामध्ये स्वतंत्रपणे झाला आहे असे मानतात. 'ब्राह्मी' हा शब्द भगवती सूत्र या जैन ग्रंथात सापडतो. जैन परंपरेतील ग्रंथानुसार ब्राह्मी लिपीमध्ये ४६ अक्षरे असल्याचे नमूद केले असून ऋ, ॠ, लृ, लॄ, क्ष यांचा अंतर्भाव त्यात दिसत नाही. ब्युहलर यांनी ब्राह्मी 'अ' ची आठ रुपे सांगितले आहेत. यातील अक्षरे काढण्याची पद्धती ही वाटोळी आणि कोणात्मक आहे. हीच विविधता इतर अक्षरांमध्येही दिसते. पहिली तीन रूपे कोणात्मक असून यापैकी पहिला कोण सरळ गाण्याला चिकटला आहे. दुसऱ्यामध्ये तो आडव्या रेघेने खाण्यास जोडला आहे. तिसऱ्यामध्ये काना वाकवला आहे. ते अक्षर इंग्रजी एक्स प्रमाणे दिसते. चौथे आणि पाचवे अक्षर शिरोरेखाशिवाय असणाऱ्यासारखे दिसते. सहावेही प्र प्रमाणे दिसते. उलटे इंग्रजी के सारखे सातवे अक्षर असून आठवे इंग्रजी एच प्रमाणे आहे. अशोकाच्या ब्राह्मीतील लेखामध्ये असा फरक आढळत असून साडेचारशे वर्षानंतरच्या लेखातील अक्षरांमध्येही तो आढळतो.

४आ.७ ब्राह्मी लिपीची वैशिष्ट्ये

- ही लिपी उजवीकडून डावीकडे लिहिली जाते.
- ती मात्रात्मक स्वरूपाची आहे.
- व्यंजनांवर मात्रा देऊन लिहिली जाते.
- काही व्यंजने संयुक्त व्यंजने आहेत जसे प्र
- जशा आधुनिक भारतीय लिप्या आहेत त्याप्रमाणे याचाही वर्णक्रम आहे.
- प्रांताप्रांतामध्ये या लिपीचे वेगळेपण वैशिष्ट्यपूर्ण वळण आढळून येते. त्यामुळे उत्तरेकडील ब्राह्मी, दक्षिणेकडील ब्राह्मी असे प्रकार दिसून येतात.
- वेगवेगळ्या काळातील लिपीचे वेगळे वळण असे ब्राह्मीचे वैशिष्ट्य सांगता येते.
- ब्राह्मी लिपीमध्ये वेळोवेळी लिहिण्याच्या सुलेखनामध्ये शैलीमध्ये फरक आढळतो.

जी यशस्वीपणे वाचली गेली अशी सर्वात प्राचीन लिपी म्हणजे ब्राह्मी लिपी. उत्पत्ती आणि विकास हे इसवी सन पूर्व तिसरे शतक ते इसवी सन सातवे शतक असा जवळजवळ हजार वर्षांचा समजला जातो. काळाच्या ओघात या लिपीच्या अक्षर पद्धतीत अर्थात वळणामध्ये बदल होत गेले. त्यामुळे तिच्या वळणावरून अशोक काळातील ब्राह्मी लिपी, सातवाहन काळातील ब्राह्मी लिपी, गुप्तकालीन ब्राह्मी लिपी, हर्षकालीन ब्राह्मी लिपी

असे ओळखले जाते. इसवी सनाच्या सातव्या शतकापासून ब्राह्मी मागे पडून देवनागरी आणि इतर प्रादेशिक लिप्यांचा उगम झाला. प्रसार झाला. तरीही प्राचीन देवनागरी आणि गुप्तकालीन ब्राह्मी यामध्ये काहीसे साम्य संशोधकांनी दाखवून दिले आहे. हा ब्राह्मीचा लेखन प्रवाह असून तो दोन भागात विभागला जातो. विभागणीमध्ये उत्तर शैलीतील लिप्या आणि दक्षिण शैलीतील लिप्या असे विभाग केले जातात. विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील भागात उत्तर शैली आणि विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील भागात दक्षिण शैली प्रचलित आहे. त्याचा सविस्तर विचार करू.

४आ.८ उत्तर शैलीतील लिपी

४आ.८.१ गुप्त लिपी :

संपूर्ण उत्तर भारतात या लिपीचा प्रसार गुप्त वंशाच्या राजाच्या काळात झाला त्यामुळे या लिपीचे नाव गुप्तलिपी मानले जाते. या लिपीचा प्रसार इ. स. चौथ्या-पाचव्या शतकात झाला.

४आ.८.२ कुटील लिपी :

गुप्त लिपीचे परावर्तीत रूप म्हणजे कुटील लिपी. या लिपीचा प्रसार इ. स. सहाव्या शतकापासून इ. स. नवव्या शतकापर्यंत चालू राहिला. या लिपीमध्ये स्वरांच्या मात्रांच्या कुटील आकारामुळे तिला कुटील असे नाव पडले. यातून पुढे नागरी आणि शारदा लिप्या उदयास आल्या.

४आ.८.३ नागरी लिपी :

भारतातील आर्य लिपीमध्ये नागरी लिपी सर्वात आदर्श मानली जाते. ही लिपी इ. स. दहाव्या शतकापासून आजपर्यंत भारतातील गुजरात, मध्य प्रदेश, बिहार, बंगालमध्ये प्रचलित आहे. दक्षिणेकडे तिला 'नांदिनागरी' म्हणतात. प्राचीन नगरीच्या पूर्व शाखेतून बंगाली लिपी निर्माण झाली असे म्हटले जाते. तसेच कैथी महाजनी, राजस्थानी, गुजराती आदी लिप्यांची निर्मितीही नागरीतून झाल्याचे सांगितले जाते.

४आ.८.४ शारदा लिपी :

शारदाचा प्रसार भारताच्या उत्तर पश्चिम बाजू अर्थात उत्तर काश्मीर आणि पंजाबमध्ये झाला. ठाकरी लिपी यातून निर्माण झाली असे मानले जाते. शारदा लिपी कुटील लिपीतून जन्मली असे मानले जाते. इसवी सनाच्या आठव्या शतकात राजा मेरुवर्मा यांच्या लेखामध्ये शारदा लिपी सापडते. मात्र तोपर्यंत पंजाबमध्ये कुटील लिपीचा प्रसार होता. यातून पुढे शारदा लिपी बनली असे मानले जाते. या लिपीतून पुढे वर्तमानातील काश्मिरी, ताकारी लिप्या निर्माण झाल्या असून पंजाबमधील गुरुमुखी अधिकांश अक्षरे यातून निर्माण झाल्याचे सांगितले जाते.

४आ.८.५ बंगला लिपी :

बंगला लिपी नागरीच्या प्राचीन शाखेतून इ. स. १० व्या शतकाच्या आसपास वापरली गेली. यातून बंगला, उडिया तसेच मैथिल लिप्यांची निर्मिती झाली.

४आ.९ दक्षिण शैलीतील लिपी

दक्षिणेकडील लिपी या ब्राह्मी लिपीच्या सुधारित स्वरूपावरून प्राप्त झाल्या आहेत असे मानले जाते.

४.९.१ पश्चिमी :

ही लिपी पाचव्या शतकापासून नवव्या शतकापर्यंत मिळते. भारताच्या पश्चिम भागात ही लिपी प्रसिद्ध असल्याने तिला पश्चिमी लिपी म्हटले जाते. गुजरात, नाशिक, खानदेश, सातारा, हैद्राबादचा काही भाग कोकण, म्हैसूरचा काही भागामध्ये पश्चिमी प्रचलित असल्याचे सांगितले जाते.

४आ.९.२ मध्यप्रदेशी :

ही लिपी मध्यप्रदेश, हैद्राबाद राज्याच्या उत्तरेकडील विभाग आणि बुन्देल खंडाच्या काही भागात इसवी सनाच्या पाचव्या शतकापासून आठव्या शतकापर्यंत आढळते. या लिपीतील अक्षरांचे डोके चौरस किंवा चौकोनी आकाराचे असते. ते बहुतेक वेळा पोकळ व कधी कधी भरलेली असते. अक्षरांचा आकार जवळ जवळ काटकोनात असतो. अर्थात ते बनवताना आडव्या आणि उभ्या रेषा वापरल्या जातात.

४आ.९.३ तेलगु, कन्नडी :

ही लिपी दक्षिण विभागात आढळते. सोलापूर, विजापूर, बेळगाव, धारवाड, कारवार जिल्ह्यात, हैद्राबाद संस्थानाच्या दक्षिणेकडील भागात, म्हैसूर संस्थानात आणि मद्रास प्रदेशच्या उत्तर – पूर्व विभागामध्ये आढळते. इ. सनाच्या ५ व्या शतकापासून १४ व्य शतकापर्यंत ही लिपी दिसून येते. नंतरच्या काळात यामध्ये बदल होऊन आजच्या तेलगु आणि कन्नड या लिप्या बनल्या आहेत. तेलगु, कन्नडी वरून या लिप्यांची नावेही तेलगु, कन्नड अशी ठेवल्याचे म्हटले जाते.

४आ.९.४ ग्रंथ लिपी :

ही लिपी मद्रास प्रदेशातील उत्तर आणि दक्षिण आर्केट, सेलम, त्रिचिनामपल्ली मदुरा आणि तिन्नेवेल्ली जिल्ह्यात आढळते. इ. स. ७ व्या शतकापासून ते १५ व्या शतकापर्यंत तिच्यामध्ये बदल होत गेला आहे. ग्रंथ लिपीतून पुढे सध्याची मल्याळम आणि तुलू लिपी उत्पन्न झाल्याचे सांगितले जाते.

४आ.९.५ कलिंग लिपी :

कलिंग लिपी मद्रासमधील चीकोंल आणि गंजम दरम्यानच्या प्रदेशात आढळते. गंगावंशीय राजाच्या दानपत्रात इ. स. ७ व्या शतकापासून ११ व्या शतकापर्यंत आढळते.

या लिपीतील सर्वात पहिले दानपत्र (गंगेत) सवंत ८७ मध्ये सापडले असून जे राजा देवेन वर्मा यांचे आहे. त्यांची लिपी मध्यप्रदेशातील लिपीप्रमाणे आहे. यातील अक्षरांची डोकी पेटीच्या आकाराची असून आतून भरलेली, बहुतेक वेळा काटकोनात असतात. राजा देवेन वर्मा यांची नंतरच्या काळातील दानपत्रे मात्र मिश्र स्वरुपाची आढळतात.

४आ.९.६ तामिळ लिपी :

या लिपीतील अधिकांश अक्षरे ग्रंथलिपीशी मिळतीजुळती आहेत. मात्र 'क' आणि 'र' ही अक्षरे उत्तरेकडील ब्राह्मीकडून घेतली आहेत असे मानले जाते. ब्राह्मी लिपीमध्ये बदल होत जाऊन पुढे तमिळ लिपी बनली.

१. खारोष्ट्री लिपी-

भारतामध्ये ज्या काळात ब्राह्मीचा उपयोग होत होता त्याच काळात भारताच्या वायव्य भागात शक, इंडो, ग्रीक व कुशाण यांनी खारोष्ट्री लिपीचा वापर सुरू केला. खारोष्ट्री या शब्दाचा अर्थ गाढवाच्या ओठासारखे लपेटी असलेली. या लिपीची उत्पत्ती ही नोर्थ सेमेटिक लिपीपासून निर्माण झालेल्या अरमइक पासून झाली. ही लिपी उजवीकडून डावीकडे लिहिली जाते. खारोष्ट्रीमध्ये स्वरांची योजना शब्दाच्या आरंभी येणाऱ्या ओ साठी वेलांटी वापरण्यात येई. दुसऱ्या इ, ऊ, ए, ओ या स्वर मात्रांसाठी व्यंजनांच्या बाजूला काने दिले जात. यामध्ये ऱ्हस्व-दीर्घ असा स्वरभेद दिसत नाही. स्वरांकरता प्रथम मात्रा वापरली जाते. ब्राह्मी प्रमाणे इ, ए, ओ च्या मात्रा वर आणि उंची मात्रा खाली दिली जात. खारोष्ट्री मध्ये अ अक्षररूपातच असे जोड व्यंजनामध्ये ट्ट, ड्ड, क्क या ऐवजी असे वापरलेले दिसते. दोन अनुनासिके आली तर वेगळी पद्धत होती. 'आग्न'चे आन, 'अन्न'चे अंन असे लिहीत. कधी कधी म चे द्वित्व आढळते. उदाहरणार्थ (सम्मक). पहिले व्यंजन अनुनासिक असेल तर अनुस्वार वापरला जाईल. असमान व्यंजन समूहासाठी जोडाक्षरे असत. ही जोडाक्षरे एकाखाली एक व्यंजन ठेवून केली जात. 'र' सुद्धा जोडाक्षरात खालीच ठेवत असत.

४आ.१० देवनागरी लिपी

आपण मराठी सध्या जी लिपी वापरतो त्याला बालबोध लिपी म्हटले जाते. यालाच देवनागरी लिपी असेही म्हणतात. ही लिपी आर्य लोकांची लिपी. आर्य लोक भारतात येण्यापूर्वी भारतामध्ये द्राविड शासकांचे राज्य होते. मात्र आर्य द्राविडांपेक्षा अधिक तेजस्वी, अधिक गोरे असल्यामुळे त्यांना देव म्हटले जाऊ लागले. नगर अर्थात शहर करून वास्तव्य करत म्हणून ते नागरी आणि त्यांची लिपी देवनागरी असे नाव पडले. देवनागरी शब्द अर्थातच देवनागर शब्दापासून आलेला आहे. आर्य हे इतर आदिवासी लोकांपेक्षा अधिक सुधारलेले व नगरात राहणारे म्हणून त्यांच्या लिपीस देवनागरी अशी संज्ञा मिळाली असावी. आणखी एक तर्क यासंबंधी सांगितला जातो, मध्ययुगीन काळात तांत्रिक लोक अनेक चिन्हांची यंत्रे बनवीत असत. त्या यंत्रांना देवनागरी असे नाव होते. त्यातील चिन्हांशी मिळतीजुळती असणारी जी लिपी ती देवनागरी असेही मानण्यात येते. देवनागरीमध्ये उच्चारण स्थानाला लक्षात घेऊन लिपीची निर्मिती केली आहे. प्रथम

आपण घशातून आवाज काढतो आणि नंतर 'क', 'ख', 'ग', 'घ' बाहेर येतो. 'टाळू' तून तर च, छ, ज, झ बाहेर पडतात, मग मूर्धन्य, ट, ठ, ड, ध, ण, दंत्य-ल, त, थ, द, ध, न आणि शेवटी जेव्हा ध्वनी ओठांपर्यंत पोहोचतो तेव्हा प, फ, ब, भ, म हे शब्द उच्चारले जातात. अशाप्रकारे, उच्चार स्थानानुसार ध्वनी चिन्हे अनुक्रमे तयार केली गेली आहेत. ही खासियत आणि वैज्ञानिकता जगातील इतर कोणत्याही लिपीत नाही. भारतामध्ये देवनागरीचा वापर सहाव्या सातव्या शतकापासून होत असावा असे मानले जाते. भारतातील बहुतेक भाषांमध्ये लेखन करण्यासाठी देवनागरी वापरली जाते. आजही संस्कृत, मराठी, हिंदी, गुजराती, काश्मिरी, नेपाळी, बोडो, भोजपुरी, मैथिली, रोमा या भाषांची लिपी देवनागरी आहे.

४आ.११ देवनागरी लिपीची वैशिष्ट्ये

- देवनागरी डावीकडून उजवीकडे लिहिली जाते.
- प्रत्येक शब्दाच्या वर शिरोरेषा दिली जाते.
- ही एक ध्वन्यात्मक लिपी असून या लिपीमध्ये ध्वनी जसाच्या तसा लिहिला जातो. लिहिलेल्या शब्दाचे हुबेहूब उच्चारण करता येतो.
- स्वर, व्यंजन, कोमल, कठोर, महाप्राण, अल्पप्राण, अनुनासिक, अंत्यस्थ, उष्मे असे वर्गीकरण आढळते. यातील अक्षरांना एक क्रम आहे.
- देवनागरी लिपी हे पूर्णतः वर्णनात्मक नाही.
- स्वर आणि व्यंजन अक्षरे बनवताना काही भाग लोप पावतो तसेच त्याच्या आकारात फरक पडतो.
- व्यंजनामध्ये स्वर मिळवला की वर्ण सिद्ध होतो. उदाहरणार्थ - ग व्यंजनामध्ये ई मिळवला की गी सिद्ध होतो.
- जोडाक्षरामध्ये एकाखाली एक व्यंजन येते. उदा. घट्ट काही वेळेस एकापुढे दुसरे व्यंजन ही येऊ शकते उदाहरणार्थ सिद्ध.
- देवनागरीमध्ये स्वर व्यंजनांचा शास्त्रीय क्रम आहे.
- देवनागरी ही काव्यात्मक आणि व्यावहारिक लिपी असून तीमध्ये फारसी, इंग्रजी ध्वनी सहज आले आहेत.
- या लिपीत वर्णाप्रमाणे उच्चार आहेत. इंग्रजीत H (एच) T (टी) असा उच्चार होतो. देवनागरीत असे होत नाही.

- देवनागरीत प्रत्येक ध्वनीसाठी स्वतंत्र चिन्हे आहेत. हे तिचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. फारसीमध्ये 'स' ध्वनीसाठी सीन, स्वाद तर रोमनमध्ये 'क' 'c, k, q' वापरले जाते.
- या लिपीत, आ वगळता सर्व स्वरांना ऱ्हस्व आणि दीर्घ मात्रा आहेत. व्यंजनामध्ये स्वराला मिळवले की पूर्ण व्यंजन मिळते.
- यामध्ये व्यंजनांच्या संयोगाने चिन्हांकित करण्याची पद्धत योग्य आहे.
- वर्ण कलात्मक आणि सुंदर आहेत. कमी जागा व्यापली जाते.
- जगातल्या बहुसंख्य भाषांचे बहुतेक उच्चार जवळजवळ अचूक लिहिण्याची क्षमता देवनागरी लिपीत असल्याने देवनागरी ही एक उत्कृष्ट लिपी समजली जाते.

४आ.१२ मोडी लिपी

मोडी लिपीचा उगम दोन हजार वर्षे पाठीमागे संशोधक नेतात. प्राचीन इतिहासात मगध साम्राज्यात मौर्यी लिपी रूढ होती. या मौर्यी लिपीतून मोडीचा उगम झाला असे काही अभ्यासक मानतात. महाराष्ट्रात इ. स. तिसऱ्या शतकात सातवाहनांचे साम्राज्य होते. त्यातील प्रधानमंत्री गुणाढ्य याने राजाला तीन दिवसात संस्कृत पंडित बनविण्याची प्रतिज्ञा केली. मात्र ती पूर्ण न झाल्याने त्याने 'मी संस्कृत, भाषेतून लेखन करणार नाही' अशी प्रतिज्ञा केली व अरण्यवास स्वीकारला. पुढे त्यांनी 'बृहत्कथा' हा ग्रंथ निर्माण केला त्याची भाषा, लिपी पैशाची होती. त्यातून मोडी लिपी निर्माण झाली असे मानणारा एक वर्ग आहे. तेराव्या शतकापासून अगदी विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत मोडी ही मराठी भाषेच्या लेखनाची प्रमुख लिपी होती. आणखी एक मत असे की, यादवांच्या काळात १२६० ते १३०९ या काळामध्ये हेमाद्री पंडित (हेमाडपंथ) या प्रधानाने मोडी लिपीचा विकास केला. त्यामुळे या लिपीला यादवकालीन मानले जाते. मोडी लिपीच्या उगमासंदर्भात मतभेद आहेत. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे आणि डॉ. भांडारकर यांच्या मते हेमांडपंताने ही लिपी श्रीलंकेतून आणली. चांदोरकर यांच्या मते ती अशोककालातील मौर्य ब्राह्मीचाच एक प्रगत प्रकार आहे. वाकणकर व वालावलकर यांच्या मते, मोडी लिपी ही ब्राह्मी लिपीचाच एक प्रकार असून हात न उचलता लिहिण्याच्या वेगळेपणामुळे वैशिष्ट्यामुळे ती इतरांपेक्षा वेगळी आहे. ती श्रीलंकेतून आणली गेली असावी हे ते अमान्य करतात. या संदर्भात शिवाजी महाराजांचे लेखनिक बालाजी आवजी चिटणीस यांचेही नाव घेतले जाते. मात्र बालाजी आवजी यांच्या पूर्वीही मोडी अस्तित्वात असल्याने या तर्काला अर्थ उरत नाही. एकंदरीत मोडीचा विचार करता देवनागरी लिपीत आवश्यक ते बदल करून यादवकाळात अस्तित्वात आली असावी असे लक्षात येते.

बालबोध अक्षरे काढताना सतत लेखणी उचलावी लागते. मोडी लिपीत ओळ पूर्ण होईपर्यंत किंवा शाई संपेपर्यंत लिहिले जाते. मोडीमध्ये अपूर्ण वर्ण काढता येत नाही. तसेच मराठीप्रमाणे संयुक्त वर्णही स्वतंत्रपणे लिहिणे शक्य होत नाही. उदा. पर्वत हा शब्द

परवत असा लिहिला जातो. तसेच मोडी लिपीमध्ये ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार त्याचबरोबर विरामचिन्हे यांचा उपयोग केला जात नाही. परिणामी त्याच्या वाचनात अडचणी येतात. त्यामुळे वाचन करताना काळजी घ्यावी लागते. नाहीतर विपरीत अर्थ निघू शकतो. उदा. **रस्त्यात नाच, तमासे चालले होते**. हे वाक्य 'रस्त्यात नाचत मासे चालले होते'. असे वाचणे योग्य होणार नाही. शब्दसंक्षेप हा प्रकार आजही मराठीत रूढ आहे. शब्द मोठा असेल तर पहिले अक्षर लिहून नंतर दोन उभ्या रेषा नंतर शेवटचे अक्षर लिहिले जाते. कधी कधी एकच अक्षर लिहिले जाते. उदा. गो – गोसावी. काही अक्षरांच्या वळणात थोडासा बदल असल्याने वाचनात चुका होणे शक्य असते. शिवाय या लिपीतील दस्तऐवज वाचताना काळ आणि प्रांत यांचाही विचार करावा लागतो.

४आ.१३ मोडी लिपीची वैशिष्ट्ये

- मोडी ही हात न उचलता लिहिली जाणारी लिपी आहे.
- मोडीचे लेखन वेगाने करता येते.
- अनेक शब्दांची लघु रूपे म्हणजेच शब्दसंक्षेप वापरलेला आहेत. उदा. विनंती – वि॥, तीर्थरूप - ती॥
- अक्षरांची वळणे गोलाकार आहेत तसेच काना खालून वर लिहिला जातो.
- प्रत्येक अक्षराची सुरुवात आणि शेवट डोक्यावरच्या रेषेवर होते.
- अत्यंत महत्त्वाचे म्हणजे मोडी लिपीतील शब्द संदर्भ लक्षात घेऊन योग्य ठिकाणी तोडावा लागतो. तसेच अक्षरांचा विचार करता क आणि ला, द आणि ह, र आणि ट या वर्ण लेखनात फरक नाही. तसेच ज आणि न, थ आणि ख, य आणि स, या अक्षरामध्ये थोडा फरक आहे.

लिखाणाच्या हौसेतून व्यक्तिगणिक लपेटी तयार झाल्या आहेत. त्यामुळे मोडीवर विविध प्रांतांच्या स्थानिक भाषा आणि लपेटी यांचा प्रभाव जाणवणारा आहे.

४आ.१४ रोमन लिपी

युरोपियन संस्कृतीमध्ये लॅटिन लिपीला अतिशय महत्त्व आहे. इ. स. पूर्व ११व्या शतकात नॉर्थ लिपी परंपरेतून रोमन लिपी उत्क्रांत झाली असे मानले जाते. यातील सर्वात प्राचीन लेख उजवीकडून डावीकडे लिहिलेला आढळतो. इ. स. पूर्व सहाव्या शतकात एका सोनेरी खन्जीराच्या म्यानावर कोरलेला हा लेख १९२६ मध्ये सापडला. रोमन सभागृहातील एका चौकोनी दगडी खांबावर चारी बाजूनी नंगारती पद्धतीने उभा लिहिलेला एक शिलालेख १८९९ मध्ये आढळला. याचा कालखंड इ. स. पूर्व सातव्या शतकाचा शेवट किंवा इ. स. पूर्व सहावे शतक असा मानला जातो. १८८० मध्ये सापडलेला ड्यूनॉस शिलालेख तीन भांडी असलेल्या मोठ्या रांजनाच्या मध्य भागावर लिहिला आहे. इ. स. पूर्व तिसऱ्या आणि पहिल्या शतकातील अनेक शिलालेख उपलब्ध आहेत.

रोमनच्या उत्पत्तीविषयी विद्वानांमध्ये मतभेद आहेत. काहींच्या मते ग्रीक लिपीची उत्पत्ती लॅटिन लिपीपासून झाली असून ती ग्रीकच्या चॅलिसिडियन प्रकाराशी जुळते. याला अपवाद आहे तो g,p या अक्षरांचा. नंतरच्या काळात हा विचार मागे पडला आणि ब्रील यांनी लॅटिनची उत्पत्ती इंद्रुसन लिपीपासून झाली असे मानले. त्यामुळे इंद्रुसन लिपी ग्रीक आणि लॅटिन यांना जोडणारा दुवा आहे असे मानले जाते. इंद्रुसनमध्ये एकूण सव्वीस अक्षरे आहेत. यातील २१ अक्षरे रोमन लोकांनी स्वीकारली. महाप्राणयुक्त 'ह' चा उच्चार असणारी kh, ph,th वगळली. यात काहीसा बदल करून आकडे दर्शविण्यासाठी त्याचा उपयोग केला गेला असे काही अभ्यासक मानतात. इ. स. पूर्व सातव्या शतकातील आणि सहाव्या शतकाच्या सुरुवातीची अभिजात लॅटिन तेवीस अक्षरांची होती. A, B, C, D, E, F, G, H, I, K, L, M, N, O, P, Q, S, T, V, X काही ठिकाणी R (K चा उच्चार आढळतो.) अशी एकूण २१ अक्षरे इंद्रुसन लिपीतून घेतली आहेत असे मानले जाते. इ. स. पूर्व पहिल्या शतकात रोमन लोकांनी ग्रीसवर विजय मिळवला. लिपी सौकार्याच्या दृष्टिकोनातून X आणि Y अक्षरांचा स्वीकार केला. अकराव्या-बाराव्या शतकात V चे द्वित्व होऊन W जर्मन अक्षराचा समावेश केला. फ्रेंच लिपितज्ज्ञ लुई माय्ग्रेत यांनी १५४२ मध्ये I अक्षर स्वर तर J अक्षर व्यंजन म्हणून उपयोगात आणले. कॅपिटल लिपीत U आणि V मध्ये फरक केला जात नव्हता. तर युन्सीअल लिपीत U अक्षर U आणि V साठी वापरले जात होते. दहाव्या शतकात V मिनुस्कुल लिपीत उपयोगात आणले तर u हे स्मॉल लेटर म्हणून वापरले गेले. सतराव्या शतकापासून U अक्षर स्वर म्हणून तर V अक्षर व्यंजन म्हणून वापरण्यात आले.

काळाच्या गरजेनुसार रोमनचे प्रकार पडतात. शीला किंवा धातूवर कोरण्यासाठी कॅपिटल किंवा मॉन्युमेंटल लिपी असून बायबलच्या हस्तलिखितात ही लिपी आढळते. कॅपिटलचाच थोडा वेगळा प्रकार 'रस्टिक' हा प्रकार चौथ्या ते सातव्या शतकापर्यंत आढळतो. दुसऱ्या शतकाच्या मध्यानंतर धावत्या लिपीचा 'कर्सिव्ह'चा उदय झाला. चौथ्या शतकापासून नवव्या शतकापर्यंत 'युन्सीअल लिपी' उपयोगात आणली गेली. यातील धार्मिक हस्तलिखिते उपलब्ध आहेत. दरम्यानच्या काळात पुस्तकांसाठी आणि दैनंदिन वापरासाठी कॅपीटलमधून 'कर्सिव्ह कॅपीटल' आणि 'मॅजुस्कूल कर्सिव्ह' यांचा उपयोग होऊ लागला. ही पद्धत इजिप्तमधील पपायरसमध्ये पहिल्या शतकात ज्ञात होती. कॅपीटल कर्सिव्हमध्ये अक्षरांचा आकार कमी करण्याकडे तसेच अक्षरे जोडून लिहिण्याकडे कल दिसतो. दुरेघी, चाररेघी पद्धतीचा अवलंब झाला. प्रत्येक अक्षराची उंची आणि आकार निश्चित होतो यास 'हाफ युन्सीअल' म्हणून ओळखण्यात येते. मिनुस्कुल लिपीला 'न्यू आयरिश लिपी' असे नाव देण्यात आले. आकराव्या-बाराव्या शतकापासून आजतागायत यातील अक्षरांच्या आकारामध्ये बदल झालेला नाही. धर्मप्रसारामार्फत ही लिपी फ्रान्स, इटली, स्वित्झर्लंड, जर्मनीमध्ये पोहोचली. तेथील लीप्यांवर प्रभाव पडून पुढे ब्रिटनमधील 'अंग्लो सॅक्शन' लिपीची निर्मिती झाली. काही नवीन चिन्हांचा समावेश झाला. बाराव्या-तेराव्या शतकात गॉथिक प्रकारातील ब्रोकन लिपी अस्तित्वात आली. रोमन लिपीने इतर सर्व लिप्यांना बाजूला करून स्वत:चे स्थान निश्चित केले. सोळाव्या शतकात रनिंग लिपीचा उपयोग केला गेला. ख्रिस्ती धर्माच्या अनुयायांनी रोमनचा प्रसार उत्तर, पश्चिम, मध्य युरोपात केला. ही लिपी इंग्रजी, जर्मन, फ्रेंच, हंगेरियन फिनिश अशा कितीतरी भाषांसाठी वापरली जाते.

४आ.१५ रोमन लिपीची वैशिष्ट्ये

- रोमन लिपी वर्णमाला आहे.
- रोमन लिपीमध्ये देवनागरीपेक्षा जास्त ध्वनी वापरले जातात.
- ही लिपी डावीकडून उजवीकडे लिहिली जाते.
- रोमन लिपीत छ, ख, या ध्वनींसाठी स्वतंत्र चिन्ह न वापरता सीएचएच, केएच, जीएचए असे चिन्हांकित केले जाते.

रोमन लिपीमध्ये प्रमाणांचा पूर्ण अभाव आहे, म्हणूनच 'राम'ला Rama, 'गुप्त'ला Gupta, 'मिश्र' Mishra असे लिहिले जाते.

४आ.१६ समारोप

आरंभी जगभरातील सर्वच लिप्यांची निर्मिती ईश्वरनिर्मित सांगितली जाते. सर्वसाधारणपणे जगभरातील लिप्यांची जननी सुमेरियन किलाकर असून या चित्रलिपीपासून पुढे लिप्या निर्माण झाल्या असे मानले जाते. यासंदर्भात मत मतांतरे आहेत. भारतातील ब्राह्मी लिपीचे प्राचीनत्व अनेक अभ्यासकांनी अधोरेखित केल्याचेही दिसते. अगदी सुरुवातीपासून लिपीला ईश्वरनिर्मित असल्याचे सांगितले जात असून ब्राह्मी ब्रह्मदेवापासून निर्माण झाली असे मानले जाते. जगभरातील इतर लिप्यांची दैवी निर्मिती वर उद्धृत केली आहे. ब्राह्मी पासून उत्तर शैलीतील लिप्या आणि दक्षिण शैलीतील लिप्या असे दोन प्रकार पडतात. त्यामध्ये भारतातील वेगवेगळ्या लिप्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. जगातील वेगवेगळ्या लिप्या वेगवेगळ्या प्रकाराने चिन्हांकित केल्या आहेत. हा मतप्रवाह प्रचलित असला तरी तो सिंधू संस्कृतीतील लिपीचे वाचन करण्यापूर्वीचा आहे. अगदी अलीकडे सिंधू संस्कृतीतील लिपीचे वाचन करून तिचे प्राचीनत्व स्पष्ट करणारे ज्येष्ठ अभ्यासक रवींद्र इंगळे चावरेकर यांनी सप्रमाण सांगितले आहे. त्याचबरोबर सदर लेखामध्ये इतर महत्त्वाच्या असणाऱ्या रोमन, देवनागरी, मोडी लिपी यांचे वेगळेपण सांगितले आहे.

४आ.१७ संदर्भ ग्रंथ

१. राही, ईश्वरचंद्र – 'लेखनकला का इतिहास', उत्तर प्रदेश हिंदी संस्थान, खंड २, प्रथम संस्करण १९८३.

२. इंगळे, चावरेकर रवींद्र- 'सिंधुकालीन लिपी आणि भारतीय भाषांचा अभ्यास', हस्ताक्षर प्रकाशनगृह, २०२१

३. ओझा, पंडित, गौरीशंकर हरिश्चंद्र – 'भारतीय प्राचीन लिपिमाला' – मुंश्रीराम मनोहरलाल नवी दिल्ली, १९७१

४. नाईक, बाबुराव- 'देवनागरी मुद्राक्षर लेखनकला' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, खंड पहिला. १९८२.

५. दीक्षित, दुर्गा (संपा.) – 'महाराष्ट्र संस्कृती कोश' – डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती २००९.

६. गोखले, शोभना – 'पुराभिलेखविद्या', प्रकाशन पुणे, तृतीयावृत्ती, २०१९.

७. जोशी, प्र. न - 'अभिनव मराठी व्याकरण', स्नेहवर्धन प्रकाशन.

८. मराठी विश्वकोश - https://vishwakosh.marathi.gov.in/31624

९. टिळक, श्रीकृष्ण लक्ष्मण- 'सहज सोपी मोडी लिपी', व्यास क्रिएशन,

पूरक वाचनासाठी :

१. गजेंद्र गडकर श्री. न. – 'भाषा व भाषाशास्त्र' - व्हीनस प्रकाशन पुणे पुनर्मुद्रण 2012

२. मोडक, श्रीनावास जनार्दन (संपादक), 'लेखक पंडित गणपतीशास्त्री हेब्बार', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९८८.

३. अनिर्वाण दाश- 'इयं धम्म लिपी', बौद्ध साहित्य प्रसारक मंडळ, नाशिक.

४. शिंदे आर जी, 'मोडी लिपी शिका', सुगावा प्रकाशन.

४आ.१८ सरावासाठी प्रश्न

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. लिपी म्हणजे काय सांगून लिपीविचार : उद्गम आणि विकास सविस्तर सांगा.

२. ब्राह्मी लिपीचा सविस्तर परिचय द्या.

३. भारतातील विविध लिप्यांचा सविस्तर परिचय करून द्या.

४. जगभरातील लिप्यांचे वर्गीकरण करा.

अ) टिपा लिहा.

१. रोमन लिपी

२. देवनागरी लिपी

३. मोडी लिपी

❖❖❖❖